पान १ वरून

## धरणे रिकामी, प्रशासन निकामी?

जलसाठा शिल्लक असून सुधागडमधील ढोकशेतमधील धरणात शून्य टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या धरणांमधील जलसाठा चिंताजनक असल्याची माहिती समोर आली आहे. मागील वर्षी मे ते ऑक्टोबरच्या कालावधीत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला. तब्बल तीन हजार १२८ मि.मी. इतक्या पावसाची नोंदही करण्यात आली. पावसाच्या पाण्याने धरणे तुडूंब भरून गेले होते. त्यामुळे यावर्षी पाण्याचा दुष्काळ निर्माण होणार नाही, अशी आशा जिल्ह्यातील नागरिकांना होती. एकूण तीन हजार १२८ मि. मी. इतका पाऊस पडल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. परंतू मोठ्या प्रमाणात पाऊस पडूनही जिल्ह्यात पाण्याचा दुष्काळ कायमच असल्याचे वास्तव उघड झाले आहे. टँकरमुक्त जिल्हा करण्याच्या संकल्पनाच जिल्ह्यात कागदावरच असल्याचे चित्र आहे. मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत लघू पाटबंधारे विभागाच्या धरणांमध्ये ५४ टक्के जलसाठा शिल्लक होता. मात्र वाढती उन्हाची तीव्रता, पाण्याची वाढती मागणी अशा अनेक कारणांमुळे धरणांमधील पाण्याच्या पातळीत झपाट्याने घट होत आहे. जिल्ह्यात उन्हाळी हंगाम सुरु झाला आहे.या हंगामात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापर्यंत जिल्ह्यातील २८ धरणांमध्ये केवळ ४०.६४ टक्के जलसाठा शिल्लक राहिला आहे.या बंधाऱ्यांची एकूण साठवण क्षमता ६८.५१ दलघमी इतकी आहे. मात्र सध्या फक्त २७.९७ दशलक्ष घन मीटर पाणी उपलब्ध आहे. उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे पाण्याची मागणीही वेगाने वाढत आहे. परंतु धरणांमधील पाण्याची पातळी कमी होत असल्याचा फटका जिल्ह्यातील नागरिकांना बसत आहे.

धरणांमधील जलसाठ्यावर दृष्टीक्षेप ( टक्केवारीनुसार)

घोटवडे - ०७, ढोकशेत - ००, उन्हेरे - ०८,कोंडगाव - २३, कवेळे - १९, रानवली - १९, पुनाडे - २४, श्रीगाव - ३५, फणसाड - ४४, पाभरे - ४०, वरंध - ४६, खिंडवाडी - ४८, कोथुर्डे - ३५, खैरे - ४४, साळोख - ३२, अवसरे - ३२, डोणवत - ३७, कार्ले - ४८, कुडकी - ५०, भिलवले -५३, कलोते-मोकाशी -५० बामणोली - ५४, उसरण - ५४, वावे - ७५, सुतारवाडी - ६५, आंबेघर - ६७, संदेरी -६८, मोरबे -६४, उन्हेरे -०८

## समग्रच्या कर्मचाऱ्यांना दिलासा!

संघटनांनी आझाद मैदानात आंदोलन सुरू केले होते. आपल्याला सेवेत कायम करण्याची मागणी लावून धरली आहे. यासाठी अद्यापही हे आंदोलन सुरू आहे. दरम्यान, राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेकडून या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासंदर्भात केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असल्याचे अधिकारी सूत्रांकडून सांगण्यात आले. तसेच केंद्राकडून येत्या काही महिन्यांत समग्र शिक्षा २.0ची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होण्याची शक्यता आहे. तसेच समग्र शिक्षा २.० ही योजना राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० शी सुसंगत ठेवली जाणार आहे.

## खुन केल्याप्रकरणी आरोपीस जन्मठेप

मयत विशाल उर्फ बाळू उर्फ भीम श्रीपत जुमारे याच्यासोबत त्याच्या बहीणीचे प्रेमसंबंध होते. प्रेमसंबंधाबाबत आरोपीस समजल्यामुळे आरोपी सौरभ सावंत याने संध्याकाळी ९.३० चे सुमारास खरवली, ता. माणगाव येथील संत निरंकारी हॉलमध्ये मयत विशाल जुमारे हा मित्रांसोबत बसलेला होता. थोड्या वेळाने तेथे आरोपी सौरभ सावंत हा मयत विशाल जुमारे यास ठार मारण्याच्या उद्देशाने खिशामध्ये चाकू घेऊन आला. तसेच त्याने विशालला मारहाण करण्यास सुरूवात केली. या गुन्ह्यातील फिर्यादी दिनेश आडीत, संकेत आडीत, कल्पेश आडित, श्रीकांत तांबट, नथूराम दसवते हे होते. आरोपीविरूध्द माणगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास सपोनि. एस.बी. गायकवाड यांनी करून मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. या खटल्यामध्ये अति. शासकीय अभियोक्ता, जितेंद्र डी. म्हात्रे यांनी सरकार पक्षाच्या वतीने काम पाहिले. फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व वैद्यकीय अधिकारी, तपासी अंमलदार यांची साक्ष महत्वाची ठरली. या प्रकरणात आरोपी सौरभ उर्फ बेंडया हरिश्चंद्र सावंत यांस मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.टी. भालेराव यांनी दोषी ठरवून जन्मठेप व ३००० रूपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

## हातभट्टी चालविणे पडले महागात

या गैरप्रकाराला रोखण्यासाठी रायगड पोलिसांनी पाऊल उचलले. सामान्य जनतेचे जनजीवन सुरळीत व्हावे, दारुच्या आहारी जाऊन तरुण पिढी बिघडू नये, तसेच कोणत्याही प्रकारचा गंभीर गुन्हा घडू नये म्हणून पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी या चौघांना एक वर्षासाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश दिले. या कारवाईने बेकायदेशीर दारु विक्री, वाहतूक करणाऱ्यांना दणका मिळाला असून जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणारे,गुंगीकारक पदार्थाच्या व्यवसायात गुंतलेले, अवैध मटका, जुगार धंदे चालविणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल होऊनदेखील त्यांच्या वागणुकीत बदल दिसून आला नाहीत. तर त्यांनाही हद्दपार केले जाणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## घारापुरी बेटावर उत्खननात सापडले जार

जारचा व्यास १.२२ मीटर इतका आहे. हे जार पाणी साठवण्यासाठी वापरले जात असावेत असा अंदाज आहे. येथे रोमन ॲम्फोरा, पश्चिम आशियातील टॉर्पिडो जार, चायनीज पोर्सिलेन आणि मटर्काइझ ग्लेझ वेअरचे अवशेष सापडले आहेत. यावरून इसवी सन ४ थ्या आणि ५ व्या शतकात या बंदराचा रोम आणि पश्चिम आशियाशी थेट व्यापार असल्याचे सिद्ध होते. जार सापडलेल्या ठिकाणापासून ८० मीटर अंतरावर विटांनी बांधलेली आणि खडकात कोरलेली पाण्याची टाकी सापडली आहे. याचा वापर कापड रंगवण्याच्या प्रक्रियेसाठी केला जात असावा, असे मानले जात आहे. उत्खननात लोखंडी गोळे, दगडी नांगर तसेच कलचुरी आणि क्षत्रप काळातील नाणी सापडली आहेत.घारापुरीसारख्या खडकाळ बेटावर पाण्याची टंचाई असतानाही, प्राचीन रहिवाशांनी आणि व्यापाऱ्यांनी पाणी साठवण्यासाठी जलकुंभ आणि साठवणूक टाक्यांची केलेली रचना त्यांच्या प्रगत अभियांत्रिकी कौशल्याचे दर्शन घडवते. हे पाणी जहाजांवरील प्रवाशांसाठी आणि स्थानिक उद्योगांसाठी वापरले जात असे.

हे महत्त्वाचे अवशेष पावसाळ्यापूर्वी सुरक्षितस्थळी हलवण्याचे काम सुरू आहे. हे महाकाय जार पुनर्संचयित करून पर्यटकांच्या माहितीसाठी एलिफंटा लेण्यांच्या प्रवेशद्वारावर प्रदर्शनासाठी ठेवले जाणार आहेत. या उत्खननात डेक्कन कॉलेज पोस्ट-ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट, पुणे हे प्रमुख सहयोगी म्हणून काम पाहत असून, मुंबईच्या के. जे. सोमय्या महाविद्यालयाने यात सहभागी म्हणून योगदान दिले आहे.


### जाहीर नोटिस

सर्व लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील रेवदंडा ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नं. ८७/११, हिस्सा नं. ११ ब १ क्षेत्र ०-०३-०३ हे. आर. आकार ३०.३० रू. पै. (सिटी सर्व्हे नं. १२९८, क्षेत्र ६२८.६ चौ.मी., सत्ताप्रकार क पैकी ३०३ चौ.मी. क्षेत्र) या बिनशेती मिळकतीवर उभारण्यात आलेल्या नियोजित साईराज अपार्टमेंट या इमारतीमधील, तळमजल्यावरील निवासी सदनिका क्र. २ क्षेत्र ७५० चौ. फुट बिल्ट अप (४८८ चौ. फुट कारपेट क्षेत्र ) ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा ॲसेसमेंट दप्तरातील मालमत्ता क्र. ३३४१/२ हि निवासी सदनिका आमचे अशिलांनी तिचे विद्यमान मालक श्री. महेंद्र देविचंद जैन, रा. बोर्ली, पो. बोर्ली मांडला, ता. मुरूड, जि. रायगड यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याबाबत चर्चा सुरू केली आहे.

सदरची निवासी सदनिका पुर्णपणे निर्वेध व बोजाविरहीत असल्याची खात्री विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. तरीही सदर सदनिकेसंदर्भात अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, ताया, कब्जा, वहिवाट, तारण, दान, गहाण, लीज, लीन, कर्ज, पोटगी, इजमेंट, भाडेपट्टा, करार, साठेकरार, बक्षीसपत्र, खरेदीखत, मृत्युपत्र, वारसा हक्क, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (०७) दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती सर्व कागदोपत्री पुराव्यांसह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. उक्त मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास सदरची निवासी सदनिका पूर्णपणे निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजुन आमचे अशिल सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, व अशाप्रकारचा कुणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध असल्यास तो त्यांनी आमचे अशिलांचे लाभात जाणीवपुर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १०/०४/२०२६

सही/-
**ॲड. राकेश पी. लाडे**
'श्रीकृपा', भाऊसाहेब लेले चौक,
जुन्या नगरपालिकेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड

### अलिबाग नगरपरिषद
### फेर ई-निविदा सूचना सन २०२६-२७

अलिबाग नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडील साहित्य पुरवठा करणे कामी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई निविदा सूचना शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १०/०४/२०२६ पासून उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येईल.

सही/-
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे कडाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक काळूराम बळीराम भोईर व हरिश्चंद्र बळीराम भोईर यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २ | १५ | ०-६९-०० | ०-८४ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १०/०४/२०२६

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व
फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**ई-निविदा सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा द्वारे सिंगल पॅकेट प्रणाली अंतर्गत खालील कामासाठी विशेष मर्यादित निविदा मागवित आहे. **कामाचे नाव:** सविस्तर डिझाईन सल्लागार (डिडिसी) व साइट सेवा / पर्यवेक्षण – (i) विद्यमान 544 मीटर लांबीच्या ओल्ड गोवा बोगद्याच्या समांतर एक नवीन बोगदा तसेच विद्यमान 1561 मीटर लांबीच्या पेडणे बोगद्याच्या समांतर दुसरा नवीन बोगदा बांधकामासाठी आणि (ii) कोकण रेल्वे मार्गावरील विद्यमान ओल्ड गोवा व पेडणे बोगद्यांच्या पुनर्वसनासाठी, गोवा राज्य, भारत. **निविदा सूचना क्र.: केआर/डब्ल्यू/09/2026/02. जाहिरातीत नमूद कामाची किंमत:** रु. 17,13,50,000/- (जीएसटी वगळून). **बंद होण्याची दिनांक/वेळ:** 30.04.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाइन ऑफर/बोली सादर करण्यासाठी. **पूर्णत्व कालावधी:** 38 (अडतीस) महिने. मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील/सहभागासाठी कृपया www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. दुरुस्तीपत्रक/परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

### महाराष्ट्र शासन
### शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग, जि. रायगड
### जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड, अलिबाग.जि.रायगड

Email- deangmcalibag@gmail.com Phone No. 02141-299214 www.gmchalibag.in/gmch

"जाहिरात"

विषय:- सहाय्यक प्राध्यापक या संवर्गाची पदे ३६४ (कंत्राटी) दिवसांकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात संस्थास्तरावर निवड समितीमार्फत भरणेबाबत.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग - रायगड येथील विविध विषयातील सहाय्यक प्राध्यापक "गट- ब" या पदावर ३६४ (करार तत्त्वावर) दिवसांकरीता तात्पुरती नियुक्ती जाहिरात देण्यात येत आहे. सदर जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर (www.gmchalibag.in/gmch) तसेच मा. संचालनालयाच्या (www.med-edu.in.) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. रिक्त पदे, अर्जाचा विहित नमुना व अटी शर्ती इ. अधिक तपशील पाहण्याकरिता वरील दिलेल्या संकेतस्थळावर भेट देण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १) | उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचा कालावधी | दि. १०/०४/२०२६ ते दि. २०/०४/२०२६ सकाळी ११.०० ते सायं. ०५.०० वाजेपर्यंत. (सुटीचे दिवस वगळुन) |
| २) | मुलाखतीचा दिनांक | दि. २२/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता |
| ३) | मुलाखतीचे ठिकाण | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड (परिषद हॉल) |

सही/-
**(डॉ. पूर्वा पाटील)**
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
अधिष्ठाता,
अलिबाग- रायगड

विमाका/कोवि/२०२६-२०२७/०५

### अलिबाग नगरपरिषद, अलिबाग
### वार्षिक जाहीर फेर निविदा सूचना सन २०२६-२७

अलिबाग नगरपरिषद इच्छुक ठेकेदार/पुरवठादार यांच्याकडून खालील सेवेसाठी दप्तर विभागांकडून सन २०२६ वर्षाकरीता खुर्च्या पुरविणे याकरिता फेर जाहिर निविदा मागविण्यात येत आहेत.

| विभाग | कामाचे नाव | इसारा रक्कम | निविदा फॉर्म किंमत | निविदा फॉर्म मिळणेची अंतिम तारीख वेळ | सिलबंद निविदा सादर करणेची अंतिम तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| दप्तर विभाग | कार्यालयासाठी खुर्च्या पुरविणे सुप्रिम कंपनी फोमच्या खुर्च्या ५० नग (लाल) व प्लॅस्टिक खुर्च्या ५० नग (बिनहाताच्या) प्लॅस्टो किंवा अन्य कंपनी | ३०००/- | ३००/- | १०/०४/२०२६ ते १६/०४/२०२६ कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत. | १७/०४/२०२६ सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत.. |

सदरचे फेर निविदाबाबत अधिक माहिती कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) संबंधित दप्तर विभागात मिळेल. तसेच उर्वरित अटी व शर्ती अलिबाग नगरपरिषद फेर निविदा फॉर्ममध्ये समाविष्ट केलेल्या आहेत.

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**अलिबाग नगरपरिषद,**


## डॉ.जगदाळे यांची मंत्रालयात सहसचिवपदी नियुक्ती

**म्हसळा :** राज्य प्रशासनात अनुभवी अधिकारी म्हणून ओळख असलेले डॉ. दिलीप जगदाळे यांची सहसचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई येथे नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. जगदाळे यांनी यापूर्वी महाडिस्कॉम, कल्याण येथे सह व्यवस्थापकीय संचालक म्हणून उत्कृष्ट कामगिरीची छाप सोडली होती. महसूल विभागात विविध पदांवर काम करताना त्यांनी लोकाभिमुख अधिकारी म्हणून ओळख निर्माण केली.


### कोकण मर्कंटाईल को-ऑप. बँक लिमिटेड मल्टी स्टेट बँक
Since 1973

**नोंदणीकृत कार्यालय:** १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी. मुंबई ४०००१०. | दूरध्वनी : २३७२३७५३, २३७२९९६९, २३७२९९७०, २३७२९९७१, २३७३४२०२, २३७३४३११. फॅक्स: २३७४८५८९ | वेबसाईट : www.kokanbank.net

### ताबा सूचना

ज्याअर्थी कोकण मर्कंटाईल को- ऑप. बँक लि. चे प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अमंलबजावणी) नियमन २००२ च्या नियम ८ आणि ९ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार, गहाणवटदार आणि जामीनदार यांना बँकेची देणी परतावा करण्याची मागणी करणारी मागणी सूचना पारित केली होती.

| अ. क्र. | कर्ज खात्याचा तपशील | मागणी सूचनेचा दिनांक | दि. ०६.११.२०२५ दि. ०६.११.२०२५ दि. १०.११.२०२५ दि. १०.११.२०२५ रोजीची मागणी सूचनेची स्थिती | दि. ०९.०४.२०२६ रोजीनुसारची थकबाकी रक्कम | ताबा घेतल्याचा दिनांक | मालमत्तेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्ज खाते क्र. 5071/12420 गोवंडी शाखा १. श्री. सोहराब अब्दुल हमीद खान - कर्जदार/गहाणवटदार २. श्री. मकसूद आलम अंसारी - जामीनदार ३. श्री. शहीद हुसैन खान - जामीनदार ४. श्रीमती फिरदोश बानो सोहराब खान - जामीनदार ५. श्री. पठाण मोह. शफिक अख्तर - जामीनदार | १०.११.२०२५ | रु. ४३,८३,९८७.६० | रु. ४६,६१,४२८.६० | ०७.०४.२०२६ | नोंदणीकरण जिल्हा खालापूर आणि जिल्हा रायगडमधील खोपोली नगर परिषदेच्या हद्दीमधील दुकान क्र. ०४, तळमजला, सागर अपार्टमेन्ट्स, प्लॉट क्र. ०४, सर्व्हे क्र. २६/४ एर, सीटीएस क्र. ९४३, गाव चिंचवली शेकिन, खोपोली तालुका, खालापूर, जिल्हा रायगड, मोज. ४५० चौ.फू. (बि.अ.) |
| २ | कर्ज खाते क्र. 5069/12871 गोवंडी शाखा १. श्रीमती नूरजहान शमिन खान - कर्जदार/गहाणवटदार २. श्रीमती हलिमा अल्लाउद्दीन शेख - जामीनदार ३. श्री. गुलनवाझ मोह. शमिम खान - जामीनदार ४. श्री. खान वकील अहमद - जामीनदार | १०.११.२०२५ | रु. ३३,४४,२८७.८९ | रु. ३५,२४,३३७.८९ | ०७.०४.२०२६ | नोंदणीकरण उप जिल्हा खालापूर नोंदणीकरण जिल्हा रायगड मधील सदनिका क्र. १०२ मोजमाप ६१९ चौ.फू. सागर अपार्टमेन्ट्स, प्लॉट क्र. ०४, सर्व्हे क्र. २६/४ एर, सीटीएस क्र. ९४३, गाव चिंचवली शेकिन खोपोली ता. खालापूर, जिल्हा रायगड. |
| ३ | कर्ज खाते क्र. 5071/12885 गोवंडी शाखा १. श्री. अनिल ओमप्रकाश पुरोहित - कर्जदार/गहाणवटदार २. श्री. खान मकसुद अहमद गुलाम - जामीनदार ३. श्री. सय्यद हैदर मोह. अहसेम मेहदी - जामीनदार ४. श्री. पुरोहित - जामीनदार | २१.११.२०२५ | रु. ४९,०५,१६९.३१ | रु. ५२,१४,६८३.३१ | ०७.०४.२०२६ | नोंदणीकरण उप जिल्हा खालापूर आणि नोंदणीकरण जिल्हा रायगड मधील दुकान क्र. २ मोजमाप ४४९ चौ. फू. तळमजला, सागर अपार्टमेन्ट्स, प्लॉट क्र. ०४, गाव चिंचवली शेकिन, खोपोली, ता. खालापूर, जिल्हा रायगड, सर्व्हे क्र. २६/४ एर, सीटीएस क्र. ९४३. |
| ४. | कर्ज खाते क्र. 5069/12825 गोवंडी शाखा १. श्रीमती हलिमा अल्लाउद्दीन शेख - कर्जदार/गहाणवटदार २. श्रीमती नूरजहान शमिम खान - जामीनदार ३. श्री. शेख सलीम अब्दुल फैझ - जामीनदार | २१.११.२०२५ | रु. ३५,३४,९८०.९० | रु. ३७,२१,५८२.९० | ०७.०४.२०२६ | नोंदणीकरण उप जिल्हा आणि जिल्हा खोपोली आणि रायगड मधील खोपोली नगर परिषदेच्या हद्दीमधील सदनिका क्र. २०२, मोजमाप क्षेत्रफळ ६१९ चौ. फू. (बि.अ.) सागर अपार्टमेन्ट्स, २रा मजला, प्लॉट क्र. ०४, सर्व्हे क्र. २६/४ एर, सीटीएस क्र. ९४३, गाव चिंचवली शेकिन, खोपोली, ता. खालापूर, जिल्हा रायगड. |

कर्जदार, गहाणवटदार आणि जामीनदार सदर रक्कम परतावा करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार, गहाणवटदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सदर कायद्याच्या नियम ८ आणि ९ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून यावर वर्णन केल्यानुसार मालमत्तेचा दि. ०७.०४.२०२६ रोजी ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदार, गहाणवटदार आणि जामीनदार आणि सर्वसाधारण जनता याद्वारे सूचित करण्यात येते की, सदर मालमत्तांबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि या मालमत्तांबाबत कोणताही व्यवहार हा कोकण मर्कं. को- ऑप. बँक लि.च्या प्रभारास अधीन असेल.

**नियम ८ (६) सह वाचावयाच्या सरफैसी कायदा २००२ अन्वये वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना**

कर्जदार, सह-कर्जदार, गहाणवटदार, पुष्टी करणारे पक्षकार, संमती देणारे पक्षकार आणि जामीनदार यांना याद्वारे सूचित करण्यात येते की मागणी सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार रक्कम व त्यासह आजपर्यंतचे व्याज आणि सहाय्यक खर्च आजपासून ३० दिवसांच्या आत भरणा करावे, असे न केल्यास मालमत्ता विक्रीस ठेवल्या जातील आणि शिल्लक देणी जर असल्यास व्याज आणि शुल्कासह वसूल केली जातील

**ठिकाणः रायगड**
**दिनांक : १०.०४.२०२६**

**कोकण मर्कंटाईल को- ऑप. बँक लि. करिता**
**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**

### महाराष्ट्र शासन
### सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड अलिबाग यांचे कार्यालय**
**कॉंग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड**
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा. क्र. जिउनि/गृह/मोफा क्र. ११/मा. अभि./जाहीर नोटीस/ / सन २०२६ दिनांक :- ०७/०४/२०२६

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

श्री गणेशकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नाना मास्तर नगर मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि.रायगड तर्फ सचिव श्री. विलास बबन शिंदे श्री. सुश्रुत रमेश भोपतराव (समिती सदस्य) यांनी विकासक व जागामालक विकासक/जमिनमालक १. मे. आर सी.सी. कन्स्ट्रक्शन आणि डेव्हलपर्स तर्फे प्रो. प्रा. श्री. राकेश चंद्रकांत चौडीय. ५१०, रा. कोतवाल नगर, ए. जे. मंदिर कॉलेज जवळ, कर्जत. ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१. २. श्री. सुभाष मारुती मुसळे ३. श्री. सुरेश मारुती मुसळे, ४. श्री. शशी मारुती मुसळे, ५. श्री. राजेंद्र मारुती मुसळे, ६. वंदना बाळकृष्ण चव्हाण. ७. अलका प्रभाकर सकपाळ, ८. शोभा शंकर कदम, पत्ता- सर्व राहणार नाना मास्तर नगर. खंडोबा मंदिर जवळ, मुद्रे खुर्द, कर्जत, ता. कर्जत जि. रायगड ४१० २०१ यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**गाव मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग-२०/१/अ/८, क्षेत्र ५६३.२० चौ.मी.**

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतिम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक २३/०४/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक ०७/०४/२०२६

**(त.सं.पाटील)**
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड अलिबाग

### महाराष्ट्र शासन
### सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड अलिबाग यांचे कार्यालय**
**कॉंग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड**
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा. क्र. जिउनि/गृह/मोफा क्र. ११/मा. अभि./जाहीर नोटीस/ / सन २०२६ दिनांक :- ०७/०४/२०२६

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

चंदन अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या; सर्व्हे नं. २/३, प्लॉट नं. ३, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड तर्फे सचिव यांनी विकासक व जागामालक चंदन बिल्डर्सतर्फे १) शांताराम बाळू चंदन, २) अनंत बाळू चंदन, ३) मधुकर बाळू चंदन, ४) बबन बाळू चंदन (मयत) यांचे वारसदार, ४.१) महेंद्र बबन चंदन, ४.२) विलास बबन चंदन, ४.३) मंगेश बबन चंदन, ४.४) आरती बबन चंदन, ४.५) बळीराम बाळू चंदन (मयत) यांचे वारस, ४.५ १) लिला बळीराम चंदन, ४.५ २) प्रशांत बळीराम चंदन, ४.५ ३) दिप्ती अनिल निचिते, ५) महेश बाळू चंदन (मयत) यांचे वारस, ५.१) श्रेयश रमेश चंदन, ५.२) स्वप्नाली रमेश चंदन, ५.३) छाया रमेश चंदन, ५.४) सामिरा रमेश चंदन, पत्ता- सर्व रा. चंदन हाऊस पाटील आळी, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१ यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**गाव कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग-२/३/३, क्षेत्र ३४७.५८ चौ.मी.**

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतिम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक २३/०४/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक ०७/०४/२०२६

**(त.सं.पाटील)**
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड अलिबाग



### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



### जाहीर सूचना

**याद्वारे सर्व संबंधितांना सूचना देण्यात येते की,** आम्ही, आमच्या अशिलांच्या वतीने **(१) पंकज कपाल मेहरा, (२) वनिता पंकज मेहरा, (३) ऋषी पंकज मेहरा आणि (४) कबीर पंकज मेहरा** (एकत्रितपणे "**जमीन मालक**"), सर्व सज्ञान, भारतीय रहिवाशी, राहणार : ६ डी प्रेम कुटीर, १७७ मरिन ड्राइव्ह, मुंबई ४०० ०२० यांच्या खालील **पहिल्या परिशिष्टामध्ये** अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या आणि गाव धोकावडे, तालुका अलिबाग व जिल्हा रायगड येथील **गट क्र. २५/५, ३९९, ४०० आणि ४०१** आणि एकूण क्षेत्रफळ **१०,९७० चौरस मीटर** म्हणजेच सुमारे **२.७१ एकर** च्या समतुल्य जमिनीच्या त्या सर्व तुकड्यांच्या आणि भागांच्या तसेच त्यावर उभ्या असणाऱ्या संरचनांच्या (यात यानंतर "**मालमत्ता**" असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) संबंधातील मालकी अधिकार, हक्क आणि हितसंबंधांची चौकशी करीत आहोत.

तसेच जमीनमालकांनी आमच्या अशिलांना असे सांगितले आहे की, खालील **दुसऱ्या परिशिष्टामध्ये** अधिक विशेषरित्या वर्णन केल्याप्रमाणे मूळ हक्क विलेख दस्तऐवज आणि विलेख हरवलेले/ गहाळ झालेले आहेत (यात यानंतर एकत्रितपणे "**गहाळ झालेले हक्क विलेख दस्तऐवज**" असा उल्लेख करण्यात आलेला आहे.)

कोणत्याही व्यक्ती/संस्था यांना सदर मालमत्तेमधील किंवा त्यातील कोणत्याही भागातील आणि/किंवा गहाळ झालेल्या हक्क विलेख दस्तऐवजाच्या संबंधातील कोणत्याही स्वरूपाची विक्री, सामंजस्य ज्ञापन, हस्तांतरण, अभिहस्तांतरण, अदलाबदल, वाटप, आकार, भार, भाडेदारी, पोट-भाडेदारी, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, अनुज्ञप्ती, गहाण, (समन्याय किंवा अन्यथा), वारसा, भोगवटा, कब्जा, विभाजन, शेअर, बक्षीस, मृत्युपत्र, धारणाधिकार, आकार, निर्गम, विकास अधिकार, परिरक्षा, सुविधाधिकार, न्यास, प्रसंविदा किंवा अट, सुविधाधिकार, अधित्याग, अधित्यजन, किंवा कोणत्याही पद्धतीने कोणताही करारनामा, करार, विलेख, दस्तऐवज, लिखिते, अभिहस्तांतरण विलेख, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था/ तडजोड, विवाद, कोणतेही न्यायालय किंवा न्यायाधिकरण, महसूल किंवा संविधिमान्य प्राधिकरण किंवा लवाद यांनी संमत केलेला हुकूमनामा किंवा आदेश किंवा निवाडा किंवा अभिरक्षा किंवा नियंत्रण किंवा कोणत्याही स्वरूपाचे अन्य काही असेल तर त्या द्वारे किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही हिस्सा, अधिकार, हक्क, हितसंबंध, दावा, आक्षेप, आणि/किंवा मागणी (प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे) असेल तर त्यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना वन वर्ल्ड सेंटर, ७वा मजला, टॉवर २ए, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई - ४०००१३ येथे आणि तसेच monika.bhonsale@trilegal.com आणि maithili.vagal@trilegal.com या इ-मेल वर या जाहिरातीच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत त्यातील दस्तावेजी पुराव्याच्या पूर्ण आणि प्रमाणित केलेल्या सत्य प्रतींसह लेखी स्वरूपामध्ये सूचित करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा अशा व्यक्तींचा कोणताही दावा किंवा कोणतेही दावे, जर काही असतील तर, त्यांचा अधित्याग आणि /किंवा परित्याग करण्यात आलेला आहे असे समजण्यात येईल आणि ते कोणत्याही पद्धतीने बंधनकारक राहणार नाहीत.

**पहिले परिशिष्ट**
**(मालमत्तेचे वर्णन)**

गाव धोकावडे, तालुका अलिबाग व जिल्हा रायगड येथील अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या खालील प्रमाणे गट क्र. आणि क्षेत्रफळ असलेल्या जमिनीचे ते सर्व तुकडे आणि भाग, एकूण क्षेत्रफळ **१०,९७० चौरस मीटर** म्हणजेच सुमारे २.७१ एकर जमिनीचे ते सर्व तुकडे आणि भाग :

| गट क्र. | जुना सर्व्हे क्र | क्षेत्रफळ (चौरस मीटर मध्ये) |
|---|---|---|
| २५/५ | १) सर्व्हे क्र. २ए१/३ए+३बी१ २) सर्व्हे क्र. १९५/१, ३) सर्व्हे क्र. १९४/५ आणि ४) सर्व्हे क्र. १९६/१ | ७,७०० |
| ३९९ | १९५/२ | १,७४० |
| ४०० | १९५/३ | ७०० |
| ४०१ | १९५/४ | ८३० |
| एकूण | | १०,९७० चौरस मीटर (म्हणजेच, सुमारे २.७१ एकर) |

आणि खालील प्रमाणे सिमित असलेले :

उत्तर दिशेकडे : गाव रस्ता, गट क्र. ३९८ ची हद्द आणि काही अंशी गट क्र. २५/३ ची हद्द.

दक्षिण दिशेकडे : धोकावडे गावातील गट क्र. ७०२, ७०१ आणि ७०० च्या सीमा

पूर्व दिशेकडे : धोकावडे गावातील गट क्र. ३९८, ४०५ आणि ६९६ ते ७०० च्या सीमा.

पश्चिम दिशेकडे : धोकावडे गावातील गट क्र. २५/३ व २५/४ च्या सीमा

**दुसरे परिशिष्ट**
**गहाळ झालेल्या**
**हक्क विलेख दस्तऐवजांचे वर्णन**

१. चंद्रकांत जानू शिरीषकर यांच्या नावे नारायण गोविंद म्हात्रे यांनी आणि त्यांच्या दरम्यान कार्यान्वित केलेला अनु. क्रमांक एएलबी/२५४६ सन २००६ अनुसार हस्तांतरण उप- निबंधक, अलिबाग यांच्या कार्यालयामध्ये नोंदणीकृत केलेला दि. ०५ सप्टेंबर,२००६ रोजीचा खरेदीखत.

२. चंद्रकांत जानू शिरीषकर यांच्या नावे सुनंदाबाई हरिश्चंद्र तोडणकर आणि इतर यांनी कार्यान्वित केलेला अनु. क्रमांक एएलबी/१९९८ सन २००६ अनुसार हस्तांतरण उप- निबंधक, अलिबाग यांच्या कार्यालयामध्ये नोंदणीकृत केलेला दि. १० जुलै २००६ रोजीचा खरेदीखत.

३. चंद्रकांत जानू शिरीषकर यांच्या नावे केशव नारायण पाटील यांनी कार्यान्वित केलेला अनु. क्रमांक एएलबी/४०३ सन २००५ अन्वये हस्तांतरण उप- निबंधक, अलिबाग यांच्या कार्यालयामध्ये नोंदणीकृत केलेला दि. ०३ मार्च, २००५ रोजीचा खरेदीखत.

**आज दिनांक १० एप्रिल, २०२६**

**मोनिका भोसले**
**भागिदार**
**ट्रायलिगल**
वकील आणि सॉलीसिटर्स
वन वर्ल्ड सेंटर, ७वा मजला,
टॉवर २ए, सेनापती बापट मार्ग,
लोअर परेल (पश्चिम), मुंबई ४०००१३

# निवडक

## बागायतदारांची चिंता वाढली



**तळा** : तळा तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे आंबा पिकावर मोहर करपा व फळगळ सारखी समस्या निर्माण झाली आहे. यामुळे आंबा बागायतदारांची चिंता वाढली असून हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती बागायतदार शेतकरी व्यक्त करीत आहेत. तळा तालुक्यात गेल्या चार दिवसांपासून ढगाळ वातावरण असल्यामुळे आंब्यावरील मोहर कालपटली असून फळगळ देखील मोठ्या प्रमाणात सुरू आहे. तालुक्यातील कर्नाळा, फळशेत, निगुडशेत, वावे, अडणाले, टोकार्डे, राणेची वाडी आदी गावात कलमी, हापूस, पायरी यांसारख्या विविध जातीच्या आंब्याचे पीक घेतले जाते. यावर्षी कड्याकाची थंडी पडल्याने आंबा देखील चांगला मोहोरला आहे. परंतु गेल्या काही दिवसांपासून असलेल्या ढगाळ वातावरणामुळे या आंबा पिकाला धोका निर्माण झाला आहे. अशातच ढगाळ वातावरणामुळे याहीवर्षी नुकसान होण्याची शक्यता असल्याने तळा तालुक्यातील आंबा बागायतदार संकटात सापडले आहेत.

## किरकोळ वादातून तरुणावर हल्ला

**पनवेल** : किरकोळ वादातून थेट प्राणघातक हल्ल्यापर्यंत पोहोचलेल्या धक्कादायक घटनेने कामोठे परिसरात खळबळ उडाली आहे. तीच्या सोबत का बोलतोस, या कारणावरून १७ वर्षीय युवकावर धारधार शस्त्राने हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. जिगर पावणेकर असे जखमी झालेल्या युवकाचे नाव असून तो कामोठे परिसरातील रहिवासी आहे. या हल्ल्यात जिगरच्या पाठीवर आणि हातावर गंभीर जखमा झाल्या आहेत. जिगर पावणेकर (वय १७, रा. कामोठे) असे जखमी युवकाचे नाव आहे. कामोठे सेक्टर ३६ येथील झुडियो मॉल परिसरात ही घटना घडली. एका तरुणीने फोन करून बोलावल्याने जिगर कामोठे सेक्टर ३६ येथील झुडियो मॉल जवळ गेला होता. त्या वेळी त्या ठिकाणी ती तरुणी देखील उपस्थित होती. दोघांचे बोलणे सुरू असताना त्या परिसरात उपस्थित असलेल्या काही अज्ञात युवकांनी स्वतःच्या जवळ असलेल्या धारधार शस्त्राने त्याच्यावर हल्ला चढवला. मात्र जिगरने घटना स्थानावरून पळ काढल्याने त्याचे प्राण वाचले. या हल्ल्यात त्याच्या पाठीवर आणि हातावर खोल जखमा झाल्याच्या अवस्थे मध्ये त्याला कामोठेमधील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले, त्यावेळी तो रक्तबंबाळ अवस्थेमध्ये होता.





## ताडगोळ्यास मागणी वाढली

**उरण** : उरण तालुक्यात दिवसेन-दिवस वातावरणातील उष्णता वाढल्याने उष्णतेपासून थंडावा मिळावा त्यासाठी ताडगोळे खाणाऱ्याची संख्या वाढलेली आहे. ताडगोळे खाण्यास गोड व थंड असल्याने नागरिक खाणे पसंत करीत आहेत. शहरात ठीक-ठिकाणी ताडगोळे हात गाडीवर विकण्यासाठी आले आहेत. शहरातील गणपती चौक येथील हातगाडीवर ताडगोळे विकले जातात. दुपारी ताडगोळे खरेदी करण्यास खूपच गर्दी दिसते. नरम व चांगले सध्या बाजारात १२० रुपये डझन या भावाने विकले जातात असे, मेघा अनिल नार्वेकर यांनी सांगितले.



## अतिक्रमणाविरुद्ध विशेष मोहीम

**रसायनी** : रसायनी पोलीस ठाणे, ग्रुप ग्रामपंचायत वासांबे व ग्रुप ग्रामपंचायत चांभार्ली यांच्या संयुक्त विद्यमाने गावातील रस्त्यांवरील अतिक्रमणाविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. दांड रसायनी रस्ता, बाजारपेठ परिसरात काही दुकानदारांनी आपल्या दुकानातील माल रस्त्यालगत असलेल्या गटारावर-नाल्यावर ठेवून अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे तसेच आपत्कालीन सेवांनाही अडचणी निर्माण होतात. संबंधित दुकानदारांना त्यांनी त्वरित स्वतःहून रस्त्यावरील गटारावर ठेवलेला माल काढून घ्यावा व अतिक्रमण दूर करावे. अन्यथा, ग्रामपंचायत व पोलीस प्रशासनाकडून संयुक्त कारवाई करून अतिक्रमण हटविण्यात येईल व संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. ही मोहीम लवकरच राबविण्यात येणार असल्याचे रसायनी पोलीस स्टेशन तसेच ग्रामपंचायत विभागांनी दिली आहे.

## अनधिकृत बांधकामांवर कारवाई

**पनवेल** : सिडको क्षेत्रात कोणताही विकास परवाना न घेता करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे सत्र सिडकोतर्फे हाती घेण्यात आले आहेत. सिडकोचे सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सिडकोच्या अनधिकृत बांधकामे नवी मुंबई विभागातर्फे खारघर नोड से-१०,११ व १८ येथील भूखंडावरील अनधिकृत स्टॉल्स, भंगाराची दुकाने, लोखंडी पत्राशेड व झोपडपट्टी आदी बांधकामे निष्कासीत करून अंदाजे ३६०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड मोकळा करून घेतला आहे. खारघरनोडमधील अनधिकृत बांधकामे सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करून व सिडको महामंडळाकडून कोणत्याही स्वरूपाची अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आल्यामुळे ती निष्कासीत करण्यात आली आहेत. सदरची कारवाई नियंत्रक अनधिकृत बांधकामे नवी मुंबई विभागाचे अधिकारी व कर्मचारी, स्थानिक पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने यशस्वीपणे राबविण्यात आली.

### ग्रामपंचायतींचा पोटनिवडणूक कार्यक्रम जाहीर

# माणगाव १६ ठिकाणी मतदान

**इच्छुक असलेल्या उमेदवारांची धावपळ सुरु**



**| माणगाव | प्रतिनिधी |**

राज्यातील ग्रामपंचायतींतील सदस्य, थेट सरपंच यांच्या निधन, राजीनामा, अनहर्ता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणुकांसाठी पारंपारिक पद्धतीने राबविण्यात येणार निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने राजकीयदृष्ट्या रायगड जिल्ह्यात महत्वपूर्ण अशा ओळखल्या जाणाऱ्या माणगाव तालुक्यातील १६ ग्रामपंचायतींचा पोटनिवडणूक कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला आहेत.

यासाठी मंगळवारी (दि.२८) एप्रिल रोजी मतदान घेण्यात येणार आहे. याकरिता तालुक्यातील ग्रामीण भागातील विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांची लगबग सुरु झाली आहे. निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांची धावपळ सुरु झाली आहे.

तालुक्यातील पळसप व टोळखूर्द ग्रामपंचायतीत थेट सरपंच पदासाठी निवडणूक जाहीर झाली आहे. तर तालुक्यातील अंबर्ले, काकल, पहेल, हरकोल, विहूले, कुमशेत, शिरवलीतर्फे निजामपूर, देगाव, वडवली, वणीमलईकोंड, गांगवली, नांदवी, गोवेले या ग्रामपंचायतीत रिक्त असलेल्या प्रत्येकी एका जागेसाठी तर तालुक्यातील दहिवलीतर्फे गोवेले ग्रामपंचायतीत रिक्त असलेल्या दोन जागांसाठी पोटनिवडणुकींचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी तहसीलदारांनी निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करण्याचा दि.३० मार्च २०२६, नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा मंगळवार दि. ७ एप्रिल २०२६ रोजी ते सोमवार दि.१३ एप्रिल २०२६ पर्यंत वेळ सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत (शनिवार दि.११ व रविवार दि.१२ एप्रिल वगळून), नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दि.१५ एप्रिल २०२६ रोजी बुधवारी सकाळी ११ वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत, नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दि.१७ एप्रिल २०२६ शुक्रवार दुपारी ३ वाजेपर्यंत, निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दि.१७ एप्रिल २०२६ शुक्रवारी दुपारी ३ वाजल्यानंतर, आवश्यक असल्यास मतदानाचा दि. २८ एप्रिल २०२६ मंगळवार सकाळी ७:३० वाजल्यापासून ते सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत, मतमोजणी व निकाल घोषित करण्याचा दि.२९ एप्रिल २०२६ बुधवार (मतमोजणीची ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसीलदार निश्चित करतील त्यानुसार राहील, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधीसूचना प्रसिद्ध करण्याचा अंतिम दि.६ मे २०२६ बुधवारपर्यंत राहील असा निवडणुकीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे.

# पनवेल महापालिकेचा 'गजब' कारभार



**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल, ग्रामीण, प्रतिनिधीखारघर सेक्टर ७ येथील हिरानंदनी परिसरासमोर पनवेल महानगरपालिकेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी परिस्थिती निर्माण झाली आहे. वाढत्या लोकसंख्या आणि वाहतुकीच्या ताणाच्या पार्श्वभूमीवर रस्ता रुंद करण्याची गरज असताना, प्रत्यक्षात रस्त्याची रुंदी कमी करण्यात आल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

पूर्वी या ठिकाणी नागरिकांना चालण्यासाठी तसेच वाहनांसाठी पुरेसा मोकळा रस्ता उपलब्ध होता. मात्र सध्या गार्डन आणि फुटपाथच्या नावाखाली रस्त्याचा मोठा भाग व्यापण्यात आल्याने वाहतूक कोंडीची समस्या अधिक तीव्र झाली आहे. परिणामी पादचारी व वाहनचालकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून आपत्कालीन सेवांनाजसे ॲम्ब्युलन्स व अग्निशमन दलमार्ग काढणे ही कठीण झाले आहे. ही कामे नेमकी कोणत्या नियोजनानुसार आणि कोणत्या गरजेपोटी करण्यात आली, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. रस्ता रुंद करण्याऐवजी तो अरुंद करणे हे नागरिकांच्या सोयीपेक्षा अडचणी वाढवणारे ठरत असल्याची टीका होत आहे.

या संदर्भात नंदु कचरू वारुंगसे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महानगरपालिकेकडे निधी उपलब्ध असेल, तर तो खारघरमधील खराब रस्ते, ड्रेनेज व्यवस्था आणि पाणीपुरवठायावर खर्च करणे अपेक्षित आहे. मात्र अनावश्यक कामांवर लाखो-कोट्यवधी रुपयांचा अपव्यय होत असल्याचे दिसते, असे त्यांनी सांगितले.

## पशु-पक्षी उन्हामुळे कासावीस

**महाड** : तीव्र उन्हाच्या झळा जाणवू लागल्याने त्याचा जनजीवनावर देखील परिणाम होत असून त्याचबरोबर उन्हाच्या ताडाख्यामुळे पशु पक्षीही कासावीस झाले आहेत. रस्त्याबाजूला एखाद्या झाडाखाली, निवारा गाठताना पशु पाहायला मिळत आहेत. रखरखत्या उन्ह वाढू लागल्याने त्याचा जनजीवनावर मोठा परिणाम होत असल्याचे जाणवू लागल्याचे पाहायला मिळत आहे. सकाळपासून सायंकाळ पर्यंत उष्णतेचे चटके सहन करावे लागत आहेत. मानवासह इतरही जीवसृष्टी वाढत्या तापमानवाढीमुळे हैराण झाले आहेत.

# जुने साहित्य ठेकेदाराकडून लंपास

- कालव्यावरुन मोठया प्रमाणात नागरिकांची ये-जा
- चार ते पाच हजार किलो वजनाचा लोखंडी पूल



**| पेण | प्रतिनिधी |**

हेटवणे कालवा हा हेटवणे धरण ते कांदळेपाडा ग्रामपंचायतीपर्यंत असून, या कालव्यातून मोठयाप्रमाणात पाणी गळती होत असल्याने शासनाने नव्याने पूर्ण कालव्यामधून पाईपद्वारे शेतकऱ्यांना पाणी देण्याचे ठरविले असून, या वर्षी कालव्याला पाणी न सोडता पाईपलाईनचे काम युध्दपातळीवर सुरु आहे. परंतु, या कालव्यावरुन मोठयाप्रमाणात नागरिकांना ये-जा करण्यासाठी लोखंडी पूल बांधण्यात आले होते. साधरणतः एका पूलाचा विचार करता चार ते पाच हजार किलो वजनाचा लोखंडी पूल होता. अशा प्रकारचे साधरणतः चाळीस ते पन्नास पूल या कालव्यांवर बांधण्यात आले होते. मात्र ठेकेदाराने पाईप लाईनचे काम सुरु होताच आधिकाऱ्यांच्या आर्शिवादाने हे पूल काढून भंगारात विकल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. यामध्ये तीन ते चार लोखंडी पूल शिल्लक आहेत. महत्वाची बाब म्हणजे एखाद्या सरकारी प्रकल्पातील जुन्या वस्तू या सरकार दरबारी रितसर जमा करून त्यांचा लिलाव करण्यात येतो. परंतु, या कालव्यांवरील हे पूल एका युवा राजकीय नेत्याला हाताशी धरून भंगारात विकण्यात आले आहेत.

याबाबत या कामावर देखरेख करणारे अधिकारी अल्पेश पाटील यांच्याशी कार्यालयात जाऊन तीन वेळा संपर्क करण्याचा प्रयत्न केला. परंतु संपर्क झाला नाही. तसेच या कार्यालयाच्या प्रमुख कपले यांच्याबरोबर देखील संपर्क करण्याचा प्रयत्न केला. परंतू त्यांनी हेतूपूरस्तर प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना टळले. त्या दरम्यात अल्पेश पाटील यांना भ्रमंती ध्वनीवरून संपर्क झाल्यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना उडवा उडवीची उत्तर दिली आहेत. यावरून निश्चितच हे लोखंडी जुने पूल विकण्यामागे अधिकारी वर्गाचा हात तर नाही ना? असा ही संशय व्यक्त होत आहे. तसेच स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार सदरील अवजड पूल हे ठेकेदाराच्याच यंत्र सामुग्रीने काढण्यात आले असल्याचे समजते. या कामातील या जुन्या साहित्यांमध्ये ठेकेदार राजकीय मंडळी आणि अधिकाऱ्यांनी संगनमताने मोठा भ्रष्टाचार केला आहे. या बाबत प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी जलसंपदा मंत्र्यांची लवकरात लवकर तातडीने भेट घेऊन सर्व प्रकार त्यांच्या कानावर टाकणार आहेत.

# बीएलओंचा भार चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांवर



- १९ कर्मचाऱ्यांचे प्रशासनाविरोधात निवेदन सादर
- प्रशासनाच्या निर्णयक्षमतेवरच प्रश्नचिन्ह

**| उरण | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील निवडणूक प्रक्रियेत उरण नगरपरिषद प्रशासनाचा भोंगळ आणि मनमानी कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. केंद्रस्तरीय अधिकारी सारखी जबाबदारीची कामे चक्क चतुर्थ श्रेणी (वर्ग ४) कर्मचाऱ्यांच्या गळ्यात टाकण्याचा प्रकार उघडकीस आला आला आहे. प्रशासनाच्या निर्णयक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहेत.

बीएलओ पदाचे काम हे पूर्णतः ऑनलाईन आणि इंग्रजी भाषेत पार पाडावे लागते. अशा परिस्थितीत तांत्रिक ज्ञान नसलेल्या कर्मचाऱ्यांवर ही जबाबदारी लादणे म्हणजे अपयशाची बीजं पेरण्यासारखं असल्याची संतप्त भावना कर्मचाऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

शासनाचे नियम आणि निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांना धाब्यावर बसवत, हे काम तृतीय श्रेणी (वर्ग ३) कर्मचाऱ्यांकडून करून घेण्याऐवजी चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांवर लादण्यात आले आहे. हा प्रकार केवळ नियमभंग नसून निवडणूक प्रक्रियेलाच धोक्यात टाकणारा आहे.

अन्यायकारक निर्णयाविरोधात उरण नगरपालिकेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी थेट आक्रमक भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले आहे. या निवेदनावर तब्बल १९ कर्मचाऱ्यांच्या सह्या असून, प्रशासनाविरोधातील असंतोष स्पष्टपणे दिसून येत आहे. याबाबत माहिती कर्मचारी विजय पवार यांनी दिली आहे.

आम्हाला इंग्रजी आणि ऑनलाईन प्रणालीचे पुरेसे ज्ञान नसताना हे काम देणे म्हणजे आमच्यावर अन्याय आहे, असा थेट आरोप कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे. आता प्रश्न असा आहे की, प्रशासन या संतप्त कर्मचाऱ्यांच्या आवाजाकडे लक्ष देणार का? की पुन्हा एकदा डोळेझाक करून निवडणूक प्रक्रियेला धोक्यात टाकणार? उरणमध्ये या प्रकरणावरून आता संघर्ष भडकण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# रेवदंड्यात मच्छीमार्केटच्या उद्घाटनावरून संभ्रम



**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

रेवदंडा हायस्कूल शाळेच्या बाजूच्या वाटेने स्मशान भूमीमार्गे जाताना सुमारे १३ लाख खर्चून बांधलेले नवीन मच्छी मार्केट कधी उद्घाटन होणार? मच्छी विक्रेते कधी त्यात बसून व्यवसाय करणार तसेच जुन्या मच्छीमार्केटची डागडुजी का झाली नाही. पडीक पडलेले जुन्या मार्केटचे काय होणार, का ही जागा परस्पर विकून बिल्डरांच्या घशात जाणार असे अनेक प्रश्न ग्रामस्थांना आणि मच्छी विक्रेत्यांना पडले आहेत. भर उन्हात रस्त्यावर बसून व्यवसाय करावा लागल्याने त्रास होत असून, ग्रामस्थांनी ग्रामविकास अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरणाची मागणी केली आहे.

रेवदंडा हायस्कूल ते थेरोंडा रोडवर मच्छी विक्रेत्यांना उन्हात उघड्यावर बसावे लागत आहे. या रस्त्यावरून जाणाऱ्या चारचाकी गाड्या दोन्ही बाजूंनी आल्या की, मच्छीच्या टोपल्या धडकून मच्छी रस्त्यावर पसरुन नुकसान होते. यामुळे गाडी चालकांसोबत भांडणतंटे होतात. संध्याकाळी अलिबाग-रेवदंडा मुख्य रस्त्यावर बसून विक्री करावी लागते, ज्यामुळे अपघाताचा धोका वाढतो. नवीन मार्केटमध्ये बसून सावली मिळेल, व्यवसाय सुरक्षित होईल, पण उद्घाटन का होत नाही अशी खंत मच्छी विक्रेत्या महिलांनी व्यक्त केली आहे.

ग्रामविकास अधिकाऱ्यांना याबाबत विचारले असता, नवीन मच्छी मार्केट बांधून तयार आहे, पण उद्घाटन का होत नाही हे मला माहित नाही, असे त्यांनी सांगितले. लवकरात लवकर उद्घाटन करुन जुन्या मच्छी मार्केटच्या भविष्याबाबत स्पष्ट धोरणाची ग्रामस्थांनी मागणी केली आहे. ग्रामस्थ आणि मच्छी विक्रेत्यांच्या मागणीकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याने नाराजी वाढत आहे. या प्रकरणात ग्रामविकास अधिकाऱ्यांनी लवकर स्पष्टीकरण द्यावे, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# भुयारी गटारांमुळे अपघाताची शक्यता



**| खोपोली | प्रतिनिधी |**

खोपोलीत शहरात गेल्या दोन वर्षापासून अपूर्ण अवस्थेत भुयारी गटार योजनेचे काम सध्या जोरात सुरू आहे. या कामासाठी शहरातील सर्वच रस्ते खोदून ठेवण्यात आले आहेत. रस्ते खोदून ठेवण्यात आल्याने खोपोलीकरांना मोठ्या समस्येचा सामना करावा लागणार असून निष्काळजीपणे काम करणार्या ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.खोपोली नगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेसाठी ९६ कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. अनेक वर्षापासून भुयारी गटार योजनेचे काम प्रलंबित होते. या कामासाठी शासनाने निधी दिला असून पुण्यातील एक कंपनी हे काम करत आहे. या योजनेचे पाईप टाकण्यासाठी शहरातील सर्वच प्रमुख रस्ते ठेकेदाराने खोदून अर्धवट अवस्थेत योजना होती. नगरपालिकेत नगराध्यक्ष आणि नगरसेवक निवडणून आल्यावर भूयारी गटारे काम जोरात सुरू आहे. इमारतींचे सांडपाणी सोडण्यासाठी छोटे प्लास्टिकचे पाईप वापरण्यात आले आहे.त्यामुळे या छोट्या पाईपमधून इमारतींमधील सांडपाणी कस वाहून जाणार अशी चिंता नागरिक व्यक्त करीत आहेत.

विशेष म्हणजे भुयारी गटार योजनेसाठी खोदण्यात आलेले रस्ते लाखो रुपये खर्च करून बनवण्यात आले होते. भुयारी गटार योजनेच्या कामासाठी खोदण्यात आलेले रस्ते तत्काळ दुरुस्त करण्याची गरज असताना काम झाल्यानंतर तात्पुरती मलमपट्टी करून तसेच ठेवण्यात आल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतोय. एप्रिल महिण्यात पाऊस कधीही येण्याची शक्यता असून या दरम्यान भुयारी गटार योजनेचे हे काम खोपोलीकरांसाठी चांगलीच डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे.

## ५०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान

**| धाटाव/रोहा | प्रतिनिधी |**

आर्थिक दुर्बल घटकातील गरजू व हुशार मुलामुलींच्या उज्वल भवितव्यासाठी शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारा सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीजचा 'सुधा सितारा' हा उपक्रम स्तुत्य आहे. सुदर्शन केमिकलच्या वतीने सुधा सीएसआर अंतर्गत मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते जिल्ह्यातील ५०० विद्यार्थी-विद्यार्थिनींना सुधा सितारा शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यावेळी पोलीस अधीक्षक आंचल दलाल, वनश्री शेडगे, मधुकर पाटील, किशोर देशमुख, सुयश सिंह, शिवालिका राजे, विवेक गर्ग, माधुरी सणस आदी उपस्थित होते.

**सरकारी दवाखान्यात लस मोफत | सार्वजनिक आरोग्य विभागाचा उपक्रम**

# कशेळेत एचपीव्ही लसीकरणाला सुरुवात

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील कशेळे ग्रामीण रुग्णालयामध्ये गर्भाशयाचा कर्करोगासाठी एचपीव्ही प्लस लसीकरण डॉ. नितीन गुरव तालुका आरोग्य अधिकारी, डॉ. बाबा कालेल वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय कशेळे यांच्या उपस्थितीत एचपीव्ही लसीकरण मुलींना देण्यात आली.

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासनांच्या उपक्रमांतर्गत एचपीव्ही प्लस सुरक्षिततेचा दृढ संकल्प, गर्भाशयमूख कर्करोगापासून मुलींचे जीवन वाचवण्याच्या नवा पर्याय म्हणून एचपीव्ही लस देण्याचे आवाहन करण्यात आले. सरकारी दवाखान्यात ही लसीकरण पूर्णपणे मोफत दिल्या जात आहेत. महिलांना होणाऱ्या या कर्करोगाला आळा घालण्यासाठी लसीकरण करून घेण्याचे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव आणि कशेळे ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाबा कालेल यांनी केले आहे.



> एचपी व्ही गर्भाशय मुखाचा होणारा कॅन्सरचा धोका टाळण्यासाठी खूप महत्त्वाची आहे सरकारी यंत्रणेतील फ्री ऑफ कॉस्ट मध्ये दिली जात आहे खाजगी रुग्णालयांमध्ये ते तीन ते चार हजार रुपये घेतले जातात. परंतु सरकारी यंत्रणेती फ्री ऑफ कॉस्ट दिली जात आहे. मी आव्हान करतो की जो गैरप्रकार म्हणजे अफवांवर विश्वास न ठेवता कर्जत तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्रात ही लसीकरण सुरू आहे.
> -डॉ. नितीन गुरव
> तालुका आरोग्य अधिकारी

या लसीकरणसाठी शालेय मुलींना जनजागृती करून व पालकांच्या सहमतीनेच व्हॅक्सीन दिल्या जात आहेत. कशेळे ग्रामीण रुग्णालयामध्ये एचपीव्ही प्लस देण्याची सुरुवात झाली असून गुरुवारी (दि.९) एप्रिल रोजी दोन मुलींना व्हॅक्सिन देऊन याची सुरुवात झाली. श्रावणी गणेश घाग व तनया किसन बोराडे या दोन मुलींनी आई-वडिलांच्या सहमतीने एचपीव्ही वॅक्सिन देण्यात आली. यावेळी तनया या मुलीची आई वंदना बोराडे उपस्थित होत्या, तसेच श्रावणी मुलीची आई मनीषा घाग यावेळी उपस्थित राहून लसीकरण करून घेण्याचे आवाहन केले.

यावेळी डॉ. नितीन गुरव, डॉ. बाबासो कालेल, सुरेश चव्हाण के.आर. आडे, आरोग्यसेविका कशेळे, रत्नमाला मानकर आरोग्य सहायिका, प्रकाश घुगे आरोग्य सेवक, गोपाल काटकर आधीपरिचारक हे उपस्थित होते.

# युध्दाने काय साधले?

इराणविरुध्दचे युध्द तूर्तास थांबले असले तरी त्याने काय नेमके काय साधले असा प्रश्न बराच काळ चर्चेत राहील. डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेलाच नव्हे तर सगळ्या जगाला आपली खासगी जहागीर मानतात आणि आपण कधीही कसलेही निर्णय घेऊ शकतो असे त्यांना वाटते. या युध्दाचा खर्च सुमारे ३१ अब्ज डॉलर्स किंवा सुमारे तीन लाख कोटी रुपये झाला असावा असा अंदाज आहे. हे युध्द ४० दिवस चालले आणि दिवसाला सुमारे ५० ते १०० कोटी डॉलर इतका खर्च आला. हा निव्वळ अमेरिकेचा युध्दाचा खर्च आहे. आखाती देशात आणि सर्वात महत्वाचे म्हणजे इराणमध्ये या युध्दाने किती हानी झाली याची मोजदाद करणेही कठीण व्हावे अशी स्थिती आहे. मुळात हे युध्द इस्रायलच्या राक्षसी महत्वाकांक्षेतून सुरु झाले. इराण हा आपला शत्रू आहे व तो आपल्याला नष्ट करू शकेल असे इस्रायलला वाटते. लेबनानमधील हेझबुल्ला संघटना आणि येमेनमधील हुथी बंडवाले यांना इराणने पोसलेले आहे. त्यांना क्षेपणास्त्रांपासून प्रशिक्षणापर्यंत सर्व मदत इराणने पूर्वी केलेली आहे. इस्रायलची दादागिरी संपवण्यासाठी इराणने ही दोन केंद्रे उभी केली आहे. सौदी अरेबिया वगैरे इस्रायलच्या विरोधात बोलतात. त्यांनी पॅलेस्टिनी प्रदेशात अशाच दहशतवादी संघटना पोसल्या. पण अलिकडे त्यांनी त्यांचा हात सोडून दिला. त्यामुळेच पॅलेस्टिनी लोक बेसहारा झाले आहेत. गेल्या वर्षी इस्रायल व अमेरिकेने इराणच्या अणुउर्जा केंद्रांवर हल्ले केले. इराण अण्वस्त्रे बनवत असून त्यामुळे इस्रायल व अमेरिकेच्या आखातातील मित्र देशांना धोका आहे असे कारण त्यामागे सांगितले गेले. त्यावेळी हल्ले यशस्वी झाले असा दावा करण्यात आला. अशा स्थितीत पुन्हा इराणवर हल्ला करण्याचे काही प्रयोजनच नव्हते. पण ट्रम्प गेल्या जानेवारी महिन्यापासून पुन्हा तशा धमक्या देत होते. त्यातच व्हेनेझुएलामध्ये अध्यक्ष मदुरो यांच्या घरावर हल्ला करून त्यांना रातोरात अमेरिकेत बेड्या घालून आणण्यात अमेरिकी सैन्याला यश आले. त्यामुळे ट्रम्प यांचा आत्मविश्वास वाढला. असाच प्रयोग आपण इराणवर करू असे त्यांना वाटले. २८ फेब्रुवारीच्या पहिल्याच दिवशी इराणचे सर्वोच्च नेते खामेनी युध्दात ठार झाले. त्यामुळे ट्रम्प यांचा उद्देश त्याच दिवशी सफल झाला होता. पण इराणला पूर्णच बेचिराख करून टाकू असे त्यांना वाटू लागले. तिथेच त्यांचे पानिपत झाले.

## शस्त्र कंपन्यांची चांदी

इराणने त्यांना गेले ४० दिवस तगडी लढत दिली. इस्रायलवरही थेट हल्ले करून तिथे माणसे मारली. यातून आपला देश अभेद्य असल्याचा इस्रायलचा अहंकार खलास झाला. अमेरिकेची दोन विमाने इराणने पाडली. एका वैमानिकाची कशीबशी सुटका करण्यात अमेरिकेला यश आले. मधल्या काळात इराणच्या भूमीवर थेट सैन्य उतरवण्याची धमकी ट्रम्प यांनी दिली होती. पण तसे करणे किती धोकादायक आहे हे या वैमानिकाच्या प्रकरणातून त्यांना कळले. इराणला हरवणे वा नष्ट करणे शक्य नाही हेही त्यांच्या लक्षात आले. दुसरीकडे होर्मूझ आखाताची नाकेबंदी करून इराणने सर्व जगाला धक्का दिला. त्यावर आपण काहीही इलाज करू शकत नाही हे अमेरिकेच्या लक्षात आले. आधी नाटो देशांना व नंतर चीन, जपान, कोरिया इत्यादींना ट्रम्प यांनी होर्मूझवर हल्ला करण्याचे आवाहन केले. पण तेही आपले ऐकत नाहीत हे त्यांना समजले. आपण जगात एकटे पडलो आहोत व इस्रायल केवळ त्याच्या मतलबापुरता आपल्याला वापरून घेत आहे हेही त्यांना कळले असेलच. अर्थात ते हे कबूल करणार नाहीत. पण अखेरीला या सगळ्याचा दबाव येऊन त्यांना युध्दातून माघारीसाठी काहीतरी पळवाट हवी होती. ती पाकिस्तानने पुरवली. पण इतके दिवस युध्द करून अमेरिकेला मिळाले काय हे कोणीही सांगू शकणार नाही. अमेरिकेतील शस्त्रास्त्र कंपन्यांना यातून प्रचंड फायदा झाला असेल यात शंका नाही. जी अस्त्रे अमेरिकेने या युध्दात जाळली ती पुन्हा तयार करण्यासाठी अमेरिका सरकार आता दीड लाख कोटी डॉलर खर्च करील. हा सर्व पैसा या बड्या कंपन्यांच्या घशात जाईल. या कंपन्यांमध्ये ट्रम्प आणि त्यांचे मंत्री यांची भागीदारी असेलच. त्यामुळे युध्द झाल्याने अमेरिकी लोक महागाईच्या तडाख्याने तडफडले तरी ट्रम्पबुवांची तिजोरी आणखी ओसंडून वाहणार आहे. सगळ्या जगातली सरकारे संरक्षणावर जेवढा खर्च करतात त्यातला ५० टक्के एकटी अमेरिका करते. अमेरिका सरकारचा म्हणजेच तिथल्या जनतेचा हा पैसा थेट अमेरिकी कंपन्यांच्या व दलालांच्या खिशात जात असतो. त्यातून फक्त या कंपन्यांचे भले होते.

## इराण, अमेरिकेची बरबादी

या युध्दाने कतारमधील गॅसचे साठे नष्ट झाले. तेलशुद्धीकरण कारखान्यांचे नुकसान झाले. ते भरून यायला पाच ते दहा वर्षे लागतील. सौदी, बहारीन, ओमान, कुवेत, संयुक्त अरब अमिरात, यांचेही नुकसान झाले. खुद्द इराण तर जवळपास बरबाद झाला आहे. युध्द होण्यापूर्वीच त्या देशात प्रचंड महागाई झाली होती. तिच्या विरोधात लोकांनी आंदोलने केली असता सरकारने ती चिरडून टाकली. त्यात जवळपास पाच हजार लोक मेले होते. आता या युध्दाने त्याचे अनेक वीज प्रकल्प, पूल, रस्ते, शाळा इत्यादी नष्ट झाले आहेत. ते नुकसान भरून काढण्यासाठी आपल्याला मदत मिळावी अशी इराणने मागणी केली आहे. युध्दबंदीसाठी जो दहा कलमी प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्यातला हा एक महत्वाचा मुद्दा आहे. अमेरिका व युरोपीय देश याला होकार देतील. इराणच्या पुनर्उभारणीची कंत्राटे आपल्या कंपन्यांना द्यावीत अशी अट हे देश घालतील आणि हा पैसा पुन्हा आपल्याच देशात येईल हे ते पाहतील. हा पैसा इराणच्या जनतेवर जादा कर लावून वसूल केला जाईल. इराणला नष्ट करण्याचे ट्रम्प यांचे उद्दिष्ट होते. ते साध्य झाले नाही. एक देश म्हणून इराण टिकून राहिला. पण एक अर्थव्यवस्था म्हणून तो कितपत उभा राहील याबद्दल शंका आहे. इराणकडे तेल आहे. ते विकून त्याला पैसा मिळेल. पण तरीही झालेली हानी भरून काढणे सोपे नाही. पण इतके करूनही इराणला नमवणे ट्रम्प यांना शक्य झालेले नाही. उलट अमेरिकेच्या विरोधात इराणमध्ये आधीपासून असलेली भावना आणखी तीव्र होणार आहे. भविष्यात कोणत्या तरी टप्प्यात इराण याचा बदला घेईलच. आखातात अमेरिकेचे लष्करी तळ आहेत. त्याबद्दल अमेरिका त्यांच्याकडून प्रचंड पैसे व सवलती उकळत असते. पण ऐन युध्दात अमेरिकेचा आपल्याला काहीही उपयोग नाही हे सौदी, कुवेत, कतार इत्यादी देशांना आता कळले असेल. त्यामुळे इराणसोबत जुळवून घेणे अधिक शहाणपणाचे आहे असे त्यांना वाटू शकेल. म्हणजे त्याही आघाडीवर अमेरिकेला दणका बसला आहे. या युध्दाने नाटो ही संघटनाही जणू विसर्जित झाल्यासारखी झाली. आता ट्रम्प असेपर्यंत तरी नाटोतील दुफळी सांधणे कठीण आहे. थोडक्यात इराणइतकाच अमेरिकेनेही आपली वेगवेगळी बरबादी या युध्दातून करून घेतली आहे.

---

**विचार**

# रुपयात घसरण तर मद्यपींमध्ये चिंता

**महेश देशपांडे**

***मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम जगात सर्वत्र जाणवत आहे. अशा परिस्थितीत काही बातम्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. मध्यपूर्वेतील घडामोडींमुळे रुपया ऐतिहासिक नीचांकावर गेल्याचे पाहायला मिळाले. त्यातच मद्यप्रेमींची चिंता वाढवणारी बातमी समोर आली. गॅसची टंचाई आणि कच्च्या मालाची कमतरता यामुळे बीयर महागणार आहे. दुसरीकडे, गुंतवणूकदारांसाठी वातावरण तणावाचे बनले आहे.***



मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम जगात सर्वत्र जाणवत आहे. तेल हा जगाच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक बनला असताना तेलटंचाईमुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर त्याचा परिणाम झाला नसता तरच नवल. अशा परिस्थितीत काही बातम्यांनी सर्वांचे लक्ष वेधले आहे. मध्यपूर्वेतील घडामोडींमुळे रुपया ऐतिहासिक नीचांकावर गेल्याचे पाहायला मिळाले. त्यातच मद्यप्रेमींची चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे. गॅसची टंचाई आणि कच्च्या मालाची कमतरता यामुळे बीयर महागणार आहे. दुसरीकडे गुंतवणूकदारांसाठी वातावरण तणावाचे बनले आहे.

अमेरिकन डॉलरच्या मजबुतीसमोर भारतीय रुपया कमकुवत ठरत असून, गेल्या काही दिवसांमध्ये रुपयाने मोठी घसरण नोंदवली. तो ९४.२९ प्रति डॉलर या नव्या ऐतिहासिक नीचांकावर पोहोचला. रुपयातील या तीव्र घसरणीमागील मुख्य कारण म्हणजे पश्चिम आशियामध्ये सुरू असलेला संघर्ष. गेल्या महिन्याच्या अखेरीस सुरू झालेल्या या तणावानंतर आतापर्यंत रुपयात सुमारे ३.५ टक्क्यांची घसरण झाली आहे. युद्ध लांबण्याची शक्यता लक्षात घेता जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर मोठे संकट निर्माण झाले आहे. या भू-राजकीय अस्थिरतेमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती प्रतिपिंप शंभर डॉलर्सच्या वर गेल्या आहेत. भारतासारख्या ऊर्जा आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेल्या देशासाठी याचा थेट आर्थिक परिणाम होतो. त्यामुळे जागतिक शेअर बाजारांमध्ये मंदीचे वातावरण असून बाँड यिल्डमध्ये वाढ होत आहे. डॉलर मजबूत झाल्यास भारतात महागाई वाढण्याची शक्यता अधिक होते. या परिस्थितीचा परिणाम कर्जांवरही होऊ शकतो. महागाई नियंत्रित ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँक व्याजदर वाढवण्याचा विचार करू शकते. असे झाल्यास गृहकर्ज, वाहनकर्ज यांसारख्या कर्जांच्या ईएमआयमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच आयातीत लक्झरी वस्तू, वाहने आणि यंत्रसामग्रीही महाग होऊ शकतात.

या घसरणीमागे परकीय गुंतवणूकदारांकडून भारतीय बाजारातून निधी काढून घेणे हेही एक महत्त्वाचे कारण आहे. मध्यपूर्वेतील तणावामुळे जागतिक गुंतवणूकदारांचा दृष्टिकोन नकारात्मक झाला आहे; मात्र या परिस्थितीत काही क्षेत्रांना फायदा होऊ शकतो. आयटी आणि फार्मा क्षेत्रातील निर्यातदार कंपन्यांना डॉलर मजबूत असल्यामुळे अधिक रुपयांमध्ये उत्पन्न मिळू शकते. भारत आपल्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के कच्चे तेल आयात करतो आणि त्याचे व्यवहार डॉलरमध्ये होतात. त्यामुळे रुपया कमकुवत झाल्यास तेलासाठी अधिक पैसे मोजावे लागतात. याचा परिणाम पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या किमतींवर होण्याची शक्यता आहे. तसेच खाद्यतेल आणि डाळींसारख्या आयातीत वस्तूही महाग होऊ शकतात. त्यामुळे घरगुती खर्च वाढू शकतो. याशिवाय इलेक्ट्रॉनिक वस्तूंवरही याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. स्मार्टफोन, टीव्ही, लॅपटॉप यांसारख्या उत्पादनांचे अनेक भाग परदेशातून आयात केले जातात. रुपयातील घसरण कायम राहिल्यास या वस्तूंच्या किमतींमध्ये सुमारे दहा टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही आणि विदेश प्रवास करणाऱ्यांनाही अधिक खर्च करावा लागू शकतो.

दरम्यान मध्य-पूर्वेतील संघर्षाचे परिणाम जगातील सर्वच देश अनुभवत आहेत. अनेक देशांमध्ये इंधन आणि गॅसचे मोठे संकट उभे ठाकले आहे. या देशांमध्ये वर्क फ्रॉम होम आणि इतर अनेक उपाय करण्यात येत आहेत. पेट्रोल पंप बंद असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. विमानफेऱ्यासुद्धा कमी झाल्याने पर्यटक चिंतेत आहेत. ऊर्जा संकटामुळे अनेक देश वेठीस धरले गेले आहेत. इतकेच नाही, तर मद्यप्रेमींची काळजी वाढवणारी बातमी समोर येत आहे. कच्च्या मालाची कमतरता आणि वाहतुकीतील अडथळे यामुळे मद्य तयार करणाऱ्या कंपन्यांचे गणित बिघडवले आहे. त्यामुळे बिअरच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे. त्याची बिअरप्रेमींच्या खिशाला झळ बसणार आहे. हे युद्ध आखाताच्या जवळपास लढले जात आहे; पण त्याचा जगातील बड्या महासत्तांना फटका बसला आहे. अनेक छोट्या देशांमध्ये ऊर्जेचे भीषण संकट उद्भवले आहे. पाकिस्तान, नेपाळ, बांगला देश, श्रीलंकेसह अनेक देशांमधील व्यापार आणि सर्वच घटकांवर मोठा परिणाम झाला आहे. भारत हा गरजेच्या जवळपास ९० टक्के कच्चे तेल आयात करतो. हे इंधन इराणजवळील होर्मुज सामुद्रधुनीच्या चिंचोळ्या समुद्र मार्गाद्वारे भारतात येते. हा मार्ग गेल्या ३० दिवसांपासून भू-राजकीय संघर्षाचा केंद्रबिंदू ठरला आहे. इराणने भारत, चीन, रशिया आणि पाकिस्तानव्यतिरिक्त इतर देशांसाठी हा मार्ग बंद ठेवल्याने गॅस आणि कच्चा तेलाच्या वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे.

बाजारात बिअर काचेची बाटली किंवा कॅनमधून दिली जाते. या बाटल्या आणि कॅन्स तयार करण्यासाठी कंपन्यांना कच्चा माल आयात करावा लागतो. शिवाय त्यांचे उत्पादन करण्यासाठी कारखान्यांना गॅसची गरज असते. गॅसची टंचाई सुरू झाल्यापासून या कंपन्यांच्या उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. काचेची बाटली तयार करणाऱ्या कारखान्यांवर मोठा परिणाम दिसून येत आहे. काही कंपन्यांचे काम ठप्प पडले आहे. 'ब्रुअर्स असोसिएशन ऑफ इंडिया'च्या दाव्यानुसार या घडामोडींमुळे काचेच्या बाटल्यांच्या उत्पादनखर्चात २० टक्क्यांची वाढ झाली आहे, तर पॅकेजिंग आणि वाहतुकीचा खर्च वाढल्याने बिअरच्या किंमतीत मोठी वाढ होण्याचा अंदाज आहे. बिअर तयार करण्यासाठी आणि पॅकेजिंगसाठी मोठा खर्च येत असल्याने बिअर कंपन्यांनी आता बिअरच्या किंमतीत १५ टक्के वाढीची मागणी केली आहे. अनेक दिग्गज बिअर कंपन्यांनी बिअरच्या किंमतीत मोठी वाढ करण्याची मागणी लावून धरली आहे. उन्हाळ्यात बिअरची मागणी वाढते. ऐन मोसमातच बिअरच्या किंमतीत वाढ होण्याची दाट शक्यता असल्याने बिअरप्रेमींच्या घशाला कोरड पडली आहे. कारण आता सगळीकडे महागाई वाढत असताना बिअरची चव सुद्धा जास्त कडू लागणार आहे. बिअर बाटलीसाठी जास्त किंमत मोजावी लागणार आहे.

दुसरीकडे वर्षाची पहिली तिमाही मोठ्या चढ-उतारांनी भरलेली ठरली. यामागील मुख्य कारण म्हणजे वाढता भू-राजकीय तणाव आणि युद्धाची स्थिती. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला एप्रिलपर्यंत होमुर्जची सामुद्रधुनी खुला ठेवण्याचा अल्टिमेटम दिला आहे, अन्यथा ऊर्जा पायाभूत सुविधांवर कारवाईचा इशारा दिला आहे. यामुळे पुढील काही दिवस गुंतवणूकदारांसाठी अत्यंत तणावपूर्ण ठरणार आहेत, कारण याच काळात महत्त्वाचे आर्थिक आकडे आणि कंपन्यांचे तिमाही निकालही जाहीर होणार आहेत. पहिल्या तिमाहीत जागतिक बाजार पूर्णपणे भू-राजकीय घडामोडींनी प्रभावित झाले. इराणशी संबंधित संघर्षामुळे जागतिक शेअर बाजारांमध्ये सुमारे ७ ट्रिलियन डॉलर्सची घसरण झाली आहे. तेल आणि गॅसच्या किमतींमध्ये आत्तापर्यंत अनुक्रमे सुमारे ७० आणि ८५ टक्के वाढ झाली आहे. व्याजदर कमी होण्याऐवजी वाढण्याची चिन्हे दिसत आहेत आणि मोठ्या प्रमाणावर ऊर्जा वापरणाऱ्या 'एआय' उद्योगावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मार्च महिना तेल बाजारासाठी अत्यंत अस्थिर ठरला. एका टप्प्यावर ट्रम्प यांच्या वक्तव्यानंतर काही मिनिटांतच तेलाच्या किमतींमध्ये १५ टक्क्यांची घसरण झाली. यापूर्वी मोठ्या प्रमाणावर विक्री आदेश आल्याने बाजारात मोठी हालचाल झाली होती. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची स्थिती समजून घेण्यासाठी मार्चमधील रोजगाराचा डेटा अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. फेब्रुवारीमध्ये रोजगारात घट आणि बेरोजगारीत वाढ झाल्यामुळे गुंतवणूकदार आधीच चिंतेत आहेत. महागलेल्या ऊर्जेमुळे खर्च आणि आर्थिक वाढीवर किती परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. याशिवाय, दक्षिण कोरियाच्या व्यापार आकडेवारीकडेही लक्ष असेल. त्यातून जागतिक अर्थव्यवस्था युद्धाच्या परिणामांना कितपत तोंड देत आहे हे स्पष्ट होईल. विशेषतः 'एआय' क्षेत्रासाठी आवश्यक असलेल्या 'डीआरएएम' चिप्सच्या पुरवठ्यावरही लक्ष ठेवले जात आहे.

युरोपमध्येही महागाई पुन्हा वाढण्याची शक्यता आहे. कारण ऊर्जा किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे युरोपची मध्यवर्ती बँकेवर व्याजदर वाढवण्याचा दबाव निर्माण होऊ शकतो. एकूणच, जागतिक बाजारात अनिश्चितता कायम असून गुंतवणूकदारांना प्रत्येक घडामोडीवर बारकाईने लक्ष ठेवावे लागणार आहे.

---

**चर्चा आजची**

# इराण-अमेरीका युद्धाचा अर्धवट युद्धविराम

**सुयोग आंग्रे**



अमेरिका आणि इराणमधील युद्धविराम हा पश्चिम आशिया तसेच जगासाठी दिलासा देणारा विषय आहे, परंतु फारसा आश्वासक नाही. नाही, कारण युद्धविराम केवळ दोन आठवडे लागू झाला आहे आणि तो कोणत्याही क्षणी खंडित होऊ शकतो अशा परस्परविरोधी दाव्यांमुळे तो इतका अविश्वासू दिसत आहे. या नाजूक युद्धबंदीचा करार सार्वजनिक झाल्यानंतर लगेचच परस्पर हल्ले थांबले नाहीत.या युद्धविरामाचे भवितव्य मुख्यत्वे उभय बाजूंमधील चर्चेतून ठोस निकालावर पोहोचणे आणि एकमेकांवर विश्वास निर्माण करणे यावर अवलंबून असेल. याची शक्यता कमी आहे, कारण पहिले म्हणजे या युद्धबंदीबाबत अमेरिका आणि इराणचे दावे एकमेकांशी जुळत नाहीत आणि दुसरे म्हणजे, इराणी नेते युद्धविरामाच्या अटींमध्ये लेबनॉनवरील इस्रायली हल्ले थांबवण्याचाही समावेश असल्याचे सांगत असताना, इस्रायली नेते याचा स्पष्टपणे नकार देत आहेत.युद्धबंदीची घोषणा होऊनही ऊर्जा संकटाने ग्रासलेला आंतरराष्ट्रीय समुदाय केवळ भीतीनेच सुटकेचा नि:श्वास टाकू शकतो, हे स्पष्ट आहे. ट्रम्प यांच्या इराणी सभ्यता नष्ट करण्याच्या धोकादायक धमक्यांनंतर इराणमधील सत्तेतील मूलतत्त्ववादी गट नरमला असण्याची शक्यता आहे, परंतु ज्या दहा अटींवर ते युद्धबंदीचा दावा करत आहेत आणि ज्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना विचारात घेण्यास योग्य वाटत आहेत, त्या दहा अटी अमेरिकेला इराणपुढे नतमस्तक व्हावे लागले हाच संदेश देत आहेत.होर्मुझ सागरी मार्ग उघडल्यानंतरही त्यावर इराणचे वर्चस्व कायम राहिल्यास आणि इराणची राजवट हिजबुल्लाह आणि हमाससारख्या अतिरेकी संघटनांना पाठबळ आणि लष्करी संसाधने देत राहिली, तर ते ना अमेरिकेचे, ना इस्रायलचे, ना आखाती देशांचे हित साधणार आहे. इराण युरेनियम संवर्धन कार्यक्रम सुरू ठेवण्याबाबत बोलत आहे, याकडेही दुर्लक्ष करता कामा नये. होर्मुझचा समुद्र खुला करण्यासाठी इराणवर दबाव वाढवण्याबरोबरच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इराणला आपल्या नव्या धमकीमध्ये ज्या पद्धतीने संपूर्ण सभ्यता रातोरात नष्ट होईल, जी पुन्हा कधीही परत आणता येणार नाही, असे म्हटले आहे, ती आजच्या युगाची भाषा नाही. ही रानटी आदिवासी काळातील भाषा आहे, जेव्हा युद्धाचे कोणतेही नियम नव्हते आणि हल्लेखोर रानटीपणाची उंची दाखवण्यास मागेपुढे पाहत नव्हते. होर्मुझ हा सागरी मार्ग रोखून इराणने ऊर्जा संकट निर्माण केले आहे. या सागरी मार्गाचा तो शस्त्रासारखा वापर करत आहे. हा असा जलमार्ग आहे ज्याद्वारे उर्जेचा एक पंचमांश वाहून नेला जातो. या मार्गाच्या अडथळ्यामुळे जगभरात ऊर्जेचे संकट सतत गडद होत चालले आहे आणि त्यामुळे अनेक देशांच्या सरकारांना तसेच सर्वसामान्यांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. जर असे खरोखरच असेल तर याचा अर्थ असा की अमेरिका आणि इराण जवळपास ४० दिवसांच्या विनाशकारी संघर्षापूर्वी जिथे होते तिथे परतले आहेत. जर अमेरिकेला इराणसोबतचे प्रश्न केवळ चर्चेने सोडवायचे होते, तर फेब्रुवारीमध्ये सुरू असलेल्या चर्चेदरम्यान त्यांनी इस्रायलवर हल्ला का केला आणि त्यातून काय साध्य झाले?काही ठिकाणी उद्योगधंदे बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. वाढत्या ऊर्जा संकटामुळे महागाईही वाढत आहे. एकप्रकारे इराणने होर्मुझवर ताबा मिळवून जगाला ओलीस ठेवले आहे. त्यांची लढाई अमेरिका आणि इस्रायलशी आहे. तो बाकीच्या जगाला का त्रास देत आहे? हे स्पष्ट आहे की अमेरिकेला आपला दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे, तशीच इराणनेही. इराणची ही वृत्ती योग्य नाही की त्याला आपल्या विनाशाची पर्वा नाही.जर ते तडजोडीचा मार्ग शोधत असतील तर त्यांनी त्यांचे मत योग्य पद्धतीने मांडावे. गेल्या काही दिवसांत तो ज्या भाषेत बोलत आहे, त्यामुळे परिस्थिती अधिक चांगली होण्याऐवजी आणखी बिघडत असल्याचे दिसते. अमेरिकेने इस्रायलसह इराणवर हल्ला करून पश्चिम आशियात गंभीर संकट निर्माण केले यात शंका नाही, पण या संकटाने संपूर्ण जगाला वेठीस धरले आहे आणि तेही इराणमुळेच. अमेरिका आणि इराणमधील युद्धविरामात पाकिस्तानची भूमिका लक्ष वेधून घेणारी आहे. अमेरिकेने दूताची भूमिका पाकिस्तानकडे सोपवणेच बरे वाटल्याचे दिसते. यामागे अमेरिकेचे हित कितीही असले तरी युद्धबंदीबाबत चीनच्या पडद्यामागच्या कारवाईच्या बातम्या आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीतील अमेरिकेचे वर्चस्व कमकुवत करणारी आहेत.

---

**लोकसंसद**

## उड्डाणपूलाची रचना खरंच योग्य आहे का?



मीरा-भाईंदर येथील वादग्रस्त उड्डाणपुलाबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी अखेर "पूल योग्यच" असल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. मात्र, ही प्रतिक्रिया साधारण सव्वादोन महिन्यांनंतर आली असल्याने ती थोडीशी असमर्थनीयच वाटते. कारण इतक्या महत्त्वाच्या आणि नागरिकांच्या दैनंदिन आयुष्याशी निगडित प्रकल्पाबाबत शासनाची भूमिका वेळेवर स्पष्ट होणे अपेक्षित होते. हा पूल सर्वप्रथम २६ जानेवारी २०२६ रोजी त्याच्या विचित्र रचनेमुळे चर्चेत आला. चार लेनमध्ये असलेला पूल अचानक दोन लेनमध्ये रुपांतरित होत असल्याचे दृश्य समोर आल्यानंतर सर्वत्र टीकेचा सूर उमटला. वाहतुकीची कोंडी आणि अपघाताचा धोका याबाबत नागरिकांनी व्यक्त केलेली चिंता दुर्लक्षित करता येण्यासारखी नव्हती. याहूनही महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, जर त्या ठिकाणी चार लेनसाठी आवश्यक जागा उपलब्ध नव्हती, तर असा आराखडा मंजूर कसा झाला? उशिरा दिलेले स्पष्टीकरण तांत्रिकदृष्ट्या आणि शासनाच्या दृष्टीने योग्य असले, तरी नागरिकांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास दूर करण्यासाठी ते अपुरे ठरते. विकास प्रकल्पांमध्ये वेळेवर संवाद आणि पारदर्शकता यांनाही तितकेच महत्त्व आहे, हे या प्रकरणातून अधोरेखित होते.

**– दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

---

# लेखणीचा शब्दप्रभू आणि रायगडच्या मातीचा वारसा : उमाजी दादा केळुसकर

**भा.ग. रांजणकर**

**वरिष्ठ पत्रकार आणि साहित्यिक उमाजी दादा केळुसकर यांना 'रायगड प्रेस क्लब जीवनगौरव' पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांच्या प्रदीर्घ प्रवासाचा वेध घेणारा हा विशेष लेख:**

रायगडच्या पत्रकारितेत आणि साहित्य विश्वात ज्यांची लेखणी गेल्या चार दशकांपासून अविरत चालत आहे, असे व्यक्तिमत्व म्हणजे वरिष्ठ पत्रकार उमाजी म. केळुसकर. ४० वर्षांची प्रदीर्घ पत्रकारिता आणि तितकीच समृद्ध साहित्यसेवा करणाऱ्या दादांना यंदाचा 'रायगड प्रेस क्लब जीवनगौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नसून, त्याने जपलेल्या मूल्यांचा आणि शब्दांच्या सामर्थ्याचा गौरव आहे.

**पत्रकारितेचा ४० वर्षांचा महाप्रवास**

उमाजी दादांनी आपल्या पत्रकारितेची २५ वर्षे 'दैनिक कृषीवल' सारख्या दिग्गज वर्तमानपत्रात उपसंपादक, पुरवणी संपादक आणि सहसंपादक म्हणून घालवली. त्यानंतर गेल्या १५ वर्षांपासून ते 'साप्ताहिक कोकणनामा' च्या संपादकपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळत आहेत. त्यांची वृत्तपत्रीय कारकीर्द थक्क करणारी आहे:

**अग्रलेख : ७,२०० पेक्षा जास्त.**

स्तंभलेखन: 'खारावारा' (५,६०० लेख), 'ठसा' (२४७ लेख), आणि 'दादाच्या गोष्टी' (१००० गोष्टी).

विविध सदरे : पुस्तकवेध, झाडाझडती, आणि 'धूमकेतू' नावाची दैनिक चित्रकथा मालिका.

**साहित्य क्षेत्रातील उत्तुंग कामगिरी**

केळुसकर दादा केवळ बातम्यांचे वार्तांकन करणारे पत्रकार नाहीत, तर ते एक प्रतिभासंपन्न साहित्यिक आहेत. त्यांनी गूढकथा, ऐतिहासिक कथा, बालकथा आणि काव्याच्या माध्यमातून एकूण १६ ग्रंथांची निर्मिती केली आहे.

प्रमुख नाटके: 'इतिहासा वाक माझ्या पुढे', 'सम्राट', आणि 'कधीतरी'.

कथासंग्रह: 'शिकार', 'अंतर्दृष्टी', 'विहिरीतले भूत' आणि 'खोल खोल पाणी'.

नभोनाट्य : आकाशवाणीवर 'अभंग' आणि 'चमत्कार' या नाटकांच्या माध्यमातून त्यांनी श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य गाजवले.

त्यांची लवकरच प्रसिद्ध होणारी ...'आणि रामदास बोट बुडाली!' ही कादंबरी रायगडच्या इतिहासातील एका करुण अपघातावर प्रकाश टाकणारा एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरेल.

**पुरस्कार आणि सन्मान**

त्यांच्या कार्याची दखल महाराष्ट्र शासनापासून ते विविध सामाजिक संस्थांनी घेतली आहे.

**राज्यस्तरीय पुरस्कार :** राजमाता जिजाऊ सर्वोत्कृष्ट पत्रकार पुरस्कार, सीतादेवी सोमाणी पुरस्कार.

**पत्रकारिता पुरस्कार :** ॲड. दत्ता पाटील, गुरुवर्य सुभानराव राणे आणि नवीन सोष्टे साहित्यिक पुरस्कार.

**साहित्य संमेलन :** २०१८ च्या दुसऱ्या 'समुद्र साहित्य संमेलना'चे अध्यक्षपद भूषवण्याचा मानही त्यांना मिळाला आहे.

शिवाजी सावंत, द.मा. मिरासदार आणि ह.मो. मराठे यांसारख्या दिग्गज साहित्यिकांनीही त्यांच्या कार्याचे वेळोवेळी कौतुक केले आहे.

**एक मार्गदर्शक आणि संघटक**

केवळ लेखन न करता, रायगड जिल्हा श्रमिक पत्रकार संघ आणि अलिबाग तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी पत्रकारांच्या हितासाठी काम केले. नवोदित लेखकांना व्यासपीठ मिळवून देण्यात त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे.

रायगड प्रेस क्लबच्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त, ८ एप्रिल २०२६ रोजी पनवेलच्या वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात हा गौरव सोहळा संपन्न होत आहे. उमाजी दादांच्या या 'जीवनगौरव' सन्मानामुळे रायगडच्या पत्रकारिता आणि साहित्य क्षेत्राची मान अभिमानाने उंचावली आहे.

उमाजी दादा केळुसकर यांना या दैदिप्यमान यशाबद्दल मनःपूर्वक शुभेच्छा!

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० एप्रिल

१) श्री. मोतीराम धोंडू राऊत
बाजारपेठ-अलिबाग,
१०-०४-१९४६

२) श्री. वसंत राघव घरत
चेंढरे-अलिबाग
१०-०४-१९४८

३) श्रीम. निलीमा नीलकंठ पाटील
राधा-गोविंद नगर, वरसोली,
१०-०४-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

## संतोष महाडिक यांचे निधन



**सुतारवाडी :** दानशूर व्यक्तिमत्व, गरजूंना नेहमी मदतीचा हात देणारे, जावठे गावाच्या विकासासाठी सामाजिक कार्यात मोलाचे योगदान करणारे संतोष रामभाऊ महाडिक यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचे दशक्रिया विधी १६ एप्रिल रोजी, तर तेरावे १९ एप्रिल रोजी त्यांच्या राहत्या घरी म्हणजेच माणगाव तालुक्यातील जावटे येथे होणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, दोन मुले, मुलगी, दोन बहिणी, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## मजगावचा जुना पूल धोकादायक



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील साळाव-मुरुड रस्त्यावर उसरोली फाटा ते मजगाव (खारदोडकुले) दरम्यान असलेला जुना पूल अंदाजे पंधरा वर्षांपूर्वी पडला आहे. त्याचे दगडी पीलर व स्लॅब दुरावस्थेत असून पावसाळ्यात कोणत्याही क्षणी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत वृत्त पत्रातून वृत्त दिले असता संबंधित बांधकाम खात्याकडून या पुलाचे दुरावस्थेतील स्लॅब हटविण्यात आले. परंतु, दगडी पिलर तसेच ठेवले आहेत. या पिलरवर चढून काही मुले बागडताना दिसतात. तर काही हौशी मासेमारीसाठी गळ टाकून बसत असल्याचेही दिसून येते. याठिकाणी एखादी दुर्घटना घडण्याची, अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने यापूलाचे दगडी पिलर हटवावेत, अशी मागणी जोर धरीत आहे.

# कातळशिल्पांना आंतरराष्ट्रीय ओळख

## माहितीपट तयार करण्यास मान्यता; मंत्री ॲड.आशिष शेलार यांची माहिती

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

कोकणातील रत्नागिरी जिल्ह्याचा अमूल्य ठेवा असलेली कातळशिल्पे आता आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकणार आहेत. या ऐतिहासिक वारशावर जागतिक दर्जाचा माहितीपट तयार करण्यासाठी राज्य सरकारने प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच, महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सुमारे १४.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली.



रत्नागिरी परिसरातील सुमारे ३०० कि.मी. लांबीच्या किनारपट्टीपैकी २५ कि.मी. क्षेत्रात २००० हून अधिक कातळशिल्पे आढळून आली आहेत. या कातळशिल्पांमुळे प्रागैतिहासिक मानवजीवन, संस्कृती व परंपरांचा अमूल्य वारसा उलगडण्यास मदत होते. या पार्श्वभूमीवर त्यांच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक महत्त्वाचे जागतिक स्तरावर दस्तऐवजीकरण करण्याचा शासनाचा हा महत्त्वाचा उपक्रम असल्याचे मंत्री ॲड.शेलार यांनी सांगितले.

माहितीपटनिर्मितीसाठी दिग्दर्शक व सहाय्यक दिग्दर्शकांची नियुक्ती, सर्वेक्षण, अत्याधुनिक उपकरणे, वाहतूक व निवास व्यवस्था, तसेच स्टुडिओमधील एडिटिंग, साउंड आणि व्हिज्युअल इफेक्ट्स आदी कामांसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. याशिवाय ड्रोन फुटेज, सिनेमॅटिक शॉट्स, उच्च-गुणवत्तेचे छायाचित्रण आणि 'बिहाइंड द सीन' सामग्री तयार करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

या प्रकल्पातून मिळणाऱ्या दृश्यसामग्रीच्या आधारे सोशल मीडियासाठी स्वतंत्र कंटेंट तयार करण्यात येणार असून, कातळशिल्पांच्या वैभवाचे दर्शन घडविणारा एव्ही कंटेंट बँकही उभारण्यात येणार आहे. यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या दिग्दर्शकांची निवड करून शासन निर्णयानुसार करार करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

> “या प्रकल्पामुळे कोकणातील कातळशिल्पांना जागतिक स्तरावर ओळख मिळेल. ऐतिहासिक दस्तऐवजीकरण सोपे होईल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोकणात मोठ्या प्रमाणावर पर्यटन वाढीस चालना मिळेल.
> – ॲड. शेलार, सांस्कृतिक कार्य मंत्री”

### पुरातत्त्व विभागाकडे असणार जबाबदारी

कातळशिल्पांचे विविध ऋतूंमध्ये, प्रकाशछटांमध्ये आणि स्थानिक लोकजीवनाशी असलेले नाते सांगणारे चित्रीकरण करण्यात येणार असून हा माहितीपट युनेस्कोच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार होणार आहे. प्रकल्पाची जबाबदारी पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाकडे सोपविण्यात आली आहे.

## तुषार कांबळेना पुरस्कार प्रदान

**। वावोशी । प्रतिनिधी ।**

नवी दिल्ली येथे आयोजित भव्य सोहळ्यात महाराष्ट्रातील युवा व बहुआयामी सामाजिक व राजकीय नेते तुषार तानाजी कांबळे यांना प्रतिष्ठेचा 'राष्ट्रीय भारत भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सोहळा केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली आणि केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. तर मानवाधिकार व भ्रष्टाचार विरोधी संघटना, आंबेडकर ग्लोबल फाउंडेशन आणि रिपब्लिकन पक्ष (आठवले गट) श्रमिक ब्रिगेड यांच्या संयुक्त विद्यमाने हा सन्मान देण्यात आला.



सामाजिक न्याय, जनजागृती, शिक्षण, ग्रामीण भागातील मुलभूत प्रश्न, वंचित घटकांचे हक्क तसेच पत्रकारितेच्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल म्हणून कांबळे यांची निवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजक महाराष्ट्र प्रदेश रिपब्लिकन पक्ष (आठवले गट) श्रमिक ब्रिगेडचे अध्यक्ष सतीश केदारी होते. त्यांच्या नेतृत्वाखाली आणि काटेकोर नियोजनामुळे हा सोहळा पार पडला. पुरस्कार स्विकारल्यानंतर तुषार तानाजी कांबळे यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, हा सन्मान माझ्या सामाजिक कार्याची दखल असून समाजासाठी अधिक निष्ठेने कार्य करण्याची प्रेरणा देणारा आहे.

## दिव्यांग सहाय्य पोर्टल मार्गदर्शन शिबीर

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

दिव्यांग बांधवांना शासकीय योजनांचा लाभ अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक पद्धतीने मिळावा, या उद्देशाने केंद्र सरकारच्या दिव्यांग मंत्रालयामार्फत सुरू करण्यात आलेल्या 'दिव्यांग सहाय्य पोर्टल' संदर्भात श्रीवर्धन येथे मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. एकता दिव्यांग कल्याणकारी संस्थेच्या पुढाकाराने सोमवारी (दि.६) पर्यटक निवास संकुलातील 'दिव्यांग कक्ष' येथे हे शिबीर यशस्वीरित्या पार पडले.



या शिबिरामध्ये दिव्यांगांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. विशेष म्हणजे, शासनाने प्रथमच २१ प्रकारच्या दिव्यांगत्वांसाठी असलेल्या सर्व योजनांना एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणल्यामुळे लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. उपस्थितांना पोर्टलवर नोंदणी करण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची माहिती, अर्ज कसा भरावा, तसेच अर्जाची स्थिती ऑनलाइन कशी तपासावी याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले की, 'दिव्यांग सहाय्य पोर्टल ही शासनाची एक महत्त्वाकांक्षी योजना असून, यामुळे दिव्यांगांना विविध कार्यालयांच्या फेऱ्यांपासून आणि कागदपत्रांच्या गुंतागुंतीतून मुक्ती मिळणार आहे. घरबसल्या मोबाईल किंवा संगणकाच्या सहाय्याने अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने वेळ आणि खर्च दोन्हीची बचत होणार आहे.'

या उपक्रमामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील दिव्यांगांपर्यंत शासकीय योजना पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे. तर भविष्यात अशा प्रकारची आणखी शिबिरे आयोजित करण्याची गरजही व्यक्त करण्यात आली.

## एसटी महामंडळ उभारणार 'हायटेक' बस निवारे

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या रत्नागिरी विभागाने जिल्ह्यात १५ अत्याधुनिक आणि अद्ययावत प्रवासी मार्ग निवारे बांधण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी शासनाकडून ३ कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर करण्यात आला आहे.



गेली अनेक वर्षे जिल्ह्यातील प्रवासी ऊन, वारा आणि पावसाचा सामना करत एसटीची वाट पाहत उभे असायचे. अनेक ठिकाणी जुने आणि मोडकळीस आलेले बस थांबे होते. मात्र, आता हे चित्र बदलणार आहे. नवीन होणारे बस निवारे हे केवळ साधे पत्र्याचे शेड नसून ते आधुनिक स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना असणार आहेत.

प्रवाशांच्या सोयीसाठी आणि सुरक्षिततेसाठी या नवीन शेल्टर्समध्ये विशेष सोयीसुविधा असणार आहेत. जसे की, निवाऱ्यांच्या बांधकामात टिकाऊ स्टेनलेस स्टीलचा वापर केला जाईल, ज्यावर आकर्षक लेझर कटिंग काम असेल. प्रवाशांना थांबण्यासाठी आरामदायी लीनिंग बार आणि आकर्षक काचेचे काम केले जाईल. ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी प्रवाशांना अंधारात थांबावे लागू नये, यासाठी विशेष विद्युत व्यवस्था केली जाणार आहे, ज्यामुळे हे निवारे रात्रभर प्रकाशमान राहतील.

या प्रकल्पात पूर्णगड, दाभोळ, आडिवरे, नाटे भू, हातीवले, सागवे, देव्हारे, दहागाव, बुरांडी, आंजर्ले, शृंगारतळी, तुरळ, सावर्डे या गावांचा समावेश आहे.



## मुरुड-वावे येथे मोफत आरोग्य तपासणी

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील लायन्स क्लब ऑफ पोयनाड, लायन्स क्लब ऑफ मुरुड जंजिरा, लायन्स हेल्थ फाऊंडेशन आणि वेळास्ते गावचे सरपंच व उपसरपंच यांच्या संयुक्त विद्यमाने दुर्गम ग्रामीण भागातील वावे समाज मंदिर सभागृहात मोफत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबिरात ग्रामस्थांसाठी मोफत आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया, औषध वाटपाबरोबरच मार्गदर्शन व उपचार करण्यात आले.

लायन्स क्लब ऑफ पोयनाडचे अध्यक्ष गुरुनाथ माळी व लायन्स क्लब ऑफ मुरुड जंजिरा चे अध्यक्ष सनी सोगावकर यांच्या विशेष प्रयत्नाने आणि वेळास्ते गावचे सरपंच सनिता शरद खेडेकर व उपसरपंच मिलिंद खेडेकर तसेच मंगेश खेडेकर, सिध्देश शिंदे, प्रकाश पारदले, संकेत कोदरे यांच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात लायन्स हेल्थ फाऊंडेशन अलिबाग सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल व तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर नेरुळ, नवी मुंबई यांनी नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी करण्यात येऊन मोफत औषधे देण्यात आली. अक्युपंक्चर योग-निसर्गोपचार हिलर विजय तांबडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी या शिबिरात एक्युप्रेशर, व्यायाम, योग निसर्गोपचार आदिच्या माध्यमातून विविध शारीरिक समस्यांबाबत मार्गदर्शन व उपचारही करण्यात आले. या शिबिरात ६० पेक्षा अधिक ग्रामस्थांनी लाभ घेतला. त्यापैकी काही रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया चोंढीच्या हेल्थ फाऊंडेशनमध्ये करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

## विमानतळ परिसरात आपत्कालीन रंगीत तालीम

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने सज्जता वाढविण्यासाठी गुरुवारी (दि.९) आपत्कालीन रंगीत तालीम (मॉक एक्सरसाइज) यशस्वीरित्या पार पडली. ही तालीम राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड तसेच, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व्यवस्थापन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. या रंगीत तालमीदरम्यान विविध आपत्तीजन्य परिस्थितींचे प्रतिकात्मक सादरीकरण करण्यात आले. विशेषतः विमान अपघात, आग लागणे, तसेच वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती अशा प्रसंगांवर तात्काळ आणि समन्वयाने कशी कार्यवाही केली जाते, याचा प्रत्यक्ष सराव करण्यात आला. यात पोलीस, अग्निशमन दल, आरोग्य विभाग, आपत्कालीन सेवा यंत्रणा तसेच इतर संबंधित विभागांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या सरावामुळे आपत्कालीन परिस्थितीत विविध यंत्रणांमधील समन्वय अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.



# निवडक

## पनवेल महापालिकेकडून स्वच्छता मोहीम



■ (छायाचित्र -राजेश डांगळे)

**पनवेल :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पनवेल महानगरपालिकेकडून स्वच्छता मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याच्या उद्देशाने विविध ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. पनवेलमधील उन्नती मार्ग ब्रिज परिसरातही या मोहिमेअंतर्गत साफसफाई करण्यात आली. ब्रिजवर काढण्यात आलेल्या चित्रांवर पाण्याचे फवारे मारून स्वच्छता करण्यात आली. तसेच पानांच्या थुंकीचे डाग, तंबाखूचे डाग आणि इतर घाण सर्फच्या सहाय्याने धुऊन काढण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत आरोग्य निरीक्षक स्वतः उपस्थित राहून कामावर लक्ष ठेवत होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यांनी परिसर स्वच्छ करण्याचे काम मनोभावे केले. आगामी आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर शहरातील स्वच्छता राखण्यासाठी ही मोहीम महत्त्वाची ठरत असून नागरिकांनीही स्वच्छतेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे.

## डॉ. महेश निमणे यांना पुरस्कार



**पाताळगंगा :** डॉ. महेश नेमणे सुखी वास्तू स्पिरिच्युअल सर्व्हिसेस या माध्यमातून प्रत्येकाच्या समस्या शोधून त्याचे निराकरण करण्यास अग्रेसर आहेत. त्यांनी अनेक कुटुंब या माध्यमातून सुखी आणि समृद्ध केले. त्याची दखल घेत आजवर ३२ राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी ठरले आहे. यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक अभिनंदन होत आहे. त्यांना मिळालेले हे पुरस्कार त्यांनी घेतलेली मेहनत, त्यांची समाजासाठी असलेली धडपड हे असून त्याच्या माध्यमातून त्यांनी समाज प्रबोधनाचे काम केले. डॉ. महेश निमणे हे वास्तुशास्त्र रेकी, वास्तुशास्त्र, हस्त्रेषा रीडिंग, लोलकशास्त्र पद्धती व काउंसलिंगने सेवा म्हणून नैसर्गिक उपचार पध्दतीनुसार करीत आहे. आजवर अनेकांना त्यांचा लाभ झाला आहे. यामुळे त्यांच्या या कार्याची दखल सातत्याने अनेक संस्था घेत असून आजवर त्यांना मिळालेले पुरस्कार म्हणजे त्यांनी केलेली समाजासाठी योगदानाचे हे प्रतीक असल्याचे मानले जाते.

## बाळू पार्टे यांचे निधन



**उरण :** महाराष्ट्र पोलीस कर्मचारी तथा सामाजिक कार्यकर्ते बाळू कृष्णा पार्टे यांचे शनिवारी (दि.४) अल्पशा आजाराने निधन झाले आहे. मृत्यूसमयी ते ७५ वर्षांचे होते. ते गोरगरिबांना मदत करत असल्याने त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केला जात आहे. एक कर्तव्य दक्ष व प्रामाणिक पोलीस कर्मचारी म्हणून त्यांची सर्वत्र ओळख होती. सेवानिवृत्त झाल्या नंतरही त्यांनी आपल्या आयुष्यात अनेकांना मार्गदर्शन, मदत केली आहे. त्यांच्या पश्चात पाच मुले, दोन मुली, बारा नातू असा त्यांचा कुटुंब परिवार आहे. त्यांचे उत्तरक्रिया विधी बुधवार दि.१५ एप्रिल रोजी सकाळी त्यांच्या राहत्या घरी बोरी, पानसरे आळी, उरण येथे होणार आहे.

## मुख्याध्यापक संघाची कार्यकारिणीची निवड



**उरण :** उरण तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाची विशेष सभा बुधवारी (दि.८) पी.एन.पी. माध्यमिक शाळा मोठी जुई येथे येथे पार पडली. या सभेच्या अध्यक्षपदी सुधीर मुंबईकर हे होते. या सभेसाठी संघाचे संस्थापक अध्यक्ष नाथा नाईक, अरुण घाग, सूरदास राऊत, किशोर भोईर, संतोष म्हात्रे, प्रवीण पाटील, मिलिंद पट्टेबहादूर, मनोज म्हात्रे, सोनाली कोळी इत्यादी सदस्य उपस्थित होते. या सभेत संघाची नवीन कार्यकारिणी नेमण्यात आली. अध्यक्ष म्हणून मिलिंद पट्टेबहादूर, उपाध्यक्ष सोनाली कोळी, सचिवपदी संतोष म्हात्रे आणि खजिनदार म्हणून प्रवीण पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. सभेच्या सुरुवातीला पी.एन.पी. शाळेचे मुख्याध्यापक किशोर भोईर यांनी सर्वांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. त्यांनी प्रास्ताविकात संघाची स्थापनेपासूनची वाटचाल विशद केली. याप्रसंगी सर्व सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## वाढत्या उष्म्यामुळे नागरिक हैराण



**खांब :** मार्च महिन्याच्या शेवटी व एप्रिल महिन्याच्या प्रारंभी उष्णतेच्या प्रमाणात चांगलीच वाढ झालेली असेल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला होता. तर वर्तविण्यात आलेला अंदाज खरा ठरत असून दिवसेंदिवस वाढत चाललेल्या उष्णतेमुळे सारेच हैराण झाले आहेत. मार्च महिन्याच्या सुरुवातीला पहाटे व रात्रीच्या सुमारास वातावरणात थोड्याफार प्रमाणात थंडी जाणवत होती. त्यामुळे दिवसाही बऱ्यापैकी वातावरण थंड असायचे. परंतु मार्च महिन्याच्या शेवटी आणि एप्रिल महिन्याच्या प्रारंभी मात्र परीस्थिती पूर्णपणे बदलली व वातावरणात एकाकी उष्णतेचे प्रमाणात वाढ होऊ लागली आहे. त्यामुळे मानवासह इतर सजीव सृष्टीही हैराण झाली आहे. मागील आठवड्यात राज्याच्या काही भागात अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने त्याही परिणाम म्हणून सर्वत्र अधिक उष्णता जाणवू लागली आहे. तर उष्णतेपासून बचाव व्हावा, याकरिता दुपारच्या सुमारास शक्यतो घराबाहेर पडण्याचे टाळा, सुती कपडे वापरा, शरीराला थंडावा देणारा आहार व पेय घ्या. जेणेकरून होणारा त्रास हा कमी प्रमाणात असेल, असा सल्ला खांब येथील तज्ञ डॉ. महेंद्र म्हात्रे यांनी दिला आहे.

### आरपीएफचे ११ व्हॉट्सअप ग्रूप उपक्रम | आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ मदत मिळणार

# महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी 'स्मार्ट सखी'चा आधार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

पश्चिम रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा बलाने (आरपीएफ) मुंबई उपनगरीय विभागातील महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी 'सखी' हा विशेष व्हॉट्सॲप ग्रूप उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमामुळे महिला प्रवाशांना थेट आरपीएफच्या महिला अधिकाऱ्यांशी संपर्क साधता येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदत मिळवण्यासाठी हा उपक्रम खूपच फायदेशीर ठरणार आहे. आरपीएफने आतापर्यंत चर्चगेट ते डहाणूदरम्यान एकूण ११ व्हॉट्सॲप ग्रूप्स तयार केले असून या माध्यमातून जवळपास १५०० नियमित महिला प्रवासी थेट आरपीएफच्या संपकात राहणार आहेत.

मुंबईच्या उपनगरी रेल्वेने दररोज लाखो महिला प्रवास करतात. मात्र या प्रवासात अनेकदा त्यांना असुरक्षिततेची जाणीव होते. गर्दी, महिलांच्या डब्यात होणारी पुरुषांची जबरदस्तीने ये-जा, तसेच छेडछाड किंवा चोरीसारख्या घटना यामुळे महिलांना त्रास सहन करावा लागतो. त्याच अनुषंगाने अलीकडेच 'सखी' व्हॉट्सॲप ग्रूप उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. महिला उपनिरीक्षक किंवा सहाय्यक महिला उपनिरीक्षक असे महिला अधिकारीच व्हॉट्सॲप ग्रूपचे नेतृत्व करीत आहेत. महिला लोकल प्रवासात कोणत्याही गैरप्रकाराची तक्रार ग्रूपवर करू शकणार आहेत. ग्रुपवर प्रवासातील फोटो, स्थानकाचे नाव आणि अपेक्षित मदतीची माहिती दिल्यास आरपीएफचे जवान पुढच्या एक-दोन स्थानकांतच संबंधित लोकल ट्रेनमध्ये महिला प्रवाशाच्या मदतीसाठी दाखल होणार आहेत.



आरपीएफने महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी कारवाईची कठोर पावले उचलली आहेत. पश्चिम रेल्वेच्या उपनगरी विभागात गेल्या सहा महिन्यांत ६,१९५ घुसखोरांवर रेल्वे कायद्याच्या कलम १६२ अन्वये कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून १३ लाख ८४ हजार १०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

> “महिला प्रवाशांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळणे आवश्यक आहे. याच हेतूने दिव्यांग प्रवाशांच्या ग्रूपच्या धर्तीवर महिला प्रवासी सुरक्षेसाठी 'सखी' व्हॉट्सॲप ग्रूप्स कार्यरत असतील. 'रेल मदत'च्या १३९ हेल्पलाईनबरोबरच हा तात्काळ मदत मिळवून देणारा उपक्रम सुरू राहील. 'सखी' ग्रूपमध्ये अधिकाधिक नियमित महिला प्रवाशांना सहभागी करून घेतले जात आहे. – रजत पुंडगीर, सुरक्षा आयुक्त, रेल्वे सुरक्षा बल सेवा मुंबई विभाग”

## निवडक

### 'मुख्याधिकारी रजेवर, प्रभारी गायब'

**उरण** : उरण नगरपरिषदेचा कारभार सध्या अक्षरशः बेजबाबदार प्रशासनाच्या ताब्यात गेला असून गेल्या तब्बल १० ते १५ दिवसांपासून मुख्याधिकारी रजेवर आणि प्रभारी अधिकारी बेपत्ता असल्याचे संतप्त चित्र समोर आले आहे. मुख्याधिकारी समीर जाधव रजेवर गेल्यापासून नगरपरिषदेची जबाबदारी ज्यांच्याकडे सोपविण्यात आली, ते प्रभारी अधिकारी आजतागायत कार्यालयात आलेलेच नाहीत, अशी गंभीर



तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता फोनही उचलला जात नसल्याने प्रशासनाचा कारभार कोलमडल्याचे स्पष्ट झाले आहे. उरण नगरपारिषदेत आधीच सत्तांतरानंतर राजकीय तणाव निर्माण झाला आहे. नगराध्यक्षपदी महाविकास आघाडीच्या भावना घाणेकर असून नगरसेवकांचे बहुमत भाजपकडे आहे. या सत्तासंघर्षात विकासकामे रखडली असताना आता प्रशासनच गायब झाल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य अशा मूलभूत समस्यांचा ढिग वाढत असताना निर्णय घेणारे अधिकारीच नसल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे. या दरम्यान, १०-१५ दिवस झाले, ना मुख्याधिकारी दिसले ना प्रभारी. मग नगरपरिषदेचा कारभार चालवतोय कोण? असा संतप्त सवाल उरणकर उपस्थित करत आहेत.

### स्टोअर मालकावर कॉपीराईटचा गुन्हा

**नवीन पनवेल** : करंजाडे सेक्टर ४ येथील मेडिकल आणि जनरल स्टोअरमध्ये बनावट ब्युटी क्रीम व सोप या साहित्यांचे कॉपीराईट अधिकारांचे उल्लंघन करून विक्रीसाठी बाळगल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.०करंजाडे येथे एसएमसी गोरी नावाचा बनावट ब्युटी क्रीम, डे नाईट ब्युटी क्रीम आणि साबण विक्री करत असल्याचे कॉपीराईट अधिकारी यांना माहिती मिळाली होती. त्यानुसार करंजाडे सेक्टर ४ येथील संकेश्वर मेडिकल आणि जनरल स्टोअर येथे पोलिसांच्या उपस्थितीत छापा टाकण्यात आला. यावेळी दुकानातील रॅकवर असलेले साहित्य बाहेर काढण्यात आले. त्याची पाहणी केली असता ते बनावट असल्याचे दिसून आले. त्या साहित्याची किंमत ३ हजार १४६ रुपये इतकी असून त्यावर मेड इन पाकिस्तान हा लोगो आहे. हा माल गिरीश प्रकाश जैन यांनी मुंबई येथून खरेदी केला असल्याचे सांगितले. त्यामुळे कॉपीराईटचे उल्लंघन करून विक्रीसाठी बाळगल्या प्रकरणी गिरिश जैन यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वंदना कुरंगले यांचे निधन



**रसायनी** : मोहोपाडा येथील वंदना नारायण कुरंगळे यांचे वयाच्या ७५व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या मृत्युची वार्ता समजताच त्यांच्या निवासस्थानी मोठी गर्दी जमली. त्यांच्यावर मोहोपाडा येथील स्मशानभूमीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाश्चात तीन मले, दोन मुली, पाच नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि.१२) श्री क्षेत्र गुळसुंदे येथे होणार असून उत्तरकार्य बुधवारी (दि.१५) राहत्या घरी मोहोपाडा येथे होणार आहेत, असे कुरंगळे कुटुंबियांकडून सांगण्यात आले.

### पैसे परत न दिल्याने चाकूने वार

**नवीन पनवेल** : पैसे परत न दिल्याने चाकूने वार केल्याची घटना तळोजा परिसरात घडली. या प्रकरणी नुमान अंसारी याच्या विरोधात तळजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मेहबूब शेख हा तळोजा घोट कॅम्प येथे राहत असून त्यांचा मित्र नुमान अन्सारी यांच्यात नेहमी पैशांची देवाण-घेवाण होत असते. दीड महिन्यांपूर्वी नुमानकडून २० हजार रुपये त्यांनी घेतलेले होते. त्यातील ११ हजार रुपये देणे बाकी होते. दि.६ एप्रिल रोजी नुमानने त्याच्याकडे पैसे मागितले. यावेळी चार दिवस थांब, पैसे परत करतो, असे बोलले. त्यावेळी त्यांच्यात वाद झाला आणि नुमान अंसारी याने चाकूने मेहबूब अंसारी यांच्या डोक्यात वार केले. त्यात ते जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण

**नवीन पनवेल** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायतींमधील भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण, लसीकरण व जंतूनिर्मूलन मोहिमेचा शुभारंभ बुधवारी (दि.८) आकुर्ली येथे झाला. रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते या मोहिमेचे उद्घाटन पार पडले. पनवेल तालुक्यात पहिल्यांदाच पहिल्यांदाच श्वानांचे निर्बीजीकरण होणार आहे. याआधी तालुक्यात भटक्या कुत्र्यांच्या चाव्यामुळे अनेक जण जखमी झाले होते. त्यामुळे श्वानांचे निर्बीजीकरण करणे आवश्यक होते. दरवर्षी हजारो नागरिकांना कुत्रे चावे घेतात. त्या संदर्भात अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी देखील पाठपुरावा केला. पनवेलचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर आणि पशुसंवर्धन विभाग यांनी यासाठी पुढाकार घेतला. त्यामुळे वाढत्या भटक्या श्वानांच्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने ही मोहीम अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **जाहिरात : 'विहीर' आपल्या शेती, वाडी, बंगला सोसायटीत पाण्याच्या** सोयीसाठी RCC रिंगाची विहीर बनवून घेण्यासाठी संपर्क करा. रणजित पाटील. फोन : ९८३४३०३९४१, ९८८१६३७०४७ अलिबाग
- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **अलिबाग तालुक्यातील कुर्डूस** हद्दीमध्ये पोयनाड नागोठणे रस्त्यालगत आंबा, नारळ, चिकूची, झाडे असलेली १ एकर जागा विकणे आहे. लाईट, पाणी, रस्ता उपलब्ध मो.९२८४५०६०४१
- **फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला** मुले पाहिजेत १२/१५ वी पास, १५००० महिना, ठिकाण- बामणसुरे संपर्क -९८२३५८५३२१
- **उजाला ज्योतिष व इंग्लिश स्पीकिंग** क्लास, कायदेशीर सल्लागार, डोंबिवली, श्रीवर्धन- ९३२४९८७०५०
- **३५ गुंठे शेत जमीन विकणे आहे.** मौजे कावीर-गरुडपाडा. बोअरवेल आणि इलेक्ट्रीक मीटर आहे. आतील रस्त्याला लागून. संपर्क ९८६७५३०७२७
- **अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ दुकानगाळा** व अलिबागपासून दोन तीन कि.मी. अंतरावर रोडटच एकरवर जागा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, हाऊसकीपर,रेस्टॉरंट कॅप्टन, हाऊसकिपिंग सुपरवायझर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसॲपवर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# श्रीवर्धनमध्ये भ्रष्टाचाराचा कचरा उफाळला

## ।। सफाई कामगारांच्या आंदोलनाचा आठवा दिवस ।। संपूर्ण शहराचे आरोग्य धोक्यात



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

स्वच्छतेचा वसा घेतलेल्या हातांना उपासमारीच्या दरीत लोटणाऱ्या श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाचा क्रूर चेहरा आता पूर्णपणे उघडा पडला आहे. कंत्राटी सफाई कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी सुरू असलेल्या आंदोलनाचा गुरूवारी (दि.९) सलग ८ वा दिवस असून, प्रशासनाच्या आणि ठेकेदाराच्या आडमुठ्या धोरणामुळे संपूर्ण शहराचे आरोग्य आता धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे, या आंदोलनाला आता सर्वपक्षीय पाठिंबा मिळाल्याने हे आंदोलन प्रशासनाविरुद्ध०च्या जनआक्रोशात रूपांतरित झाले आहे.

काही दिवसांपूर्वी पार पडलेल्या सर्वसाधारण सभेमध्ये सुप्रिया चोगले यांनी या सफाई कामगारांच्या पिळवणुकीचा मुद्दा अत्यंत प्रभावीपणे मांडला होता. कंत्राटदार कशाप्रकारे ६२७ रुपयांऐजी केवळ ३३३ रुपये देऊन कामगारांचे शोषण करत आहे, याचा पर्दाफाश त्यांनी केला होता. त्यांच्या त्या भूमिकेचे संपूर्ण स्तरातून कौतुक होत असून, त्यांनी पेटवलेली ही ठिणगी आता वणवा बनली आहे. कंत्राटी सफाई कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाच्या विरोधात आंदोलन छेडण्यात आले आहे. गेल्या आठ दिवसांपासून एकही घंटागाडी फिरली नसल्याने श्रीवर्धनमधील गल्लीबोळांत कचऱ्याचे डोंगर साचले आहेत. कुजणाऱ्या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रशासनाच्या आणि कंत्राटदाराच्या पैशाच्या हव्यासापोटी सामान्य जनतेला का वेठीस धरले जात आहे? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

दरम्यान, या ठिय्या आंदोलनात कामगारांच्या या लढ्याला धार देण्यासाठी श्रीवर्धनमधील मातब्बर राजकीय नेते रस्त्यावर उतरले आहेत. त्यांनी प्रत्यक्ष आंदोलनस्थळी भेट देऊन आपले जाहीर निवेदन सादर केले आणि कामगारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. तसेच, प्रशासकीय भ्रष्टाचारावर कडाडून टीका देखील केली आहे. या सर्व पक्षीय नेत्यांच्या सहभागामुळे आता हे आंदोलन केवळ कामगारांचे न राहता श्रीवर्धनच्या स्वाभिमानाची लढाई बनले आहे.

आंदोलनाचा आठवा दिवस उजाडला तरी प्रशासन आणि ठेकेदाराला अद्याप पाझर फुटलेला नाही. वातानुकूलित केबिनमध्ये बसून फाईलींवर सह्या करणाऱ्या अधिकाऱ्यांना कडाड्याच्या उन्हात रस्त्यावर बसलेल्या कामगारांच्या घामाची आणि त्यांच्या भुकेलेल्या पोरांची किंमत उरलेली नाही. स्वतःच्या तिजोऱ्या भरण्यासाठी गरिबांच्या ताटातील घास पळवणारा ठेकेदार आणि त्याला मूक संमती देणारे अधिकारी यांच्यातील अर्थपूर्ण संबंधांमुळेच आजही तोडगा निघालेला नाही. ज्या हातांनी श्रीवर्धनची सेवा केली, त्या हातांना पगार नाकारणाऱ्या कंत्राटदाराची पाठराखण प्रशासन का करत आहे? जर तातडीने तोडगा निघाला नाही, तर हे आंदोलन नगरपरिषदेच्या मुख्य खुर्चीपर्यंत पोहोचल्याशिवाय राहणार नाही, असा थेट इशारा देवेंद्र भुसाणे यांनी दिला आहे. पुढील दोन दिवस श्रीवर्धनसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. जर प्रशासनाने आपला दगड झालेला स्वभाव बदलला नाही आणि ठेकेदाराची मुजोरी मोडीत काढली नाही, तर संपूर्ण शहर या अन्यायाचा फैसला रस्त्यावर उतरून केला जाईल, असे आंदोलकांनी स्पष्ट केले आहे.

## गृहिणींना इलेक्ट्रिक इंडक्शनचे वाटप



● (छायाचित्रः राकेश खराडे)

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी पाताळगंगा येथील औद्योगिक परिसरातील वानिवली गावातील १२० महिलांना इलेक्ट्रिक इन्फ्रारेड इंडक्शनचे वाटप करण्यात आले. त्यामुळे येथील महिलावर्गात आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.

इराण अमेरिका युद्धाचा परिणाम गॅस पुरवठ्यावर झाल्याने रसायनी परिसरात अपुरा पुरवठ्यामुळे गृहिणींना स्वयंपाक करताना अडचणी येत आहेत. त्यासाठी वडगाव वाशिवली गावाजवळ असणाऱ्या फ्रिनस्टर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे सर्वेसर्वा विशेष अगरवाल यांच्या सहकार्याने सिएसआर फंडातून इलेक्ट्रिक इन्फ्रारेड इंडक्शनचे १२० महिला कुटुंबांना वाटप करण्यात आले. यावेळी कंपनी युनिट हेड जितेंद्र तिवारी, प्लांट हेड तुषार तळेकर, अक्षय यादव, मेंटेनन्स हेड कौशिक पाल, एचआर हेड अनिल जांभळे, माजी सरपंच सुनील थोरवे आदींसह मान्यवर उपस्थित होते. गॅसच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे वानिवलीत गृहिणींना स्वयंपाक करणे कठीण झाले होते. त्यातच इलेक्ट्रिक इन्फ्रारेड इंडक्शन शेगडी मिळाल्याने महिलांनी फिनस्टार ब्लॅक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे आभार मानले. दरम्यान, फिनस्टार ब्लॅक कंपनीकडून शालोपयोगी साहित्य वाटप, कापडी पिशव्यांचे वाटप, शाळांना कपाट तसेच शैक्षणिक साहित्य वाटप इत्यादी उपक्रम सुरूच आहेत.

## घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

**नवीन पनवेल** : नवीन पनवेल येथील घराचा दरवाजाचा तोडून लाखो रुपये किमतीचा ऐवज चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोविंदा पेरूमल हे नवीन पनवेल सेक्टर १४ येथे राहतात. ते घरी परतले तेव्हा त्यांना त्यांच्या घराच्या लोखंडी सेफ्टी दरवाजाला लावलेले कुलूप दिसून आले नाही. त्यांनी दरवाजा उघडून पाहिले असता घरातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्यांनी पाहणी केली असता घरातील पैसे आणि सोन्याचे दागिने दिसून आले नाहीत. चोरट्याने त्यांच्या घरातील सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ४ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

## रत्नेश्वरी देवीचा यात्रोत्सव



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील जसखार गावची ग्रामदेवता श्री रत्नेश्वरी देवी ही सुमारे १५० वर्षांपूर्वी एका तळ्यातून प्रगट झाल्याची श्रद्धा आहे. त्या काळी जसखार गावातील ग्रामस्थ शेती, आगरकाम आणि मच्छिमारी करून उदरनिर्वाह करत होते. मात्र, शेतीसाठी पाण्याची तीव्र टंचाई भासत असल्याने गावकऱ्यांनी एकत्र येऊन तलाव खोदण्याचा निर्णय घेतला. सध्याच्या जेएनपीटी परिसरात त्यावेळी तलाव खोदण्याचे काम सुरू होते. काही दिवसांनी चैत्र अष्टमीच्या दिवशी खोदकामादरम्यान देवीची मूर्ती सापडली. देवीच्या तेजस्वी रूपावरून तिचे 'श्री रत्नेश्वरी देवी' असे नामकरण करण्यात आले. त्यानंतर गावकऱ्यांनी वर्गणीतून तलावाजवळच प्रारंभी छोटे मंदिर उभारले. देवीच्या प्रगटदिनानिमित्त चैत्र अष्टमीला यात्रोत्सव साजरा करण्याची परंपरा सुरू करण्यात आली. यावर्षी देवीचा यात्रोत्सव शुक्रवारी (दि.१०), तर पालखी सोहळा शनिवारी (दि.११) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने हजारोंच्या संख्येने भाविक दर्शनासाठी येण्याची अपेक्षा आहे.

## मेहनती महिलांचा विशेष सन्मान




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील झुगरेवाडी आणि परिसरातील असंख्य महिला आपले कुटुंबासाठी वेगवेगळ्या प्रकारची मेहनत घेत आहेत. अशा महिलांचा सन्मान झुगरेवाडी येथे शाळा व्यवस्थापन समितीच्यावतीने आयोजित एका कार्यक्रमात करण्यात आला.

रायगड जिल्ह्यातील उपक्रमशील शाळा झुगरे वाडी येथे आगळ्यावेगळ्या कर्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी येथील रानावनात, वीटभट्टीवर व शेतात ऊन-वारा तसेच पावसाची तमा न बाळगता सतत कष्ट करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. कुटुंब व समाजासाठी सदैव स्वतःच्या भावनांना मुरड घालून, स्वतः दुर्लक्षित राहून आपल्या मुलांनी चांगले शिक्षण घेऊन समाजाचा नावलौकिक वाढवावा, यासाठी सदैव तत्पर असणाऱ्या माता पालकांचा सन्मान राजश्री पाटील, रोहिणा वाघ, दर्शना ठोंबरे व राधिका यांच्या हस्ते करण्यात आला. महिलांच्या जीवनात सदैव कष्ट असतात; परंतु, आपल्या माणसाने आपला सन्मान केला तर त्याचे सुख काही औरच असते. महिला घरात जे काम करत असते ते दिसून येत नाही. त्यामुळे आपले काम कमी आहे, असे आपण समजू नये, असा मोलाचा सल्ला राजश्री पाटील यांनी दिला

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या कुटुंबाला आधार देणाऱ्या माता, बहीण, आत्या यांच्याविषयी आदराची भावना निर्माण होऊन, कष्ट करण्याची व श्रमाची प्रतिष्ठा निर्माण होईल यात शंका नाही. या कार्यक्रमाला लक्ष्मण पादिर, जनार्धन निर गुडा व माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेल्वे प्रश्नांसाठी मोहोळ यांना साकडे

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे रेल्वे स्थानकाच्या मध्यावर्ती ठिकाणी असलेले कर्जत रेल्वे स्थानक अनेक समस्यांनी घेरले आहे. या समस्या सोडवण्यासाठी रेल्वे प्रवासी संघटना आणि कर्जतकरांनी रेल्वे प्रशासनाला अनेक निवेदन दिले आहेत. तसेच, रेल्वे मंत्र्यांची देखील कर्जत रेल्वे स्थानकावर भेट घेण्यात आली होती. परंतु, अद्यापही कर्जत स्थानकातील समस्या सुटालेल्या नाहीत. त्यामुळे कर्जतकरांचा केंद्रीय मंत्री व खासदार यांच्यावरील विश्वास दिवसेंदिवस उडत चालला आहे. तरीही कर्जतकर विविध मार्गातून हे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करित आहेत.



दरम्यान कर्जत, खोपोली, नेरळ, मोहापाडा, रसायनी व पेण या भागातील राजस्थानला जाणाऱ्या प्रवाशांनी काही दिवस अगोदर झेडआरयूसीसी सदस्य नितीन परमार यांची भेट घेतली होती. या भेटीदरम्यान त्यांनी, पुण्याहून सुरू झालेली हडपसर-जोधपुर या गाडीला कर्जत येथे थांबा मीळण्यासाठी प्रयत्न करावे. ही गाडी सुरू होण्यासाठी पुण्याचे खासदार व केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी प्रयत्न केले होते. तरी आपल्यातर्फे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना पत्र देण्यात यावे व या गाडीला कर्जत येथे थांब मिळावा, अशी विनंती आणि निवेदन देण्यात आले. त्यावर झेडआरयूसीसी सदस्य नितीन परमार म्हणाले की, काही दिवसा अगोदर या विषयावर मी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची प्रत्यक्ष भेट घेतली असून या संदर्भात त्यांना निवेदन दिले असल्याचे सांगितले.

## खारघरमध्ये ट्रकची तरुणाला धडक

**नवीन पनवेल** : ट्रकने १६ वर्षीय तरुणाला धडक दिल्या प्रकरणी ट्रक चालका विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अवधूत कोल्हारेकर हा तळोजा, फेस १ येथे राहत असून तो रिक्षाने चित्रपट पाहायला खारघर येथे जात होता. रिक्षातून उतरून सिग्नल चालू असल्याने रस्त्याच्या साईडला धानसर टोल नाका ते नावडे महामार्ग रोडवरकडून ट्रॅफिक चौकीच्या समोर तो उभा होता. यावेळी त्याला ट्रक चालकाने समोरून ठोकर मारून अपघात केला. या अपघातामध्ये त्याच्या उजव्या पायाला गंभीर दुखापती झाली आहे.

## बालमृत्यू दफनभूमीसाठी जागेची मागणी

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

बालमृत्यू दफनभूमीसाठी शासन स्तरावर पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी व परिसरात जागा उपलब्ध करून देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनचे सरचिटणीस विनायक गांधी यांनी आमदार विक्रांत पाटील आणि रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. वाढते प्रदूषण तसेच निसर्गाच्या हानीमुळे मानवी जीवन जिकरीचे झाले आहे. सध्याच्या युगात नवोदयात बालकांमध्ये कमी दिवसात जन्माला येण्याचे प्रमाण वाढत आहे. अशातच सहाव्या आणि आठव्या महिन्यात जन्माला आलेली मुले अवयवात योग्य वाढ होत नसल्याने बहुदा मृत्युमुखी पडतात. त्यामुळे अशा आणि इतर बालकांच्या मृत्यूच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. पनवेल परिसरात अशा प्रसंगी मृत बालकांच्या शवाला दफन करण्यासाठी नातेवाईकांना दफन जागेअभावी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अनेक तास या मृत बालकांच्या शवाची हेळसांड होत असते. त्यामुळे मृतांच्या नातेवाईकांचे प्रचंड हाल होत आहेत. तरी याविषयी गांभीर्याने लक्ष देऊन मृत बालकांच्या शवासाठी दफनभूमीच्या जागेची व्यवस्था उपलब्ध करून नातेवाईकांची होत असलेली अवहेलना दूर करावी, अशी मागणी विनायक गांधी यांनी रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

### देश-विदेशातून मोठ्या प्रमाणात मागणी | नागवेकर कुटुंबाचे कस्टमाईझ अंतरपाट

# कलेतून व्यवसायाची भरारी

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील नागवेकर कुटुंबाने आपल्या कलेच्या जोरावर व्यवसायाची नवी दिशा निर्माण केली आहे. त्यांनी लग्नसोहळ्यांतील महत्त्वाचा घटक असलेल्या अंतरपाटाला 'कस्टमाईझ' स्वरूप देत आज देशासह विदेशातही आपली ओळख निर्माण केली आहे.

कोणताही सण वा लग्नसोहळा अधिक आकर्षक आणि लक्षवेधी बनवण्यासाठी विविध पर्याय उपलब्ध असतात. मात्र, उरणमधील सिद्धार्थ नागवेकर यांनी आपल्या






> सध्या आम्ही कस्टमाईझ अंतरपाट तयार करून ग्राहकांच्या आवडीनुसार विविध डिझाईन साकारत आहोत. विशेष म्हणजे महाराष्ट्राबरोबरच इतर राज्ये तसेच परदेशातूनही त्यांच्या अंतरपाटांना मागणी येत आहे.
> –सिद्धार्थ नागवेकर

चित्रकलेच्या जोरावर अंतरपाट तयार करण्याची अनोखी कल्पना प्रत्यक्षात आणली आहे. मित्रांच्या लग्नासाठी तयार केलेल्या अंतरपाटाचा व्हिडीओ त्यांचा लहान भाऊ सोमील नागवेकर यांनी सोशल मीडियावर प्रसिद्ध केला होता. या व्हिडीओला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाल्यानंतर त्यांच्या या कलेचे व्यवसायात रूपांतर झाले.

या व्यवसायात संपूर्ण कुटुंबाचा सहभाग असून प्रत्येक सदस्य आपापली जबाबदारी पार पाडत आहेत. सिद्धार्थ नागवेकर अंतरपाटावर चित्रांकन करतात, तर त्यांचे वडील राजेश नागवेकर सुंदर कॅलिग्राफीद्वारे नावे लिहितात. आई अंतरपाटाला शिवणकाम व सजावटीची जबाबदारी सांभाळते, तर भाऊ सोमील सोशल मीडियावर व्हिडीओ तयार करून प्रसिद्धीचे काम पाहतो. नागवेकर कुटुंबाने ग्राहकांच्या मागणीनुसार विविध भाषांमध्ये अंतरपाट तयार करणे, दोन्ही बाजूंनी नावांची मांडणी, आकर्षक डिझाईन आणि वेळेत डिलिव्हरी या वैशिष्ट्यांमुळे या व्यवसायात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आजच्या तरुणांनी मोबाईलपुरते मर्यादित न राहता आपल्या अंगी असलेल्या कलेचा उपयोग करून त्याचे व्यवसायात रूपांतर केल्यास यश मिळू शकते, असे मत सिद्धार्थ नागवेकर यांनी व्यक्त केले आहे. कलेला व्यवसायाची जोड देत उरणच्या नागवेकर कुटुंबाने उंच भरारी घेतली असून, स्थानिक तरुणांसाठी ते प्रेरणादायी ठरत आहेत.

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. बळीराम पांडुरंग मढवी यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. रामनिरंजन चिरंजीलाल झुनझुनवाला यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे डोंगरपाडा, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ५१/१/अ एकुण ०.९३.१७ पोटखराबा ०.२३.६५ असे एकूण क्षेत्र १.१६.८२ जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १०/०४/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक राजेश गणपत पाठारे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे खांडपोली; तालुका सुधागड जिल्हा रायगड येथील**

| गट नंबर | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|
| १४ | एकूण क्षेत्र ०-३५-९० | २-७५ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - पाली सुधागड
दि. १०/०४/२०२६

सही/-
**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
पत्ता-जांभूळपाडा तालुका सुधागड जिल्हा रायगड
मोबाईल नंबर-९१६८८०१०४८

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. श्रीराम भिकाजी पाटील व श्री.वसंत भिकाजी पाटील यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे भालिवडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील शेतजमीन मिळकत सर्व्हे नं २९/३ एकुण ०.३८.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी शेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा,बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १०/०४/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक पमा मारुती घारे यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १८ | २/ब | ०-१६-१० पैकी खरेदी देणार यांचे अविभक्त हिश्श्याचे क्षेत्र | २-५० |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.१०/०४/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक मनोज गुणाजी कसालकर यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे वडवली तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड | ६९/१३ | ०.२३.०० | ०.२२ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व ईतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक: १०/०४/२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता.कर्जत, जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे बेलकडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १. रूपेश नथुराम कार्लेकर, २. रेश्मा मंगेश म्हात्रे, ३. मनस्वी ऊर्फ हेमा मनोज मोकल, ४. सिद्धार्थ बबन मोरे, ५. रितेश बबन मोरे सर्व रा. कुरुळ पो. कुरुळ ता. अलिबाग यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| बेलकडे ता. अलिबाग जि. रायगड | ४४३ | २-०३-७०<br>पो.ख. ०-१६-७०<br>एकूण क्षेत्र २-२०-४० | ४०.९२ |

वर नमुद भातशेती मिळकतीपैकी श्री. रुपेश नथुराम कार्लेकर वैगरे ४ यांच्या मालकी हक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील अविभक्त हिश्श्याच्या मिळकतीपैकी पूर्व दिशेकडील ०-०३-०० हे. आर मिळकत

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- १०/०४/२०२६

सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालया समोर गाळा क्र. ३, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. राजेंद्र कुमार त्रिपाठी, श्री.विजयशंकर विश्वनाथ शुक्ला यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे भोईरवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील शेतजमीन मिळकत सर्व्हे नं ११/१/ब/१ एकुण ०.५८.०० गुंठे जागा पैकी लिहून देणार श्री. राजेंद्रकुमार त्रिपाठी, श्री. विजयशंकर विश्वनाथ शुक्ला यांचे हिश्श्याचे ०.२४.०० गुंठे विकत घेणार आहेत. तरी शेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १०/०४/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हुमगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत तिचे मालक निपुण सुमनलाल मेहता यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ३९ | १ | ०-९८-७०<br>पैकी ०-३८-७० | ६.१० |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विकीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही निर्वेध, बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणा-या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. १०/०४/२०२६
मो. ९८५०८९९२२९

**ॲड. सुवर्णा लक्ष्मीकांत चंदन.**
शिव ओम कॉम्प्लेक्स, मुद्रे (बु.)
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.

# ग्रुप ग्रामपंचायत जासई
## मु. पो. जासई, ता. उरण, जि. रायगड
## जाहिर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत जासई ता. उरण, जि. रायगड, या कार्यालयाकरीता सन २०२६/२०२७ या आर्थिक वर्षाकरीता खालील वस्तूंची दर माल पुरवठादारांकडून मागविण्यात येत आहेत. त्याप्रमाणे इच्छूक मान्यता प्राप्त व GST धारक पुरवठादारांकडून माल मागविण्यात येत आहेत. त्या प्रमाणे इच्छुक मान्यता प्राप्त माल पुरवठादारांनी शिले बंद दर पत्रक सादर करण्यात यावेत.

| अ.नं | कामाचे नाव | निधी उपलब्धता | तरतूद | दरपत्रक सादर करण्याची मुदत पासून | दरपत्रक सादर करण्याची मुदत पर्यंत | दरपत्रक उघडण्याची तारीख | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यालयीन वापराकरीता लागणारी सर्व प्रकारची स्टेशनरी | ग्रामनिधी | २,९५,००० | १०/०४/२०२६ | १६/०४/२०२६ | १७/०४/२०२६ सकाळी ११.०० वाजता | १२ महिने |
| २ | कार्बोलिक पावडर | ग्रामनिधी | २,९५,००० | १०/०४/२०२६ | १६/०४/२०२६ | १७/०४/२०२६ सकाळी ११.०० वाजता | १२ महिने |
| ३ | टी.सी.एल पावडर | ग्रामनिधी | ५०,००० | १०/०४/२०२६ | १६/०४/२०२६ | १७/०४/२०२६ सकाळी ११.०० वाजता | १२ महिने |
| ४ | मेडीक्लोर बॉटल | ग्रामनिधी | २,००,००० | १०/०४/२०२६ | १६/०४/२०२६ | १७/०४/२०२६ सकाळी ११.०० वाजता | १२ महिने |
| ५ | कर्मचारी गम बुट, रेनकोट, छत्री (१ ते १६ कर्मचारी) | ग्रामनिधी | १,००,००० | १०/०४/२०२६ | १६/०४/२०२६ | १७/०४/२०२६ सकाळी ११.०० वाजता | १२ महिने |
| ६ | पावसाळी रस्त्यावर चिकटी कामी चुना खरेदी | ग्रामनिधी | २,००,००० | १०/०४/२०२६ | १६/०४/२०२६ | १७/०४/२०२६ सकाळी ११.०० वाजता | १२ महिने |
| ७ | मान्सुन नाले सफाई करीता लागणारे साहित्य (पिका, फावडे, कुदल कोयते, पंजे, झाडू, पारय, व इतर आवश्यक वस्तू ) | ग्रामनिधी | १,५०,००० | १०/०४/२०२६ | १६/०४/२०२६ | १७/०४/२०२६ सकाळी ११.०० वाजता | १२ महिने |

**अटी व शर्ती**

१. दरपत्रक मोहोर बंद पाकिटात मा. सरपंच, ग्रामपंचायत जासई याचे नावे दिनांक १०/०४/२०२६ ते १६/०४/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२. वस्तु पुरवठादार हा शासनाच्या GM Portal वर नोंदणीकृत असावा.
३. कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
४. ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १७/०४/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.
५. कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधित ठेकेदारास कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

दिनांक :- १०/०४/२०२६

**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्राम पंचायत जासई**

**सरपंच**
**ग्रुप ग्राम पंचायत जासई**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हुमगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत तिचे मालक निपुण सुमनलाल मेहता यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ३९ | १ | ०-९८-७०<br>पैकी ०-६०-०० | ६.१० |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही निर्वेध, बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. १०/०४/२०२६
मो. ९८५०८९९२२९

**ॲड. सुवर्णा लक्ष्मीकांत चंदन.**
शिव ओम कॉम्प्लेक्स, मुद्रे (बु.)
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. गिरीश विनायक सिनकर रा.बी-१ देबोनेर सोसायटी, अल्मेडा रोड, पाचपाखाडी, ठाणे यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| वेश्वी | ७१/ब/२१ | ३.८७.०० | ३८.७० |

सदर वर नमूद केलेली बिनशेती मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध, बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (०७) सात दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख ०७/०४/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
ऑफिस पत्ता : दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो. अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. ९९२२७१७०३१

अर्जदार तर्फे वकील,
श्री. जयेश जोशी

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (व.स्त.) रायगड यांचे न्यायालयात**

दिवाणी चौ.अर्ज नं.४६/२०२६

श्रीमती सुप्रिया गजानन अंबाडे — अर्जदार
वि.
श्री. आशिष गजानन अंबाडे, वगैरे — सामनेवाले

ज्याअर्थी श्रीमती सुप्रिया गजानन अंबाडे यांनी या न्यायालयात कै. गजानन काशिनाथ अंबाडे यांचे निधनापश्चात त्यांचे मालकीच्या टाटा इंडिका व्हीस्टा टेरा टीडीआय या बनावटीची MH06 AZ 6955 या क्रमांकाच्या चारचाकी वाहनाचे कागदोपत्री स्वत:च्या नावाची नोंद करून मिळण्याकरता वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केला आहे. तरी, सदरील अर्जदार हिचे नावे वारस दाखला देण्यास अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती कागदोपत्री पुराव्यासह स्वत: अगर वकिलांमार्फत दिनांक ४/५/२०२६ रोजी या न्यायालयात सकाळी १०.३० वाजता हजर राहून द्याव्यात. कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार हिचे नावे वारस दाखला देण्यात येईल हे सर्वांस कळावे.

आज दिनांक ९/४/२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी ही नोटीस दिली.

**सही/-**
**कनिष्ठ लिपिक,**
**दि.न्या.व.स्त.**
**रायगड-अलिबाग**

**सही/-**
**अधिक्षक**
**दि.न्या.व.स्त.**
**रायगड-अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे वरई तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

मौजे वरई तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत.

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आर.चौ.मी) | आकारणी (रु.-पै.) |
|---|---|---|---|---|
| श्री. संदिप काशिनाथ राऊत | २ | ५ | ०-१६-८० | ०-५५ |

वरील मिळकती या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार अधिवक्ता यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दिनांक :- १०/०४/२०२६
कार्यालयीन पत्ता :-
१०१, वृंदावन अपार्टमेंट, तळ मजला
विठ्ठल नगर, अभिनव ज्ञानमंदिर शाळेजवळ
मु.पो. ता. कर्जत जि. रायगड ४१०२०१

सही /-
**अधिवक्ता अनघा गणपत गायकवाड**
मो. - ७७०९८३५००४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - आंभेरपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| यशोदा यशवंत ऐनकर व इतर. | ७५ | ० | १-६०-०० | ३ | ४२ |
| | यापैकी मालकीचे विक्री केलेले क्षेत्र हे १ आर ४० पॉ ०० मात्र. | | | | |
| राजेंद्र कृष्णा घरत | ७५ | ० | ०-४५-०० | ० | ९६ |
| सत्यवान बंडु म्हात्रे<br>शोभा एकनाथ म्हात्रे | ७५ | ० | ०-६०-०० | १ | २८ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- १०/०४/२०२६

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-

**मौजे कामार्ले, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.**

| मौजे | भुमापन क्र./उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| कामार्ले | ५८/३ | ९३.००.०० | ९३०.०० |

येणेप्रमाणे वर्णनाची बिनशेती मिळकत व त्यात असलेले ग्रुप ग्रामपंचायत कामार्ले मालमत्ता क्र. ९३, ९४ अ, ९४ ब, ९५ अ, ९६, ९७, १२४ व १९१ आणि त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरे सह अशा मिळकती बाबत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. हुसेन अली कासम अली राजानी, मु.अंधेरी, मुंबई यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे आशिल यांस दिला आहे. माझे आशिल यांनी श्री. हुसेन अली कासम अली राजानी यांचे सदरहू मिळकती वरील मालकी हक्काची तपासणी करणेच्या सुचना दिल्या आहेत. सबब, याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचे हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख ०८.०४.२०२६

**(ॲड. एस. वाय. बारटके)**
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-पाल्हे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नंबर १, क्षेत्र ०-२०-०० हे.आर., पो.ख. ०-०२-३० हे. आर., एकूण क्षेत्र ०-२२-३० हे. आर., आकार ५.०६ रू. पै. पैकी क्षेत्र ०-०६-०० हे. आर., ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. राजाराम भास्कर पाटील रा. मु. पाल्हे, नागांव ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०९/०४/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,
ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर,
ब्राह्मण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौज आंबेघर, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक सौ.रेश्मा सचिन पाटील रा.आंबेघर, ता. पेण, जि.रायगड यांच्या मालकीची असून सदर मिळकत आमचे अशिल श्री. भरत दत्तु पाटील रा.गांगल आळी, पेण, जि.रायगड यांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत मिळकतीचे विद्यमान मालक व आमचे अशिल यांच्यामध्ये साठेकरार झालेला आहे.

मिळकतीचे वर्णन :- जिल्हा व तुकडी रायगड, तालुका व पोटतुकडी पेण, मौजे आंबेघर येथील गट नं. ६६/अ, एकुण क्षेत्र ०.७२.८० हे.आर.पॉ.आकार ११.८७ या मिळकती पैकी सौ.रेश्मा सचिन पाटील हिच्या हिश्याची ०.०१.०० हे.आर. मिळकत, आकारणी ०.२८ रु.पैसे फेरफार क्र. २५२० ने प्राप्त झालेली भुजमीन व त्यावरील ग्रुप ग्रामपंचायत आंबेघर घर क्र. ९७५ अ.क्र. १०४८ एकुण क्षेत्र ही मिळकत. वर वर्णन केलेली मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदरची मिळकत निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिला आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा हक्क, लिज, लिन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरुपात, योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी, सदर मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पेण.
दि. १०/०४/२०२६

सही
**(ॲड. नरेंद्र एच.बाफणा)**
मु. पेण, ता.पेण, जि.रायगड
फोन नं. ९०२८६७६००३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे-उद्धर ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे-उद्धर ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | स. नं. /हि. नं. | क्षेत्र. हे आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. हेमंत अनंत खाडे | ४७/२ | ०-४५-५० | ३-२५ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्रीबाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी, वहीवाट, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसबंध वहीवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहीवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत १४ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण पाली - सुधागड
दिनांक :- ०९/०४/२०२६

सही /-
**श्री. राहुल जे. भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता. सुधागड, जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील लिहून देणार मिळकतीचे मालक नलिनी गजानन पाटील खरेदीखत लिहून घेणार कांता मोटवानी यांनी खालील वर्णन केलेली मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे

**मौजे पाषाणे ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| १४/३अ/३ब/३क/५/१/१ब | ०.२३.०० गुंठे<br>पो.ख ०.०७.० गुंठे<br>एकूण ०.३०.०० गुंठे | ०.२४ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, विकसनकरार, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दिनांक १०/४/२०२६

सही/-
**ॲड. किशोर अनंता दिघे**
पत्ता - तुलसी सेंटर पॉइंट
ऑफिस नं. ४२, पहिल मजला,
नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
मो.-८००७९७०१५१

## निवडक

### वरसोली येथे पाठांतर स्पर्धा संपन्न

**अलिबाग :** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) अलिबाग आणि उद्यम सखी संस्था अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने वरसोली येथे पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. ही स्पर्धा रविवारी (दि.५) ६ ते १० आणी ११ ते १८ या वयोगटातील अमृत वर्गामध्ये येणाऱ्या मुलांसाठी रामनाथ येथील रामजी देवस्थानात घेण्यात आली. यावेळी मुलांमधे भारतीय संस्कृतीच्या, हिंदू धर्माच्या, भारतीय राष्ट्रीयत्वाच्या संस्कारांची रुजवात होणे व त्यांचे संवर्धन होणे, त्याच बरोबर ईशभक्ति निर्माण होणे यासाठी अमृत संस्था गेल्या काही महिन्यांपासून मुलामुलींच्या संघटनासाठी प्रयत्नशील आहे. ही संस्था नियमितपणे त्यांच्यात परस्पर सामंजस्य, सलोखा, सहकार्य निर्माण होण्यासाठी काही बैठे/मैदानी खेळ, स्तोत्रपठण इ.कार्यक्रम राबवीत असते. या उपक्रमाला स्थानिकांकडून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत आहे. या स्पर्धेत अमृतचे शैलेश मराठे यांनी पुढाकार घेतला होता. तसेच, उद्यम सखी संस्था अलिबाग यांच्या प्रार्थना दामले-नागवेकर यांनी त्यांना सहकार्य केले. रामजी देवस्थानच्या विश्वस्तांनीसुद्धा या कार्यक्रमासाठी जागा उपलब्ध करून दिली. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून अनघा मराठे, जान्हवी पाटील, व प्रणिता म्हात्रे यांनी काम पाहिले.

### रायगडावर रोप-वे रेस्क्यू मॉक ड्रिल

**अलिबाग :** आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने एनडीआरएफ यांच्या मार्फत रायगड रोप-वे रेस्क्यू ऑपरेशनची मॉक एक्सरसाइज मंगळवारी (दि.७) किल्ले रायगड येथे यशस्वीरित्या पार पडली. या सरावाचा उद्देश आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ आणि समन्वयित प्रतिसाद देण्याची क्षमता वाढविणे हा होता. या मॉक ड्रिलमध्ये रोप-वेवरील संभाव्य अपघात गृहित धरून बचावकार्याची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके करण्यात आली. प्रशिक्षित जवानांनी अत्याधुनिक उपकरणांच्या सहाय्याने अडकलेल्या प्रवाशांची सुरक्षित सुटका करण्याची प्रक्रिया दाखवून दिली. या उपक्रमात भारतीय सेना, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, महाड उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, आपदा मित्र, रायगड रोप-वे प्रशासन, आरोग्य विभाग तसेच महाड अग्निशमन दल यांचा सहभाग होता. सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधत अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रभावीरीत्या ही मॉक एक्सरसाइज पूर्ण केली. अशा प्रकारच्या सरावांमुळे प्रत्यक्ष आपत्तीच्या वेळी होणारी हानी कमी करण्यास मदत होणार असून प्रशासनाची तयारी अधिक भक्कम होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.





### महाविद्यालयाचा पदवी प्रदान सोहळा

**माणगाव :** गोरेगाव येथील दोशी वकील आर्टस् अँड जी.सी.यू.बी. सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा तसेच पदवी प्रदान कार्यक्रम मंगळवारी (दि.७) संपन्न झाला. या कार्यक्रमाला संस्थेचे विश्वस्थ व चेअरमन श्रीनिवास बेंडखळे, उपाध्यक्ष अरुणा दिलीपशेठ, सदस्या साक्षी गांधी यांच्यासह महाविद्यालयाचे प्रा.डॉ. जनार्दन होटकर, उपप्राचार्य विवेक पाटील, परीक्षा विभाग प्रमुख डॉ. श्रीकांत चांदोरकर व सर्व प्राध्यापक उपस्थित होते. प्राचार्य डॉ. जनार्दन होटकर यांनी प्रास्ताविकात शैक्षणिक वर्षातील गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या यशामागील परिश्रम व प्रगतीचा आढावा घेतला. त्यानंतर प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्यार्थ्यांना विविध पारितोषिके प्रदान करण्यात आली. तसेच, महाविद्यालयातील शिक्षकांनी मिळवलेल्या एकूण चार पेटंट्सबद्दल चेअरमन श्रीनिवास बेंडखळे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर दुपारी पदवी प्रदान सोहळा पार पडला. यावेळी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाद्वारे प्रदान करण्यात आलेली पदवी प्रमाणपत्रे मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.

### माणगावात आरोग्य दिन उत्साहात

**माणगाव :** आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करत 'निरोगी जीवन हीच खरी संपत्ती' हा संदेश देणारा जागतिक आरोग्य दिन ग.द. तटकरे नर्सिंग महाविद्यालयात उत्साहपूर्ण साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत हा दिवस केवळ औपचारिकतेपुरता न ठेवता समाजोपयोगी उपक्रमांद्वारे साजरा केला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांनी भूषविले होते. प्रा. मेहरोश सनगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. जागतिक आरोग्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष आरोग्य तपासणी उपक्रम राबवत तापमान, नाडी, रक्तदाब व रक्तातील साखर यांसारख्या महत्त्वाच्या चाचण्या केल्या. या उपक्रमामुळे सहभागी व्यक्तींना स्वतःच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली आणि आपण किती तंदुरुस्त आहोत याचा अंदाज घेण्याची संधी मिळाली. या आरोग्य तपासणी शिबिरात ॲड. राजीव साबळे यांनी स्वतः सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले. तसेच नर्सिंग कॉलेज, विधी महाविद्यालय व द. ग. तटकरे महाविद्यालयातील कर्मचारी यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी सुमारे १०० जणांची आरोग्य तपासणी करून विद्यार्थ्यांनी समाजसेवेचा आदर्शही घालून दिला. या कार्यक्रमात प्रत्येक सहभागीने उत्स्फूर्त प्रतिसाद देत आरोग्याबाबत सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमामुळे 'आरोग्य हीच खरी संपत्ती' हा संदेश प्रभावीपणे पोहोचला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यापकवर्ग व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.



# आयुक्तांच्या बंगल्यासमोरच नियमांची पायमल्ली

## पादचाऱ्यांच्या हक्कावर महापालिकेचा लॉन वरवंटा

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

**कायदा सर्वांसाठी समान असतो, हे लोकशाहीचे ब्रीदवाक्य नवी मुंबई महापालिका प्रशासनाच्या बाबतीत मात्र फोल ठरताना दिसत आहे. सर्वसामान्यांच्या अतिक्रमणांवर तातडीने हातोडा फिरवणारी महापालिका, स्वतःच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांच्या बाबतीत मात्र नियमांना हरताळ फासत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.**



नेरूळ येथील नवी मुंबई महापालिका आयुक्तांच्या शासकीय निवासस्थानासमोर चक्क पदपथावरच गार्डन तयार करण्यात आले आहे. त्यामुळे पदपथावरील अतिक्रमणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नवी मुंबईतील सर्व पदपथे पादचाऱ्यांसाठी अडथळामुक्त करण्यासाठीचे अभियान प्रशासनाने सुरु केले असल्याने आयुक्त निवासस्थानासमोरील पदपथ गार्डनवर कारवाई होणार की 'नियमाला अपवाद' या संकल्पनेतून अभय मिळणार, हा प्रश्न जनतेकडून विचारला जात आहे.

मुद्दा केवळ एका गार्डनचा नसून त्यातून ध्वनित होणाऱ्या प्रशासकीय मानसिकतेचा आहे. आयुक्त किंवा उच्च पदस्थ अधिकारी झाले की आपण सर्व नियमांपासून मुक्त आहोत, अशी एक भ्रामक संकल्पना प्रशासनात रुजू पाहत आहे. पदपथ मोठे असल्याने तूर्त पदपथावरील या अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांना अडथळा होत नसला तरी आपण 'नियमांच्या पलीकडे' या लोकप्रतिनिधी व प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मानसिकतेचा अडथळा नवी मुंबईतील पदपथ अडथळामुक्त करण्याच्या उद्दिष्टपूर्तीत अडथळा ठरू शकतो. केवळ आयुक्तांचे निवासस्थानच नव्हे, तर बेलापूर सेक्टर १५ मधील अनेक शासकीय कार्यालयांनीही आपल्या इमारतीसमोरील सार्वजनिक पदपथांवर रेलिंग लावून आणि लॉन तयार करून ते रस्ते बंदिस्त केले आहेत. तसेच, शहराचे नियोजन करणाऱ्या संस्थांच्या कार्यालयासमोरच या नियोजनाचा फज्जा उडालेला पाहायला मिळत आहे. यापूर्वी अनेकदा तक्रारी करूनही महापालिकेने यावर कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे 'बड्या' संस्था आणि अधिकाऱ्यांपुढे प्रशासन झुकल्याचे स्पष्ट होत आहे, असे नवी मुंबई सजग नागरिक मंचाकडून बोलले जात आहे.

> "पदपथ हे पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी असतात, शासकीय निवासस्थानांच्या किंवा संस्थांच्या शोभेसाठी नव्हे. आयुक्त निवासस्थानासमोरच जर नियमांची पायमल्ली होत असेल, तर सामान्य नागरिकांकडून शिस्तीची अपेक्षा करणे चुकीचे आहे. प्रशासनाने ही अतिक्रमणे हटवून आदर्श घालून द्यावा. आता महापालिकेचा अतिक्रमण विभाग आपल्या सर्वोच्च अधिकाऱ्याच्या निवासस्थानासमोर असलेल्या या अनधिकृत गार्डनवर कारवाई करण्याचे धाडस दाखवणार का, याकडे संपूर्ण नवी मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.
>
> – सुधीर दाणी, सजग नागरिक मंच, नवी मुंबई"

# खो-गो ठरला 'मोस्ट पॉप्युलर ब्रँड'

| अलिबाग | प्रतिनिधी |







अर्थसंकेत प्रस्तुत महाराष्ट्राचा लोकप्रिय ब्रँड २०२६ हा प्रतिष्ठित बिझनेस सन्मान सोहळा नुकताच मुंबई येथे पार पडला. २०१७ पासून सुरू झालेल्या या उपक्रमामागील उद्दिष्ट म्हणजे मराठी उद्योजकांना ब्रँडिंगचे महत्त्व समजावणे आणि त्यांच्या ब्रँड्सना जागतिक स्तरावर नेण्यास प्रोत्साहन देणे हा आहे. यावेळी खो-गो या ब्रँडची मोस्ट पॉप्युलर ब्रँड म्हणून निवड करण्यात आली. सार्वजनिक मतदान प्रक्रियेतून लोकांनी दिलेल्या पसंतीनुसार हा सन्मान जाहीर करण्यात आला.

या भव्य कार्यक्रमात पोस्टकार्ड मॅन ऑफ इंडिया प्रदीप लोखंडे आणि अर्थसंकेतचे संस्थापक डॉ. अमित बागवे यांच्या हस्ते खो-गोचा गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. अमित बागवे यांनी, व्यवसायात कृत्रिम बुद्धिमत्तेचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. तसेच, मान्यवरांनी उद्योजकांना ब्रँड बिल्डिंग, आर्थिक शिस्त आणि जागतिक स्तरावर विस्तार याबाबत मार्गदर्शन केले. खो-गोला मिळालेला हा सन्मान त्यांच्या ग्राहकांमधील विश्वास आणि लोकप्रियतेचा ठसा उमटवणारा ठरला आहे.

१९६१ मध्ये कै. मुरलीधर रेडकर यांनी मुंबईतील गिरगावमधून खो-गो गोळ्यांचा प्रवास सुरू केला. अतिशय स्वस्त आणि प्रभावी आयुर्वेदिक औषध म्हणून या गोळ्या अल्पावधीतच लोकप्रिय झाल्या. खो-गोला घराघरात पोचवण्यात कंपनीचे संचालक हेमंत रेडकर यांचीच कार्यकुशलता व मेहनत आहे. तसेच, खो-गोच्या प्रसिद्धीमध्ये वर्तमानपत्रांतील कल्पक कार्टून जाहिराती आणि एसटी बसवरील जाहिरातींचा मोठा वाटा होता. त्यामुळे हा ब्रँड महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील घराघरांत पोहोचला. साधी वेष्टने आणि गुणकारी परिणाम यामुळे खो-गो आजही खोकल्यावरील एक भरवशाचे नाव मानले जाते. या कंपनीने पिढ्यानपिढ्या आपली गुणवत्ता जपली असून आयुर्वेदिक परंपरेचा हा वारसा आजही दिमाखात सुरू आहे.

# जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जनऔषध वैद्यकशास्त्र विभागाच्यावतीने मंगळवारी (दि.७) जागतिक आरोग्य दिनानिमित्त जीएमसी कॅम्पसमध्ये विशेष कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील या अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. जन औषधवैद्यक शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. हराळकर, डॉ.नकाते, डॉ. बंटेवाड, डॉ. क्षीरसागर व डॉ.नाझिया हे देखील उपस्थित होते. यावर्षी जागतिक आरोग्य संघटनेची थीम 'आरोग्यासाठी एकत्र या, विज्ञानाला साथ द्या' अशी ठेवण्यात आली असून आरोग्याबाबत जानजागृती करण्यावर भर देण्यात आला होता. या निमित्ताने विविध स्पर्धा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये पोस्टर रचना स्पर्धा, रिल्स तयार करण्याची स्पर्धा, क्विझ स्पर्धा तसेच तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यान यांचा समावेश होता. या कार्यक्रमाचा उद्देश आरोग्य व हक्काविषयी जनजागृती करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे आणि विद्यार्थ्यांमध्ये सार्वजनिक आरोग्य विषयीची जाणीव निर्माण करणे हा होता. या कार्यक्रमात विद्यार्थी व आरोग्य कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. 'आरोग्यासाठी एकत्र या, विज्ञानाला साथ द्या' हा संदेश देत आरोग्याबाबत जागरूक समाज घडविण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.महादेव घोरपडे यांनी, तर आभार प्रदर्शन डॉ. संदीप माळी यांनी केले.



## पनवेलमधील आदिवासी पाड्याची पाहणी

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल तालुक्यातील कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीच्या परिसरालगत असलेल्या आदिवासी पाड्यावर राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी स्थानिक आदिवासी बांधवांशी संवाद साधत त्यांच्या विविध समस्या जाणून घेतल्या. यादरम्यान पाड्यातील पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, वीज, आरोग्य व शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधांबाबत ग्रामस्थांनी आपली व्यथा मांडली. मंत्री उईके यांनी या सर्व समस्या गांभीर्याने ऐकून घेत तात्काळ संबंधित प्रशासनाला आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, आदिवासी बांधवांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा यासाठी विशेष लक्ष देण्याचे निर्देशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. लवकरात लवकर कामे पूर्ण करून पाड्यातील नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

## तपासणी मोहीमेतील कामगिरीची माहिती

| अलिबाग | प्रतिनिधी |

पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने मोटार वाहन कर व दंड वसुली मोहिमेअंतर्गत चालू वर्षात करण्यात आलेल्या कामगिरीची माहिती जाहीर केली आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल यांच्यामार्फत रस्ते सुरक्षेसाठी तसेच वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व्हावे यासाठी सातत्याने विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या दरम्यान चालू वर्षाच्या कालावधीत एकूण ८५ हजार ०१४ वाहनांची तपासणी केली असून त्यापैकी २२ हजार ५६७ दोषी वाहनांवर विविध गुन्ह्यांकरिता कारवाई करण्यात आली आहे. या कारवाई दरम्यान या कार्यालयाकडून एकूण १,९०८.३७ लाख इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

## सोनू निगमकडून भात केंद्राचे कौतुक

| नेरळ | प्रतिनिधी |

कोकण कृषी विद्यापीठाच्या कर्जत भात संशोधन केंद्रात भाताचे विविध वाण यांची संशोधन केले जाते. या सर्व भात वाणांची माहिती घेण्यासाठी आघाडीचे संगीतकार पद्मश्री सोनू निगम यांनी भेट दिली. यावेळी सोनू निगम यांनी भात संशोधन केंद्रातील विविध प्रकल्पांची पाहणी करत त्याचे कौतुक देखील केले.



देशातील आघाडीचे कोकण कृषी विद्यापीठ यांची किर्ती लक्षात घेऊन पद्मश्री सोनू निगम हे येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राला भेट देऊन शेतीचे तंत्र आणि मंत्र जाणून घेण्यासाठी भात संशोधन केंद्रात पोहचले. कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी त्यांना डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने विकसित आणि शिफारशीत केलेल्या भाताच्या विविध सुधारित व संकरित जातींची गुणवैशिष्ट्ये यांची माहिती दिली. तसेच विविध फळपिके, मसाला पिके, कृषी यंत्रे आणि सुधारित अवजारांची इत्यंभूत माहिती दिली. शेतकऱ्यांचे भात शेतीतील कष्ट कमी करणारे सुधारित ड्रम सिडर आणि मनुष्य चलित लावणी यंत्र यांची वापरण्याची पद्धत ऐकून सोनू निगम हरखून गेले. विशेष म्हणजे किफायतशीर शेतीचे तंत्र आणि मंत्र जाणून घेण्यात कुटुंबीयांनी खूप रस दाखविला. भात संशोधन केंद्राच्यावतीने सोनू निगम यांना काळीमिरीची कलमे भेट दिली. यावेळी जि.प. सदस्य बाबू घारे, सामाजिक कार्यकर्ते सोनू जगताप आणि मंदार म्हसे उपस्थित होते.

## माणगावातील दत्त मंदिराचा जत्रौत्सव

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री दत्त मंदिराचा जत्रोत्सव कार्यक्रम शनिवारी (दि.११) मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या जत्रौत्सवात यात्रेकरूंनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्सवाचा मनमुराद आनंद घ्यावा, असे आवाहन जत्रौत्सव कमिटीने केले आहे.



माणगाव येथील श्री दत्त मंदिर जत्रोत्सवाकडे संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागून असते. तालुक्यातील आसपासच्या २०० ते २५० गाव, वाडी वस्त्यांतील नागरिक या जत्रेचा आनंद घेण्यासाठी येत असतात. माणगावात मुंबई-गोवा महामार्ग, मोर्बारोड मार्ग व कचेरी रोड-निजामपूर या रस्त्यांच्या दुतर्फा विविध प्रकारची दुकाने थाटून ही जत्रा सजलेली असते. या जत्रेत माणगावची ग्रामदैवत वाकडाई देवी मंदिराची पालखी येत असते. तसेच, कोस्ते आदिवासीवाडी, पानोसे, खांदाड, उतेखोल इत्यादी गावांतून जत्तर काठ्या येत असतात. दरवर्षी हजारोंच्या संख्येने नागरिक या जत्रौत्सवाचा आनंद घेत असतात. या यात्रेत एका रात्रीत लाखो रुपयांची उलाढाल होत असते.

या जत्रौत्सवाबाबत माणगाव येथील प्रतीथयश विधिज्ञ ॲड. केदार गांधी यांच्या निवासस्थानी रविवारी (दि.५) बैठक पार पडली. यावेळी जत्रौत्सव कमिटीचे माणगाव नगरीचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, ॲड. केदार गांधी, अमोल मोने, तेजस गांधी, काशीराम पोवार, गोविंद पोवार, नथुराम पोवार, महेंद्र मेथा, नामदेव खराडे, सचिन देसाई, सुधाकर पालकर व संतोष मांजरे आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी कविता पाटील

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील नवघर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी काँग्रेसच्या कविता संतोष यांची बहुमताने निवड झाली. भाजपच्या प्राची पाटील विरुद्ध महाविकास आघाडीच्या कविता पाटील यांच्यात थेट लढत झाली. त्यात काँग्रेसच्या कविता पाटील या दणदणीत मतांनी विजयी झाल्या. यावेळी सरपंच सविता मढवी आणि ग्रामपंचायतीचे सदस्य उपस्थित होते. यावेळी काँग्रेसच्या रायगड जिल्हा महिला अध्यक्षा रेखा घरत, उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, संतोष पाटील, उरण शिवसेना तालुका प्रमुख बी. एन. डाकी, अविनाश म्हात्रे, विश्वास तांडेल, रवी पाटील, महादेव बंडा, मुरलीधर ठाकूर, नितीन मढवी, आणि महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते. नवघर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी कविता पाटील यांची निवड झाल्याने त्यांच्यावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### गॅसच्या टंचाईमुळे चुल पेटविण्याची वेळ | तरीदेखील ग्राहकांची पूर्वीसारखी गर्दी

# कळंबच्या बटाटावड्याला चुलीवरची चव

| नेरळ | प्रतिनिधी |

आखाती देशातील युद्धामुळे इंधन उपलब्ध होण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे कर्जत तालुक्यातील कळंब येथील प्रसिद्ध असलेला बटाटावडा ग्राहकांची मागणी लक्षात घेऊन आता चुलीवर तळला जात आहे. तरीदेखील या बटाटा वड्यांची चव चाखण्यासाठी ग्राहक पूर्वीसारखी गर्दी करून असतात.



कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्गावर कळंब हे गाव आहे. याठिकाणी आदिवासी भागातील लोकांची लहानशी बाजारपेठ आहे. या ठिकाणी बोरगाव फाटा येथील गुरुनाथ कोंडिलकर यांचा श्री समर्थ कृपा हे चहा नाश्त्याचे दुकान आहे. या दुकानात कळंब भागातील चवदार बटाटा वडा मिळतो. या वड्याची चव घेण्यासाठी असंख्य ग्राहक येत असतात; परंतु, सध्याच्या आखाती देशातील युद्धजन्य स्थितीमुळे इंधन उपलब्ध होण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे व्यावसायिक गॅस सिलिंडर विक्रीसाठी उपलब्ध होत नसल्याने अनेकांना आपले हॉटेल बंद करावे लागले आहे. त्याचवेळी काही हॉटेलवाल्यांना आता चुलीवर अन्न शिजवण्याची वेळ आली आहे. अशीच वेळ कळंब येथील बोरगाव फाटा येथील प्रसिद्ध असलेल्या बटाटावडा बनवणाऱ्या मालकावर आली आहे. त्यांनी आपल्या हॉटेलात चक्क चूल पेटवली आहे. त्या ठिकाणी विटा मांडून त्यावर चूल पेटवण्याचे काम करीत बटाटे वडे तळण्याचे काम कोंडिलकर हे करीत आहेत.

याबद्दल गुरूनाथ कोंडीलकर यांनी कृषीवलच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, आमच्याकडे बटाटावडा खाण्यासाठी येणाऱ्यांची संख्या खुप जास्त आहे. सध्या गॅस सिलिंडरच्या टंचाईमुळे हॉटेल बंद करण्याची वेळ आमच्यावर आली होती. मात्र, आमच्या ग्राहकांनी कशाही प्रकारे वडे बनवून द्या, असे सांगितले. त्यामुळे चुल पेटविण्याची वेळ आमच्यावर आली. दुसरीकडे चुलीचा ज्वाळ जास्त झाल्याने कढई तापल्याने त्यातील तेल अतिशय गरम होते. त्यामुळे काहीवेळा बटाटावडा जास्त लाल बनतो. तर, कधी चुलीमधील लाकडांचा धूर देखील होत असतो. तरीदेखील ग्राहक खुश असतात. त्यामुळे आम्ही चुलीवर बटाटावडा तळण्याचे काम करीत आहोत. गॅस सिलिंडर मिळण्यास अडचणी येत असल्यातरी बटाटावडा आम्ही आनंदाने बनवतो आणि ग्राहक देखील नेहमीप्रमाणे गर्दी करून असतात, असेही गुरूनाथ कोंडीलकर यांनी सांगितले.




## राशीभविष्य

- **मेष** : कौटुंबिक समस्या संभवतात. नव्या ओळखी पारखून घ्या. अर्थिक आवक साधारण राहील.
- **वृषभ** : दैनंदिन कार्याबाबत उत्साह राहील. जुनी येणी सहज वसूल होतील. प्रवास लाभदायक ठरेल.
- **मिथुन** : कामाचा ताण अधिक राहील. मित्र-मैत्रिणींच्या भेटी होतील. विवाहेच्छुकांना समाधान लाभेल.
- **कर्क** : कौटुंबिक मतभेद चिंता निर्माण करतील. बोलण्यातून गैरसमज संभवतात. विचारानं रहायला हवं.
- **सिंह** : महत्त्वाची कामं मार्गी लागतील. आर्थिक बाबतीत तडजोड करावी लागेल. बाकी चिंता नसावी.
- **कन्या** : अनपेक्षित घटना दिलासा देतील. नव्या ओळखीतून फायदा होईल. छोटा-मोठा प्रवास घडेल.
- **तूळ** : अपेक्षित वार्ता कानी येईल. व्यवसायात अनुकूलता राहील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखायला हवी.
- **वृश्चिक** : कलाकारांचा उत्साह वाढेल. प्रगतीच्या नव्या संधी लाभतील. विद्यार्थ्यांच्या गुणांचा विकास होईल.
- **धनु** : आर्थिक व्यवहार लांबणीवर पडतील. प्रवासात पुरेशी काळजी घ्यावी. खर्चाचं प्रमाण वाढतं राहील.
- **मकर** : मानसिक अस्वास्थ्य राहील. अनावश्यक गोष्टीत वेळ जाईल. व्यापारात साधारण लाभ होईल.
- **कुंभ** : भावंडांचं सौख्य लाभेल. खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. धार्मिक स्थळांची यात्रा घडेल.
- **मीन** : भागीदारी व्यवसायात अनुकूलता राहील. विवाहाचे प्रश्न मार्गी लागतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.

## स्टाईल स्टेटमेंट
### उन्हाळ्यात साडी नेसायची तर...

उन्हाळ्यात साडी नेसायची म्हटली की खूप वैताग येतो. मात्र निवड योग्य असेल तर उन्हाळ्यात साडीही सुसह्य ठरू शकते. लग्न समारंभाच्या निमित्ताने साडी नेसताना नेमकं काय करता येईल याविषयी...

✻ आपल्या त्वचेला साजेशा रंगाची साडी नेसा. लिनन, कॉटन, सिल्कच्या साड्या उन्हाळ्यात चालतात. सिल्क शरीराच्या तापमानाशी जुळवून घेत असल्याने या साड्या नेसल्यावर त्रास होत नाही.

✻ साडीवर गरजेपुरतेच दागिने घाला. हातात दोन बांगड्या, नाजूक नेकलेस आणि छोटे कानातले एवढे मोजके दागिने घातले तर साडीतही तुम्ही सहज वावरू शकाल.

✻ उन्हाळ्यात केस मोकळे सोडणं वैतागवाणं ठरतं. हेअरस्टाईल करायचीच असेल तर ती अगदी साधी, सोपी असावी. पोनीटेलमध्ये तुम्हाला बरं वाटेल. एथनिक लूकसाठी छानशा गजरा माळा किंवा फूल घाला.

## दिनविशेष
### १० एप्रिल

- **२०१५** : भारत फ्रान्सकडून ३६ 'राफेल' घेणार असल्याची माहिती.
- **२०१६** : केरळमधील पराबूर पुट्टींगल देवी मंदिरातल्या भीषण आगीत १०६ भाविकांचा मृत्यू.
- **२०१७** : कुलभूषण जाधव यांना पाकिस्तानमधील लष्करी न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली.
- **२०१८** : राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या प्रमुखपदी एअर मार्शल आय.पी. विपिन यांची नियुक्ती करण्यात आली.

## सफर देशांची
### जागृत ज्वालामुखींचा देश

कॉमॉरॉस हा हिंदी महासागरात वसलेला छोटासा देश. आफ्रिका खंडाच्या पूर्व किनारपट्टीजवळ असलेल्या या देशात जागृत ज्वालामुखी आहेत. कॉमॉरियन, फ्रेंच आणि अरबी अशा तीन भाषा या देशात बोलल्या जातात. कॉमॉरॉस ही एकेकाळी फ्रान्सची वसाहत होती. ६ जुलै १९७५ या दिवशी हा देश स्वतंत्र झाला. इथलं वातावरण उष्ण असतं. नोव्हेंबरपासून साधारण मे महिन्यापर्यंत इथे पावसाळा असतो. मार्च हा कॉमॉरॉसमधला उष्ण महिना. मॉरॉनी ही कॉमॉरॉसची राजधानी. हेच इथलं सर्वात मोठं शहर असून ते ग्रँडे कॉमोर नावाच्या बेटावर वसलं आहे. 'ला कारथाला' हे इथलं सर्वात उंच शिखर असून इथे जागृत ज्वालामुखी आहे. व्हायलँगचं इथे सर्वाधिक उत्पादन होतं. सुगंधी तेलांच्या निर्मिती त्याचा वापर केला जातो. व्हॅनिलाचं उत्पादन कॉमॉरॉसमध्ये मोठ्या प्रमाणावर घेतलं जातं. नारळ, लवंग, केळी अशी पिकंही इथे होतात. सुगंधी फुलांची शेतीही इथे होते. या फुलांचा अर्क परफ्युम्सध्ये वापरला जातो. कॉमॉरॉस हा गरीब देश असला तरी तो निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. इथले समुद्रकिनारे खूप सुंदर आहेत. घनदाट जंगलंही देशात आहे.

## पंचांग

**शुक्रवार, १० एप्रिल २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८
चैत्र कृ. ८, चंद्रराशी : धनु,
नक्षत्र : पूर्वाषाढा, योग : शिव,
सूर्योदय ६.२८, सूर्यास्त ६.५३

## फॉरवर्ड्स

हम चाय पी कर कुल्हड़ नहीं तोड़ पाते...

दिल तो ख़ैर बहुत दूर क़ी बात हैं...!

## आरोग्यमंत्र
### जास्त खाणं झाल्यास...

सुट्टीच्या या काहिशा निवांत काळात कळत-नकळत जंक फूड खाल्लं जातं. पण यामुळे पोट बिघडणं, गॅस, ॲसिडिटीसारख्या समस्या निर्माण होतात. कॅलरीही वाढतात. अतिखाण्याचे परिणाम दिसून येतात. पण काही प्रमाणात हा परिणाम कमी करणं शक्य आहे. पोटभर खाल्ल्यानंतर पोटाला आराम देण्यासाठी, शरीरातली विषारी द्रव्यं बाहेर टाकण्यासाठी आहारात काही पदार्थांचा समावेश करता येईल.



✻ जास्त खाणं झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी भरपूर पाणी प्या. शरीरातले विषारी घटक बाहेर टाकण्याचा हा सर्वात सोपा आणि साधा मार्ग आहे. ✻ ग्रीन टीमुळे शरीरातले विषारी घटक बाहेर निघून जातात. अतिखाणं होत असेल तर सकाळी ग्रीन टी प्या. ग्रीन टी अँटी ऑक्सिडंट्सने युक्त आहे. तसंच यामुळे रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात राहण्यास मदत होते. भूकही कमी लागते. ✻ भरपूर खाणं होणार असेल तर लो फॅट योगर्ट आणि त्याबरोबर चेरी, स्ट्रॉबेरीसारखी फळं खा. काळी द्राक्ष, जांभळं, आलूबुखार यांच्यासह हंगामी फळं खा. योगर्टमधील चांगले बॅक्टेरिया अन्नपचनाची क्रिया सुधारतात.जळजळही कमी होते. ✻ मद्यपान केलं असेल तर दुसऱ्या दिवळी नारळपाणी प्या. नारळपाण्यात अँटिऑक्सिडंट्स असतात. तसंच पोटॅशियमसारखे घटक असतात. यामुळे मद्याचा प्रभाव कमी होण्यास मदत होते. डोकं स्थिरावतं.

## भटकंती

कॉलेजच्या परीक्षा संपल्यावर बाईकवरून फिरायची संधी असते. भरपूर वेळ असल्याने निसर्गाचा आस्वाद घेत, वळणावळणाच्या रस्त्यावरून अगदी आरामात जाता येतं. बाईकवरून जायचं तर हटके ठिकाणं हवी. दुतर्फा झाडी असलेल्या रस्त्यावरून जाण्याची मजा वेगळीच. यासाठी फार लांब जायची गरज नाही. आपल्या महाराष्ट्रात अत्यंत सुंदर आणि रमणीय ठिकाणं आहेत. अशाच सुंदर ठिकाणापैकी एक म्हणजे ताम्हिणी घाट. हा घाट पुण्याला कोकणाशी जोडतो. या घाटातून जाण्याची खरी मजा पावसाळ्यातच येते. मात्र उन्हाळ्यातही तुम्ही या भागाची सैर करू शकता. **(क्रमश:)**

## करिअरवाटा
### अंगी सेवाभाव असल्यास...

वैद्यकीय क्षेत्रात औषधोपचाराबरोबरच रुग्णाला मिळणाऱ्या वागणुकीवर लक्ष ठेवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे ही शाखा युवावर्गासाठी आकर्षणाचा केंद्र ठरते. समाजाचं आकलन करून घेणं आणि रुग्णांना मदत करणं हा या शास्त्राचा हेतू आहे. वैद्यकीय उपचार करणारं क्षेत्र आणि समाज यांच्यामधला दुवा म्हणून ही मंडळी काम करतात. देशातील अनेक स्वयंसेवी संघटना वैद्यकीय क्षेत्रात काम करतात. त्यांना आवश्यक ती माहिती देण्याचं कामही या मेडिकल सोशल वर्करकडून पार पाडलं जातं. हा अभ्यासक्रम पदवी आणि पदव्युत्तर अशा दोन्ही प्रकारात उपलब्ध आहे. काही पदवीधर तरुण-तरुणींना मानवतेच्या भूमिकेतून वैद्यकीय सेवा करायची असते. परंतु अनेक कारणांनी त्यांना डॉक्टर होता येत नाही. अशा ध्येयवादी तरुण-तरुणींना समाजसेवेचा ध्यास मेडिकल सोशल वर्कर होऊन पूर्ण करता येतो. विशेषत: विज्ञान शाखेची पदवी मिळवल्यानंतर या अभ्यासक्रमाकडे वळता येतं. शास्त्र शाखेतील इतर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाइतकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी स्पर्धा दिसून येत नाही.



## खेचाखेची
### डिलिव्हरी झाली!

सर्वांना कळविण्यास आनंद होत आहे, की आज सकाळी ठीक १० वाजून ४५ मिनीटांनी सुखरूप डिलिव्हरी झाली आणि आमच्या सर्वांच्या डोक्यावरचे टेन्शन एकदम कमी झाले.

सोमवारी नाव नोंदवले होते, आता कधी डिलिव्हरी होईल आणि काही त्रास होईल का, असे वाटत होते पण देवाला काळजी.

आज सकाळी गॅस सिलिंडर घरपोच आला.

## वेगळं काही

पुण्यातल्या बाणेर परिसरातली तुकाई टेकडी मध्यंतरी डंपिंग ग्राउंड झाली होती. पण आज ही टेकडी हिरवीगार दिसते. २००६ मध्ये इथल्या काही नागरिकांनी टेकडीची स्वच्छता मोहीम हाती घेतली. 'वसुंधरा अभियान' या नावाने मोहीम सुरु करण्यात आली. इथे तब्बल २१ हजार झाडे लावण्यात आली. विशेष म्हणजे या गटाचा कोणीही प्रमुख नाही. सर्व जण स्वयंस्फूर्तीने एकत्र आले आहेत. हे सर्व लोक मानवी साखळी तयार करून टेकडी आणि इथल्या झाडांची देखभाल करतात. टेकडीवरून पावसाचं पाणी वाहून जाऊ नये म्हणून ती सपाट करण्यात आली. परिसर स्वच्छ राहावा, इथली हिरवळ टिकून राहावी यासाठी अनेक जण सकाळ-संध्याकाळ श्रमदान करतात.

## महिलायन
### साडीत लपवा जाडी



प्रावरणांचे अनेक प्रकार असले तरी साडीची जागा कोणीही घेऊ शकलेलं नाही. साडी ही भारतीय महिलांच्या मर्मबंधातली ठेव आहे. पण साडीमध्ये लठ्ठपणा उठून दिसतो, अशी अनेकींची तक्रार असते. मात्र बहुतांश फॅशन डिझायनर्स हा दावा खोडून काढतात. काही सोप्या ट्रिक्सचा अवलंब केल्यास साडीमध्येही स्लीम दिसणं सोपं होतं.

✻ साडीचं फॅब्रिक कसं आहे यावर बांधा कसा दिसेल हे ठरतं. टस्सर, रॉ सिल्कसारखं फॅब्रिक हेवी लूक देतं तर जॉर्जेट, शिफॉन, क्रेप यासारखं हलकं फॅब्रिक स्लिम लूक देतं. ✻ जाडी लपवायची तर साडी निवडताना काळजी घ्यावी. रुंद काठ असणाऱ्या साडीमध्ये बांधा बेढौल दिसू शकतो. याउलट अरुंद काठाची साडी स्लिम लूक देण्यास मदत करते. ✻ हात जाड असतील तर साडी नेसल्यावर हेवी लूक मिळतो. म्हणूनच फुगीर हात असणाऱ्या महिलांनी शक्यतो स्लीव्हलेस किंवा आखूड बाह्याचे ब्लाऊज घालणं टाळावं. त्याऐवजी लांब किंवा ३/४ स्लीव्हजचे ब्लाऊज घालावेत. ✻ ब्लॅक, ब्राऊन,ब्लू यासारखे गडद रंगही स्लीम आणि ट्रीम दिसायला मदत करतात.

## सुडोकू ८९


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३ | ७ | ९ | | ८ | | १ | |
| ५ | | ८ | | | | | ९ | ३ |
| २ | | | १ | | ३ | | | |
| | | ४ | ५ | ९ | | | | |
| | ७ | २ | | | | ३ | ५ | |
| | | | | ३ | २ | ६ | | |
| | | | ३ | | ६ | | | ७ |
| ४ | ८ | | | | | २ | | ५ |
| | ९ | | ४ | | ५ | ८ | ६ | |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ८८चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ७ | २ | ४ | १ | ८ | ६ | ९ | ५ |
| ५ | ९ | ८ | ७ | ३ | ६ | २ | ४ | १ |
| ६ | १ | ४ | २ | ९ | ५ | ७ | ३ | ८ |
| १ | ६ | ९ | ३ | ५ | ४ | ८ | २ | ७ |
| २ | ३ | ५ | ६ | ८ | ७ | ४ | १ | ९ |
| ८ | ४ | ७ | ९ | २ | १ | ५ | ६ | ३ |
| ४ | २ | ३ | ५ | ७ | ९ | १ | ८ | ६ |
| ९ | ५ | १ | ८ | ६ | २ | ३ | ७ | ४ |
| ७ | ८ | ६ | १ | ४ | ३ | ९ | ५ | २ |

## शब्दकोडे क्रमांक ८९




**आडवे शब्द :-**
१) चकाकी, तकतकी
४) उथळ आकार
७) खण
८) वाललेला
१०) जंगलातील रहिवासी
१२) व्याप, पसरलेल्या वस्तू
१४)द्यावयाची रक्कम वजा घालून केलेला हिशोब
१६) धर्मार्थ देणे
१७) घाईघाईने, त्वरेने
१९) पोहणे
२१) च्या बरोबर
२२)मवाळ मताचा
२४) वाळवंट
२५) छोटे कुबड
२६)आटोपणे,व्यवस्था लावणे
२७) उत्तम सोने
३४) नष्ट, नासाडी
३०) बसण्याची फळी
३१) बाई
३२) मुद्दलाच्या रकमेवर सावकाराला दिली जाणारी रक्कम
३३) सूर्याचे एक नाव
३४) गुणाकार
३७) एक प्रस्नार्थक शब्द
३८) सामाजिक सारखेपणा, उच्च नीच नसणे
३९) व्याजाने पैसे देण्याचा व्यवसाय
४१) येशू ख्रिस्त
४२) व्यय
४३) मोटार (इं.)
४४) श्रीमंत, सावकार
४६) वजनदार
४८) भिंतीवर सरपटणारा प्राणी
४९) सडलेला
५१) वितरण
५३) मुलगा (सं.)
५५) बारीक झणझण
५७) टिकून राहणे
५८) तल्लीन, एकरूप, रममाण
५९) जिवलग मित्र
६०) मृत्तिकापात्र,उथळ वाटी
६२) रात्रभर
६४) चांदणी
६७) व्रत
६९) झटकन
७२) मळलेला
७३) फुलातील पुंकेसर, माती
७४)गवंडी
७६) शेणपाण्याने जमीन गुलगुळीत करण्याची क्रिया
७८) पंख
८१) जमिनीवरून समुद्राकडे जाणाऱ्या वाऱ्याचे नाव
८२) प्रफुल्लित

**उभे शब्द:-**
१) चविष्ट
२) चिंतन
३) केव्हा (ग्रा.)
५)फुरसतीने
६) गाडीचे छत
७) भयंकर
८) सूज्ञ, जाणता
९) मक्केच्या मशिदीतील पवित्र दगड
११) सीतेला पळवून नेण्याचे कृत्य
१३) एक कोल्हापुरी दागिना
१४) एक कालवण
१५) कडक
१८) नेम साधणारा
२०) एक जंगली प्राणी
२१) सवय, राबता २३) च्या साठी
२५) उदर
२६ ) अजगर
२८) मवाळ होणे, मऊ होणे
२९) पाठ्यपुस्तकातील गीत.
३०)कसब,पटुत्व.
३१)अनेक प्रकार.
३४) पळून गेलेला
३५)भगर
३६)जमिनीवरी ल किल्ला
४०)वसन
४२) अवघड, कष्टप्रद
४३) कालू, शिंपला समुद्रातील एक प्राणी
४५) नविन आलेला, नवप्रवेशित
४७) चरण
४८) दूर गेलेला
४९) फुरसत
५०)चुलता
५२) उथळ आकार
५४) नको असता
५६) कणीदार पीठ
५७) घाईघाईने चरफडत (जाणे)
५९) प्रभात
६१) गावठी, गावात तयार झालेले, अस्सल
६३) सर्प
६५) रमविणारा, पती
६६) झटपट, लवकर
६८) लाकडाचे एक उत्कृष्ठ जात
७०) खाटीक
७१) पुरुष
७५) बस्तान
७७) जंगली, रानटी
७९) दही घुसळण्याचे साधन

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



विनायक दळवी

# आयपीएल आणि नागरी जबाबदारीची जाणीव

आयपीएल स्पर्धा प्रत्येक जण वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहतो. काहींसाठी ही स्पर्धा म्हणजे पैसा कमावण्यासाठीच एक



माध्यम आहे. काहींना आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या निमित्ताने चांगलं क्रिकेट शिकता येतं, तर काहींना जगातील मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंची ड्रेसिंग रूम शेअर करता येते आणि त्यायोगे त्यांचा अनुभव किंवा त्यांच्याकडून मिळणाऱ्या काही टिप्स उपयोगात आणता येतात. काहींना मात्र ही आयपीएस स्पर्धा म्हणजे एक तमाशा वाटतो, एक सर्कस वाटते. काहींच्या मते अर्थार्जनासाठी जी मोठी संधी आहे. मात्र, या सर्व भिन्न हेतू आणि संधी लक्षात घेता, दोन दिवसांपूर्वीच एक चित्र मनात घर करून राहिले. ऑस्ट्रेलियाचा माजी सलामीचा फलंदाज मॅथ्यू हेडन, हा अहमदाबादच्या मोदी स्टेडियममध्ये सामना संपल्यानंतर डगआउटमध्ये पडलेल्या बाटल्या, कचरा प्लास्टिकच्या पिशवीमध्ये भरत असल्याचा हे चित्र पहायला मिळत होते. हे चित्र पाहिल्यानंतर त्याच्यासोबतच्या काही खेळाडूंनी दुर्लक्ष केले. काहींनी त्याची मनातल्या मनात खिल्ली उडवली असेल. कोणी त्याच्या साथीने कचरा गोळा करायला पुढे आले नाही हे ही सत्य आहे. दोन व्यक्तींमधील मानसिक मत भिन्नता स्पष्ट दिसत होती. क्रिकेट मैदानावरचा हे चित्र संपूर्ण देशात कुठे ना कुठे आपण पाहतोच. ज्यावेळी परदेशी नागरिक आपल्याला त्यांच्या कृतीतून काही शिकविण्याचा प्रयत्न करतात. त्यावेळी आपण चुकत असल्याची जाणीव होते.

'नागरिक शास्त्र' आपल्याला शाळेपासून ज्ञात असलेला विषय आहे. मात्र तो ऑप्शनला टाकणं किंवा काही प्रश्नांची उत्तरे देऊन पुढे जाणे एवढ्या पुरताच मर्यादित आहे. नागरी जबाबदारीची जाणीव सोयीनुसार असते. मागे एकदा वानखेडे स्टेडियमवर, वेस्टइंडीजहून विश्वचषक जिंकून आलेल्या भारतीय क्रिकेट संघाचा सत्कार करण्यात आला. त्या सत्कारानंतर संपूर्ण वानखेडे स्टेडियम आतील भाग आणि बाह्य भाग, यावर एवढा कचरा आणि घाण करण्यात आली होती, की त्याची साफसफाई करणाऱ्या कंत्राटदाराने त्यांच्या कर्मचाऱ्यांनी देखील नाराजी व्यक्त केली होती. चालक अनेक मैदानी किंवा अन्य जागांवरील बहुतांशी अशीच परिस्थिती असते.

गोविंद दादाने एक चेंडू निर्धाव किंवा 'डॉट' बॉल टाकला की एक झाड लावण्याची बीसीसीआयची कल्पना स्तुत्य आहे. मात्र, अशी किती झाडे आतापर्यंत कुठे आणि कधी लावली, याचा रेकॉर्ड उपलब्ध नाही. निर्धाव टाकण्यात आलेल्या चेंडू बाबत जर एवढी आत्मीयता आणि काळजी बीसीसीआयला वाटते, तर सर्व सहभागी खेळाडू आणि अन्य स्टाफ यांचा देखील साफसफाई बाबत 'वर्ग' घेणे गरजेचे आहे. स्टेडियममध्ये प्रवेश करताना प्रवेशद्वारावरच प्रेक्षकांच्या हातातील सर्व वस्तू, पाण्याच्या बाटल्या, नाणी काढून घेतली जातात. मग हा सर्व कचरा येतो कुठून? प्रेक्षकच फक्त कचरा करत नसतील, सहभागी खेळाडू देखील अशा कृतीत सामील असतील. तर बीसीसीआने या खेळाडूंचे वेळीच कान टोचले पाहिजेत. हेडन सारख्या खेळाडूला डग आऊटमधील घाण पाहून रहावले नाही. अन्य भारतीय खेळाडू, माजी खेळाडू, सपोर्ट स्टाफ यापैकी कुणालाही त्या गोष्टीचा वैशम्य वाटत नाही याचेच आश्चर्य वाटतं आणि दुःखही वाटतं.

आर्थिक सुबत्तेच्या बाबतीत क्रिकेट विश्वात एक आदर्शवत ठरणारी आयपीएल लीग, साफसफाई, शिस्त आणि नागरी जबाबदारीची जाणीव याबाबत देखील आदर्श ठरावी अशी तमाम क्रिकेट विश्वाची अपेक्षा आहे. या लीगशी जोडल्या गेलेल्या नामवंत माजी भारतीय खेळाडू तसेच क्रिकेट समालोचक, यांनी देखील याबाबतीत पुढाकार घेऊन खेळाडू आणि प्रेक्षक यांना सज्ञान करणे गरजेचे आहे.

कुणी षटकार किती मारले चौकार किती मारले, कोणाचा षटकार किती मीटर अंतरावर जाऊन पडला. या माहिती बरोबरच जर प्रत्येक आयोजक, संघटना, फ्रँचाईजी, असोसिएशन आणि स्टेडियम वरील व्यवस्थापन यांचा साफसफाई बाबतचा देखील अहवाल किंवा रेकॉर्ड प्रत्येक सामन्यानंतर जाहीर करावा. प्रत्येक सामन्यानंतर आघाडीचा गोलंदाज आणि आघाडीचा फलंदाज यांना जशा रंगीबेरंगी टोप्या देतात. तसाच बहुमान शिस्तबद्ध आयोजन करणाऱ्या, साफ स्वच्छ क्रिकेट स्टेडियम ठेवणाऱ्या व्यवस्थापनाचा, फ्रँचाईजींचा आणि संबंधितांचा करावा. नागरी जबाबदारीची जाणीव, कोणाला आणि किती आहे, हे देखील कळू द्याच.

# शेवटच्या चेंडूवर गुजरातचा विजय



## हृदयाचे ठोके वाढवणारा सामना

## राहुलची खेळी व्यर्थ

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

गुजरात टायटन्सने आयपीएल २०२६ मध्ये आपले खातं उघडले आहे. पहिले दोन सामने गमावल्यानंतर, त्यांनी तिसऱ्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सला एका धावेने पराभूत केले. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना गुजरात टायटन्सनं जॉस बटलर, कर्णधार शुभमन गिल आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्या अर्धशतकाच्या बळावर निर्धारित २० षटकांत ४ गडी गमावून २१० धावा केल्या. प्रत्युत्तरात, दिल्ली कॅपिटल्सला ७ गडी गमावून २०९ धावा करता आल्या.

### सामन्याचा निकाल

दिल्ली कॅपिटल्सला शेवटच्या दोन षटकांत ३६ धावांची गरज होती. मिलरने दोन षटकार आणि एक चौकार मारत २३ धावा काढल्या. शेवटच्या षटकात १३ धावांची गरज होती. कृष्णाच्या पहिल्या चेंडूवर चौकार मारल्यानंतर, विप्राज बाद झाला. कुलदीपने तिसऱ्या चेंडूवर एक धाव घेतली. चौथ्या चेंडूवर षटकार मारल्यानंतर मिलरला शेवटच्या दोन चेंडूंवर कोणतीही धाव घेता आली नाही, त्यामुळे संघाला अवघ्या एका धावेने पराभव पत्करावा लागला.

तत्पुर्वी दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलनं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर फलंदाजीला आलेल्या गुजरातला अवघ्या २.१ षटकांत साई सुदर्शन (१२) बाद झाल्याने पहिला फटका बसला. त्यानंतर कर्णधार शुभमन गिलनं जॉस बटलरसोबत दुसऱ्या विकेटसाठी ३२ चेंडूंमध्ये ६० धावांची भागीदारी केली. कुलदीप यादवनं बाद करण्यापूर्वी बटलरनं २७ चेंडूंमध्ये ५ षटकार आणि ३ चौकारांसह ५२ धावा केल्या. जॉस बटलर बाद झाल्यानंतर कर्णधार गिलनं वॉशिंग्टन सुंदरसोबत डावाची सूत्रं हाती घेतली. दिल्ली कॅपिटल्सकडून मुकेश कुमारने २ बळी घेतले, तर लुंगी एनगिडी आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

गुजरातने दिलेल्या २११ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सने सलामीवीर राहुल आणि पथुम निस्संका यांच्या माध्यमातून स्फोटक सुरुवात केली. त्यांनी संघाला पॉवरप्लेमध्येच ६३ धावांपर्यंत पोहोचवलं. २४ चेंडूंमध्ये ४१ धावा केल्यानंतर, निस्संका प्रसिद्ध कृष्णाच्या गोलंदाजीवर बाद झाला. राहुलने प्रसिद्ध कृष्णाच्या गोलंदाजीवर दोन चौकार आणि दोन षटकार मारत नवव्या षटकात २९ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. मात्र, रशीदने नितीश राणा आणि समीर रिझवी यांना सलग दोन चेंडूंवर बाद केले.

# समीरा हैबिटेट्स अलिबागची अंतिम फेरीत धडक



## टीआयपीएल पनवेलवर ७ गडी राखून मिळवला विजय

। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पुरुषांच्या खुल्या गटाची टी -२० प्रीमियर लिग क्रिकेट स्पर्धा पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर सुरू आहे. स्पर्धेतील पहिल्या पात्रता फेरीच्या सामन्यात, समीरा हैबिटेट्स अलिबाग जेट्सच्या संघाने दमदार कामगिरी करत अंतिम सामन्यासाठी धडक दिली आहे. काल झालेल्या पहिल्या पात्रता फेरीच्या सामन्यात समीरा हैबिटेट्स अलिबाग जेट्स संघाने टीआयपीएल पनवेल किंग्स संघावर ७ गडी राखून विजय मिळवला.नाणेफेकीचा कौल जिंकत अलिबागच्या संघाने प्रथम क्षेत्ररक्षण स्वीकारून भेदक गोलंदाजी करत पनवेलच्या संघाला १३ षटकात सर्व गडी बाद अवघ्या ५४ धावत गुंडाळले.

अलिबागच्या संघाकडून जलदगती गोलंदाज अभिषेक खातू, मिहीर भाटकर यांनी प्रत्येकी तीन, आर्यन खारकर दोन तर रितेश नलावडे व श्रीकांत मोलगी यांनी प्रत्येकी एका फलंदाजाला तंबूत धाडले. पनवेल संघाकडून निहांशू करण १७ व विशाल जितेकर यांनी १७ धावांचे योगदान संघाला दिले. प्रतिउत्तर देताना अलिबागच्या संघाने विजयासाठी हव्या असलेल्या ५५ धावा अवघ्या ७ व्या षटकांमध्ये तीन गडी गमावत पूर्ण केल्या त्यामध्ये श्रेयस कुमार यांनी सर्वाधिक नाबाद २१ तर कर्णधार ऋषिकेश राऊत यांनी १७ धावा संघासाठी काढल्या.पनवेल संघाकडू विशाल जितेकर यांनी दोन तर संकेत रानडे यांनी एक फलंदाज बाद केला. सामन्याचा सामनावीर म्हणून अभिषेक खातू याला गौरविण्यात आले असून सामना पाहण्यासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सहसचिव जयंत नाईक यांच्या क्रिकेटप्रेमींनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. स्पर्धेचा एलिमिनेटरचा सामना पेण बाप्पा विरुद्ध के.श्री वॉरियर्स या संघामध्ये होणार आहे.

# बास्केटबॉल निवड चाचणीचे आयोजन

। पनवेल । प्रतिनिधी ।

बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगड यांच्या वतीने १३ वर्षाखालील गटातील मुले व मुली यांच्यासाठी रायगड जिल्हा निवड चाचणीचे आयोजन रविवार १२ एप्रिलला सकाळी ७.०० वाजता महात्मा स्कूल सेक्टर -८ खांदा कॉलनी येथे करण्यात येत आहे.

यानिवड चाचणीतून निवडलेला संघ १३ वर्षाखालील गटातील महाराष्ट्र राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करेल. रायगड जिल्ह्यातील सर्व बास्केटबॉल खेळाडूंना या निवड



चाचणीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. खेळाडूंनी निवड चाचणीसाठी येताना दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, वयाचा पुरावा आणि निवासाचा पुरावा (आधार कार्ड किंवा समकक्ष कागदपत्र) सोबत आणणे बंधनकारक आहे. रायगड जिल्ह्यातील सर्व बास्केटबॉल खेळाडूंसाठी ही एक सुवर्णसंधी आहे. बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगडतर्फे खांदा कॉलनी येथे १३ वर्षाखालील गटातील मुला-मुलींसाठी जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेमुळे जिल्ह्यातील खेळाडूंना आपली गुणवत्ता दाखवून राज्यस्तरावर प्रगती करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सर्व तरुण खेळाडूंनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन आ. विक्रांत दादा पाटील उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटना अध्यक्ष, बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगड यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी खेळाडूंनी आशिष पाटणे (+९१ ९०२९५९६८८०), मंदार म्हात्रे (+९१ ८८५०८ ००२९९) व आकाश चाकणे (संपर्क: ९०२९५९६९४९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भारतीय नेमबाजांचा निशाणा भरकटला

। स्पेन । वृत्तसंस्था ।

मुकेश नेलावल्ली, उज्वल मलिक व प्रमोद या तीन भारतीय नेमबाजांना १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात निराशेला सामोरे जावे लागले. मुकेश नेलावल्ली याला ५७९ गुणांची कमाई करता आली. त्यामुळे त्याचे आव्हान पात्रता फेरीतच संपुष्टात आले.उज्वल मलिक याला ५७७ गुणांसह २२व्या स्थानावर समाधान मानावे लागले. तसेच प्रमोद याची ५७४ गुणांसह ३९व्या स्थानावर घसरण झाली. या दोघांनाही अंतिम फेरीपासून दूर राहावे लागले.

# 'विठ्ठल प्रीमियर लीग'चा थरार

। कल्याण । प्रतिनिधी ।

चिकणीपाडा परिसरात क्रिकेटचा उत्साह शिगेला पोहोचला होता. स्थानिक विठ्ठल रुक्मिणी मंदिर प्रांगणात 'विठ्ठल क्रिकेट क्लब' आयोजित 'विठ्ठल प्रीमियर लीग'चा पहिला हंगाम मोठ्या उत्साहात पार पडला. या चुरशीच्या स्पर्धेत दर्शन शेट्ये यांच्या 'साई पॅकर्स' संघाने चमकदार कामगिरी करत पहिल्यावहिल्या चषकावर आपले नाव कोरले. परिसरातील उदयोन्मुख क्रिकेटपटूंच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यात कोणताही व्यावसायिक खेळाडू नव्हता. केवळ चिकणीपाडा परिसरात वास्तव्यास असणाऱ्या खेळाडूंसाठीच ही स्पर्धा मर्यादित ठेवण्यात आली होती.

स्पर्धेचे स्वरूप व्यावसायिक नसले तरी नियोजन मात्र, अत्यंत शिस्तबद्ध होते. आयपीएलच्या धर्तीवर दोन आठवड्यांपूर्वी ५० हून अधिक खेळाडूंचा 'लिलावफं' पार पडला होता. परिसरातील युवा सामाजिक कार्यकर्ते आणि व्यावसायिकांनी संघांची मालकी स्वीकारून खेळाडूंना प्रोत्साहन दिले. अंतिम सामन्याचा थरार स्पर्धेत साई पॅकर्स, साईशा स्ट्राईकर्स, अविरा चॅलेंजर्स, टीम एसएम सिक्स हे चार संघ सहभागी झाले होते. एकूण १२ साखळी सामन्यांनंतर गुणतालिकेत अव्वल ठरलेल्या दोन संघांमध्ये अंतिम झुंज रंगली. अंतिम सामन्यात दर्शन शेट्ये यांच्या साई पॅकर्स संघाने अष्टपैलू खेळाच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यावर दणदणीत विजय मिळवला. अनुभवी कर्णधार ओमकार शिंदे याने आपल्या नेतृत्वाखाली संघाला जेतेपद मिळवून दिले. त्याच्या अष्टपैलू कामगिरीबद्दल त्याला 'मालिकावीर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# कुस्ती स्पर्धेत अमेघाला रौप्यपद

। उरण । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रातील सोलापूर येथे झालेल्या चौथ्या महिला-महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत उरण तालुक्यातील खोपटे गावची पैलवान अमेघा अरुण घरत हिने ५९ किलो वजनी गटात रौप्यपदक मिळवले आहे. महाराष्ट्र राज्य कुस्ती संघाचे सचिव योगेश दोडके, भारत केसरी योगेश बोंबाळे, रूपेश पावशे यांनी अमेघाचे कौतुक केले. तसेच तिला कुस्तीचे धडे देणारे मार्गदर्शकांचे कौतुक करुन तिला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# सिंधू-आयुषची दमदार कामगिरी

। निंगबो । वृत्तसंस्था ।

भारतीय खेळाडूंना आशियाई बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेतील बुधवारच्या दिवशी संमिश्र यशाचा सामना करावा लागला. एकीकडे एच. एस. प्रणोय, आयुष शेट्टी व पी. व्ही. सिंधू यांनी एकेरी गटात विजय मिळवत पुढे पाऊल टाकले असताना दुसरीकडे मात्र लक्ष्य सेन, किदांबी श्रीकांत, तन्वी शर्मा, मालविक बनसोड या खेळाडूंना एकेरी गटातच पराभवाचा सामना करावा लागला.

पी. व्ही. सिंधू हिने विजयी वाटचाल केली असतानाच तन्वी शर्मा व मालविका बनसोड



यांना पराभवाला सामोरे जावे लागले. पी. व्ही. सिंधू हिने वोंग चिंग हिला १५-२१, २१-११, २१-१९ असे नमवले.

पहिला गेम पराभूत झाल्यानंतर पी. व्ही. सिंधू हिने पुढील दोन गेममध्ये झोकात पुनरागमन केले. भारताच्या फुलराणी हिने एक तास व सात मिनिटांत विजय संपादन केला.

# केआरपी एकादश संघाला विजेतेपद

। मुंबई । प्रतिनिधी ।

एक्सप्लेनेड क्रिकेट क्लब आयोजित समर व्हॅकेशन क्रिकेट शिल्ड स्पर्धेत केआरपी एकादश संघाने विजेतेपद पटकावले. अंतिम लढतीत केआरपी एकादश संघाने गौड युनियन क्रिकेट क्लबचा सहा विकेट्सनी पराभव करत विजयी झाले. योगेश पवारला उत्कृष्ट फलंदाज म्हणून गौरवण्यात आले. विजेत्यांना अजिंक्य नाईक, उन्मेष खानविलकर, संजय नाईक, सी.एस. नाईक यांच्या हस्ते खेळाडूंना गौरवण्यात आले.

# भारतीय महिला हॉकी संघाची निवड

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

अर्जेंटिना महिला हॉकी संघाविरुद्धच्या चार सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय महिला हॉकी संघाची बुधवारी निवड करण्यात आली. सलीमा टेटे हिच्याकडे भारतीय महिला हॉकी संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले आहे. गोलरक्षक सविता व ड्रॅग्फ्लिकर दीपिका या खेळाडूंचे संघात पुनरागमन करण्यात आले आहे. भारत-अर्जेंटिना यांच्यामध्ये चार हॉकी सामन्यांची मालिका खेळवण्यात येणार आहे. ही मालिका १३ ते १७ एप्रिल या कालावधीत पार पडणार आहे.

भारतीय महिला हॉकी संघाचे प्रशिक्षक शूर्ड मराईन यावेळी म्हणाले की, अधिकाधिक खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याची एक मौल्यवान संधी आहे. भारताचा महिला हॉकी संघ गोलरक्षक : सविता, बिच्छू देवी खारीबाम. बचावपटू : निक्की प्रधान, ईशिका चौधरी, सुशीला चानू, मनीषा चौहान, लालथांतलुआंगी, ज्योती, उदीता. मधली फळी : वैष्णवी फाळके, साक्षी राणा, सुनेलीता टोप्पो, सलीमा टेटे, नेहा, दीपिका सोरेंग, ऋतुजा पिसाळ, ईशिका. आक्रमक फळी : बलजीत कौर, नवनीत कौर, दीपिका, अन्नू, ब्युटी डुंगडुंग, लालरेमसियामी, मुमताज खान यांची निवड करण्यात आली आहे.

## आयपीएलचा नवा नियम | सीमारेषेबाहेरील हालचालींवर निर्बंध

# मैदानावर आता फक्त १६ खेळाडूंनाच प्रवेश

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

'बीसीसीआय'ने आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धेतील यंदाच्या हंगामादरम्यान नवा नियम लागू केला आहे. यानियमानुसार, आता बेंचवर बसलेले खेळाडू सामन्यादरम्यान मैदानावर मुक्तपणे फिरू शकणार नाहीत. टीम शीटमध्ये समाविष्ट असलेल्या १६ खेळाडूंनाच मैदानावर एण्ट्री मिळणार आहे. इतरांना आता मैदानात प्रवेश दिला जाणार नाही.

ड्रिंक्स, बॅट किंवा संदेश पोहोचवण्यासाठी फक्त संघात समाविष्ट असलेल्या १६ खेळाडूंनाच मैदानात जाण्याची परवानगी असेल. अलीकडेच संघ व्यवस्थापनाला याबाबत सूचना देण्यात आल्या असून, या निर्णयामागील अधिकृत कारण अद्याप स्पष्ट करण्यात आलेले नाही. एका वेळेस बाउंड्री लाईनजवळ फक्त पाच खेळाडूंनाच उपस्थित राहता येणार आहे.

सामान्यतः आयपीएल संघात सुमारे २५ खेळाडू असतात. मात्र प्रत्येक सामन्यासाठी केवळ १६ जणांची नोंद टीम शीटमध्ये केली जाते. नव्या नियमानुसार उर्वरित



### सब्स्टिट्यूट खेळाडूंवरही मर्यादा

बिब्स (सब्स्टिट्यूट जर्सी) परिधान करून मैदानाच्या कडेला वावरणाऱ्या खेळाडूंची संख्या पाचपेक्षा जास्त असणार नाही. हे खेळाडू साधारणतः ड्रिंक्स नेणे किंवा बाउंड्रीवरून चेंडू परत करण्याचे काम करतात. हा नियम मॅच प्लेइंग पंडिशन्स (एमपीसी) मधील कलम ११.५.२ आणि २४.१.४ अधिक कडक करतो. कलम ११.५.२ नुसार खेळाडूंना ड्रिंक्स देण्याची परवानगी ठरावीक वेळ आणि अटींनुसार असते, तर कलम २४.१.४ नुसार मैदानाबाहेर असलेल्या खेळाडूंनी ट्रेनिंग बिब परिधान करणे बंधनकारक आहे.

खेळाडूंना डगआउटमध्येच थांबावे लागेल. त्यांना बाउंड्री लाईन आणि एलईडी बोर्डदरम्यान वावर करण्यास मनाई असेल. संघातील सूत्रांच्या मते, सब्स्टिट्यूट खेळाडूंना सामन्यादरम्यान मैदानावर फिरण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्यांना ड्रिंक्स नेण्याचीही परवानगी नाही.

आयपीएल २०२६ च्या पार्श्वभूमीवर, बीसीसीआयने एक मोठा आणि कठोर निर्णय घेतला आहे, ज्याचा संघांच्या रणनीतीवर थेट परिणाम होऊ शकतो. आता, बेंचवर बसलेल्या खेळाडूंना सामन्यादरम्यान मैदानावर फिरता येणार नाही. नवीन नियमानुसार, संघ व्यवस्थापनाने अधिकृत संघ यादीत समाविष्ट केलेल्या केवळ १६ खेळाडूंनाच सामन्यादरम्यान मैदानावर प्रवेश करण्याची परवानगी असेल. इतर खेळाडूंना मैदानावर प्रवेश करता येणार नाही, तसेच ते खेळाडूंपर्यंत पेय, बॅट किंवा कोणताही संदेश पोहोचवू शकणार नाहीत. या नवीन नियमामागील नेमके कारण उघड झाले नसले तरी, सामन्यादरम्यान शिस्त राखण्यासाठी आणि अनावश्यक गोंधळ टाळण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे, असे मानले जात आहे. इंडियन प्रीमियर लीग २०२६ चे आतापर्यंत ७४ पैकी १३ सामने खेळले गेले आहेत. १४ वा सामना दिल्लीत दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टाइम्स यांच्यात खेळला जत आहे. बीसीसीआयचा हा नवीन नियम आयपीएलमधील शिस्त आणखी कडक करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल मानले जात आहे. तथापि, याचा संघांच्या मैदानातील संवाद आणि रणनीतीवरही परिणाम होऊ शकतो, ज्याचा परिणाम आगामी सामन्यांमध्ये स्पष्टपणे दिसून येईल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)